
म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



# मूल्यमापन

REFBK-0015225

प्रा. मनोहर रोकडे

६१९३६
निबंध
१०५६५
१००२

... म... ठाणे ...
... ६१९३६ ... दि: ... १-१-६८
... १००२ ... दि: ... १-१-६८

कवी ... रन

REFBK-0015225

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२५

प्रकाशक

महेश जोशी,
दर्शन प्रकाशन,
धन्तोली, नागपूर–१

★

लेखक

प्रा. मनोहर रोकडे,
धनवटे नॅशनल कॉलेज,
नागपूर–३

★

सजावट

मदन बक्षी,
स्टुडिओ मदन,
नागपूर–२

★

मुद्रक

श्री. छनालाल डी. शाह,
सर्वोदय प्रिंटिंग प्रेस,
नागपूर–२

★

पहिली आवृत्ती

★

सर्व हक्क स्वाधीन

★

फेब्रुवारी १९६६

★

मूल्य तीन रुपये

माझ्यावर अमर्याद
प्रीती करणाऱ्या
माझ्या करुणाघन

आई-वडिलास

# -: शिल्पकार :-


| | | |
|---|---|---|
| **चिकित्सक मार्गदर्शन** | : | श्री. महेश जोशी |
| **मुखपृष्ठ** | : | श्री. मदन बक्षी |
| **ग्रंथसहाय्य** | : | श्री. मधुकर पौनीकर |
| **वैचारिक प्रेरणा** | : | डॉ. वि. भि. कोलते |
| | | डॉ. अ. ना. देशपांडे |
| | | डॉ. रा. शं. वाळिंबे |
| | | प्रा. म. श्री. पंडित |
| | | प्रा. रा. श्री. जोग |
| | | प्रा. श्री. के. क्षीरसागर |
| | | प्रा. मं. वि. राजाध्यक्ष |
| | | श्री. ग. त्र्यं. माडखोलकर |

यातून आकाराला आले हे ग्रंथशिल्प !

सर्वांचा उदंड आधार !

सर्वांचे अनमोल ऋण !!

सर्वांचे आंतरिक आभार !!!

## नवं क्षितिज...

विनायकाच्या कवितांचा संग्रह नागपूर विद्यापीठाने अभ्यासक्रमात नेमलेला ! कविता शिकवायच्या म्हणून वाचल्या..आणि वाचता वाचता गंभीर झालो. या कवीला अभिनवतावादी म्हणता येईल का ? केशवसुतांचा आणि विनायकाचा संप्रदाय एकच का ? मन तयार होईना. भिन्नत्व तर जाणवलेलं आणि जाणत्यांनी केशवसुत–विनायक हे एकाच संप्रदायातले म्हणून मानलेलं ! उलगडा होईना. विचार रूतून बसले. मग पश्चिमेच्या वाऱ्यानं विचारांची पानं हालली. नाहीतरी या संप्रदायाचं स्वरूप हा नागपूर विद्यापीठाने संशोधनासाठी मान्य केलेला माझा विषय...चिंतनाचं भिंग हाताशी धरलं अन् विनायक तपासू लागलो. खूप गमती आढळल्या. कुणी त्याला बायरन म्हणतात; कुणी त्याला भूतकाळात रममाण झालेला कवी समजतात तर कुणी त्याला तत्कालीन जनतेचा वाचस्पती ठरवतात. कुणाला त्याच्या 'कॉम्प्लेक्स'संबंधीचं कोडं वाटतंय् ! कुणी त्याला रडवा म्हणतात तर कुणी त्याला तेजस्वी भाष्यकार मानतात. एक ना दोन. खोलात शिरावं तितकी मौज. म्हणून जरा तळ शोधण्यासाठी सूरच मारून पाहिला..आणि जे आढळलं ते विलक्षण होतं ! जे पाहिलं ते लिहिलं पाहिजे आणि जे लिहिलं ते लोकांपुढं मांडलं पाहिजे असं वाटू लागलं ! मन उत्कटतेनं आतूर झालं..आणि अस्वस्थही !

म्हणून हे लिहिलं...नव्हे, लेखणीतून आपोआप उतरलं !

विनायकावरील माझ्या वैचारिक भूमिकेशी कुणाचे मतभेद होऊ शकतील–जिवंत टीकेचं ते अपरिहार्य अंग आहे–पण त्यामुळं विनायकाकडे डोळसपणे पाहण्याची वैचारिक चालना तरी या ग्रंथामुळे मिळेल, असा विश्वास वाटतो.

माझे दोन स्नेही, नागपूरचे नामवंत चित्रकार श्री. मदन मोहन बक्षी आणि नागपूर येथील धनवटे नॅशनल कॉलेज-मधील मराठीचे प्राध्यापक श्री. मनोहर रोकडे, यांच्या सहृदय साहाय्यामुळेच 'कवी विनायक : मूल्यमापन' हा ग्रंथ सुघट आणि सुबोध स्वरुपात प्रकाशात येऊ शकला. पण त्यांचे आभार मानणे अकृत्रिम मित्रत्वाला शोभणार नाही.

'सर्वोदय प्रिंटिंग प्रेस'चे मालक श्री. छनालाल डी. शाह यांनी या ग्रंथाच्या मुद्रणकार्यात जो रस घेतला तो मुद्रक आणि प्रकाशक यांच्या परस्पर स्नेहाला पोषक ठरला. श्री. शाह आणि त्यांच्या मुद्रणालयातील सर्व कर्मचारी यांचा मी सुबक छपाई आणि बांधणी याबद्दल कायम ऋणी राहीन.

—महेश जोशी

# अनुक्रम


* महाराष्ट्राचा बायरन
* तत्कालीन जनतेचा वाचस्पती
* राष्ट्रीय कवी ?
* चंद्रशेखर–विनायक–केशवसुत
* आशा–निराशावाद
* कथाकाव्ये व दृष्टिकोण
* मूल्यमापन
* परिशिष्ट

राष्ट्रीय कविता

आशा–निराशावादी कविता

कथाकाव्ये



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत

अनुक्रम ........................ दि: ....................

क्रमांक ........................ नोंद दि: ....................

# प्रकरण १. महाराष्ट्राचा बायरन !

प्रास्ताविक

बायरनचे ओझरते दर्शन

विनायकाचे धावते चरित्र

स्वभाव साम्य–विरोध

जीवनदृष्टीतील भेद

काव्यांतर्गत साम्यवैधर्म्य

काव्यदृष्टी

निष्कर्ष

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १५२२५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

★ एखाद्या कवीची जेव्हा आपण दुसऱ्याशी तुलना करतो तेव्हा आपल्याला नेमके काय अभिप्रेत असते ? दोन कवींच्या जीवनातली आणि जगण्यातली समानता आपल्याला दाखवावयाची असते काय ? की त्यांच्या काव्यातून आविष्कृत झालेले काव्यगुण समप्रकृती होते असे आपल्याला म्हणायचे असते ? की जीवनाकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टिकोण एकच होता हे अभिव्यक्त करायचे असते ? म्हणजेच कविजीवन, काव्यगुण, जीवनदृष्टी आणि काव्यदृष्टी यापैकी नेमकी तुलना कुठे व कशी केली आहे याचे दर्शन घडल्याशिवाय दोन कवींच्या साधर्म्याचे स्वरूप नीट आकलन होणे शक्य नसते. 'केशवसुत' जेव्हा 'विनायकां'ना 'महाराष्ट्राचा बायरन' म्हणून संबोधतात[1] तेव्हा त्यातून केशवसुतांना नेमके काय सूचित करावयाचे आहे याचे परिशीलन केल्याशिवाय केशवसुतांना मान्य असलेल्या अर्थाहून भिन्न अर्थ ग्राह्य करण्याची गल्लत आपल्याकडून होणार नाही.

---

१. विनायकांच्या वर्तनातील स्वैरता व काव्यातील उत्कटता यांचे बायरनच्या वर्तनाशी व काव्याशी साम्य आहे असे पाहून केशवसुतांनी त्यांना 'महाराष्ट्राचा बायरन' ही पदवी गमतीने बहाल केली होती, असे रहाळकरांनी लिहून ठेवले आहे. (मनोरंजन, जुलै १९१९)—विनायकाची कविता, आ. ४, पृ. ५४, भ. श्री. पंडित.

* 'वेडा जॅक' म्हणून प्रसिद्धी पावलेला जॉन बायरन फारच स्वैर व स्वच्छंद होता. संपन्न घराण्यातली सुंदर मुलगी हेरावी; तिच्याशी विवाह करावा आणि तिच्या श्रीमंतीवर मौज मारावी हे जणू त्याचे जीवनध्येयच होते. लॉर्ड कारमार्दनच्या पत्नीला तिच्या पित्याकडून प्रतिवर्षी चार हजार पौंड हक्काने मिळू शकतात एवढे जॉनला कळण्याचाच अवकाश, त्याने तिला लागोलाग फूस दिली आणि तीही सरळ पतीला सोडून जॉन-बरोबर पळून गेली. अर्थात् नंतर कारमार्दनने आपल्या बदफैली पत्नीशी घटस्फोट घेतला हे वेगळे. जॉनने तिच्याबरोबर संसार थाटला आणि तेव्हापासून पत्नीला मिळणाऱ्या चार हजार पौंडाचा तो विनासायास धनी झाला. 'ऑगस्टा' नावाच्या मुलीला जन्म दिल्यावर अल्पावधीतच ही बाई मरण पावली. त्यामुळे जॉनला कनक आणि कांता यांना एकाच वेळी मुकावे लागले. जॉन आता दुसरा मासा गळाला लावण्याच्या खटपटीस लागला. स्कॉट घराण्यातील 'कॅथेरीन गॉर्डन' या मुलीशी झालेल्या त्याच्या विवाहाची वार्ता अचानकच प्रसिद्ध झाली. म्हणजे दुसरा मासा गवसला होता म्हणायचा. तिच्या वडिलांची सर्व इस्टेट तिच्याच नावाने होणार होती ही गोष्ट या विवाहात अर्थातच त्याच्या दृष्टीने महत्त्वाची होती. असल्या बापाच्या पोटी जॉर्ज गॉर्डन बायरन लंडनला २३ जानेवारी १७८८ मध्ये जन्माला आला. आपल्या स्वच्छंद पित्याची परंपरा पुढे पोराने नुसती चालवलीच नाही तर तिचा कळस गाठण्याचे कसबही दाखवले. बायरन तीन वर्षाचा असतानाच जॉन आपल्या वयाच्या अवघ्या छत्तीसाव्या वर्षी ऐन उमेदीत मरण पावला.

उदार, प्रेमळ व अतिशय हळवी असलेली त्याची आई तेवढीच तापट व अविवेकी होती. बायरन हा जन्मापासून एका पायाने अधू असलेला. त्यामुळे तर पतिनिधनानंतर मातृवात्सल्य अधिकच उफाळून यायला हवे होते. पण ही जगावेगळी आई पोरावर प्रेमाची पाखर घालण्याऐवजी त्याचा वारंवार पाणउताराच करी. त्याच्या सवंगड्यादेखत त्याला टाकून बोले. त्याचा पाय दुरुस्त होईल असा प्रयत्न तर तिने कधी केला नाहीच पण त्याने स्वतः केलेल्या प्रयत्नात आलेले अपयश पाहून ती अधिकच

संतापली. बायरनने मोठ्या धीराने ते अपयशाचे हलाहल पचविले; पण त्याची अविवेकी आई त्याला इतकी टोचून बोलली की, त्या अपमानाचे शल्य व त्याचे भीषण दुष्परिणाम त्याच्या जीवनभर सर्वत्र उमटलेले आढळतात.

बायरनचे अभ्यासाकडे मुळीच लक्ष नव्हते. त्यामुळे त्याला शिकवणी लावावी लागली. मग मात्र त्याला वाचनात रस वाटू लागला. तो लिहितो, "वाचता आल्यापासूनच मला इतिहासाची गोडी लागली. विशेषतः, रोमन इतिहास आणि लढाया मला फारच आवडू लागल्या."

बायरन १७९६ मध्ये आजारी पडला. हवापालट म्हणून त्याला पहाडी मुलुखात नेण्यात आले. तेव्हा तो उणापुरा आठ वर्षांचाही नसेल; पण त्याही वयामध्ये तो 'मेरी डफ'च्या प्रेमात पडला. पुढे आठ वर्षांनी जेव्हा तिचा विवाह दुसऱ्याशी झाला तेव्हा त्याच्यावर जणू आभाळच कोसळले. तो लिहितो, "त्या घटनेने माझ्या डोक्यावर जणू विजेचा आघात झाला. माझे सारे अवसानच गळून पडले." अवघ्या आठ वर्षांच्या वयात प्रेमवेडा होणारा बायरन बापाच्या गुणांचा वारसा घेऊन जन्माला आला होता, असेच म्हणावे लागेल.

बायरन दहा वर्षांचा असताना त्याचे आजोबा वारले आणि परंपरागत इस्टेट व लॉर्ड ही पदवी बायरनकडे वारसा हक्काने चालत आली. पित्याने उधळलेल्या इस्टेटीमुळे बालपणापासून भोगाव्या लागलेल्या गरिबीतील आपदांचा अंत या क्षणापासून झाला.

बायरनने शिक्षणाचा श्रीगणेशा 'ॲबर्डीन' या गावाला गिरविला. नंतर नॉटिंगहॅम, लंडन, डलविच येथे विद्यार्जन केले आणि शाळेची शेवटची परीक्षा 'हॅरो' येथे दिली. हॅरोमधील शाळेत शिकत असताना अभ्यासात त्याने नाव कमाविले नसले तरी मुष्टियुद्धात मात्र प्राविण्य मिळविले होते. पोहण्यात तर तो पट्टीचा म्हणून गणला जाई. १८०५ मध्ये इटनविरुद्ध झालेल्या क्रिकेटच्या सामन्यात त्याने चक्क भागही घेतला होता. एका पायाने अधू असलेल्या मुलाने क्रिकेटच्या सामन्यात भाग घ्यावा ही घटनाच

त्याच्या अमर्याद इच्छाशक्तीची व कणखर कर्तृत्वाची ओळख करून द्यायला पुरेशी बोलकी आहे. त्याची वृत्तीच मुळी धडाडीची होती. शाळेतील त्याच्या शौर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत. शाळेत असताना रॉबर्ट पील नावाच्या त्याच्या सवंगड्याला कोणीतरी मारीत होते. मारणाऱ्याचा हात धरण्याची शक्ती बायरनमध्ये नव्हती. तो मारणाऱ्याजवळ वेडरपणे गेला आणि त्याला, "तू आणखी किती चपराकी लगावणार आहेस ?" असा त्याने सवाल केला. "मूर्खा तुला रे काय करायचंय् ?" असा प्रतिप्रश्न येताच तो उद्‌गारला, "त्यातल्या अर्ध्या मला हव्या आहेत."

१८०५ मध्ये तो केंब्रिजच्या 'ट्रिनिटी' कॉलेजात दाखल झाला. 'नेहरू' घराण्यासारखेच बायरन घराणेही सौंदर्यशाली व देखणे. त्यात बायरन वयात आल्यावर तर फारच मोहक दिसत असे. मध्यंतरी लंडनला जाऊन जेव्हा तो परत केंब्रिजला आला तेव्हा त्याचे मित्र म्हणाले, "ज्याच्य चेहऱ्याकडे पाहून आम्हाला सौंदर्याचा साक्षात्कार होतो आणि ज्याचे मुख-कमल आंतरिक प्रभेमुळे मनाला भुरळ पाडते तो मित्र आमच्यात परत आल्याने आम्हाला अतिशयच आनंद झाला आहे."

शौर्य, सौंदर्य व संपत्ती लाभलेल्या या स्वैर पोराने कॉलेज-मधील तरुण पोरींवर प्रेम केले नसते तरच नवल. सोळाव्या वर्षीच मेरी ॲन कॉवर्थ नावाच्या कॉलेज किशोरीसाठी तो वेडापिसा झाला होता. ती त्याच्याहून दोन वर्षांनी मोठी होती व तिचे आधीच दुसऱ्याबरोबर जुळले होते. या प्रणयभंगाच्या निराशेने काही काळ तरी त्याच्या आनंदी वृत्तीत बदल झाला.

धाडसी स्वभावाच्या या मुलाची बालपणापासून आपण सेनापती व्हावे व पराक्रम गाजवावा अशी मनीषा होती. पण पंगुपणामुळे ती अतृप्तच राहिली. त्याचे दुसरे स्वप्न होते नामवंत साहित्यिक होण्याचे. लोकांनी आपला महाकवी म्हणून गौरव करावा असे त्याला मनोमन वाटे. लहान-पणापासूनच स्वतःच्या मनोरंजनाकरता तो काव्य करू लागला होता. १८०७ मध्ये 'अवर्स ऑफ आयडल्नेस' हा त्याचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला. 'एडिबरो रिव्ह्यू' मधून त्यावर प्रतिकूल व अन्याय्य टीका प्रसिद्ध

झाली. त्यावरची प्रतिक्रिया म्हणून त्याचे प्रसिद्ध झालेले 'इंग्लिश बार्डस् अँड स्कॉच रिव्ह्यूअर्स' हे वादळी पुस्तक विजेच्या गतीने खपले.

तो वाचनाचा वेडा असला तरी पुस्तकातला किडा नव्हंता. उलट शालेय अभ्यासाचा त्याने मनोमन तिटकाराच केला. एम्. ए. ची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा त्याला कधीच आनंद झाला नाही. म्हातारीच्या आग्रहाने तो शिकला होता एवढेच. आपल्या अभ्यासिकेत त्याने बुलडॉग व अस्वल पाळले होते आणि 'फेलोशिप मिळविण्यासाठी तयारी करणारे अभ्यासक' म्हणून त्यांच्याकडे तो बोट दाखवी.

बायरन आता वयात आला होता. १८०९ साली एकवीस वर्षे पूर्ण झाल्यावर 'हाऊस ऑफ लॉर्डस्' मध्ये त्याला प्रवेश मिळाला. आईच्या कजाग स्वभावामुळे त्याला अनिच्छेने वेगळे घर करावे लागले. त्यावेळी त्याच्यावर कर्ज होते. त्यात आणखी कर्ज काढून 'हॉबहाऊस' नावाच्या मित्राबरोबर तो पूर्वेकडे प्रवासाला निघाला. या सर्व प्रवासात त्याने वेळोवेळी लिहिलेली पत्रे ही त्याच्या दोलायमान मनःस्थितीचे दर्पण आहेत. मध्येच त्याला नैराश्याचे झटके येत, मध्येच त्याची वृत्ती तत्त्वज्ञान्याची बने आणि मध्येच प्रवृत्तिवादाला लाजवील असा आशावाद त्याच्या जीवनातून डोकावून जाई. त्याच्या जीवनात हा आशा-निराशेचा श्रावणमास होता. या प्रवासात त्याने 'चाइल्ड हेरॉल्ड' 'हिंटस् फ्रॉम होरेस' आणि 'कर्स ऑफ मिनर्व्हा' लिहून काढले.

तो जुलै १८११ मध्ये प्रवासावरून परत आला आणि ऑगस्ट १ ला त्याची आई वारली. जन्मभर ती बायरनशी दुष्टपणाने वागली असली तरी तिच्याबद्दल कोणी एकही अपशब्द बोललेला त्याला खपत नसे. जात्याच तो दुसऱ्याचे दुःख समजावून घेणारा मोठ्या सहृदय अंतःकरणाचा होता. त्याच्या वडिलांनी विवाह केला तो त्याच्या आईशी नसून तिच्या संपत्तीशी केला होता याची जेव्हा तिला जीवघेणी बोचक जाणीव झाली असेल तेव्हा तिचा सारा संसार होरपळून गेला असला पाहिजे; तिच्या प्रीतीचा फुलोर करपून गेला असला पाहिजे; ती व्यथित अंतःकरणाने रडत असली पाहिजे आणि त्याच्यापासून आपल्याला झालेला हा मुलगा पाहून

त्याचा मनोमन तिरस्कार ती करीत असली पाहिजे. तिच्या तिरस्कारामागील ही कारणपरंपरा उदार मनाने बायरनने समजून घेतली असावी. म्हणूनच तिच्या कृतघ्नतेच्या वागणुकीला त्याने दिलेले उत्तर प्रेमळतेचे आहे. कर्तव्य-निष्ठ बायरन तिच्याबद्दल बोलतो, "Cost what it may, gold or blood, I will pursue to the last the cowardly culminator. . . . a defenceless woman."

आणि १८१२ साली बायरनच्या आयुष्यात अभूतपूर्व घटना घडली. भांडवलदारांनी कापड–गिरण्यांमध्ये शीघ्रगती, उत्पादनक्षम, अद्ययावत अशी मोठी यंत्रसामुग्री उभी केली. उत्पादन भलतेच फुगले पण होत्या तेवढया मजुरांची गरज आता उरली नाही. मोजकेच मजूर कामावर राहिले व उरलेले कामावरून दूर केले गेले. धंदा बुडाला, नोकरी गेली आणि ही माणसे बेकार झाली. खायला अन्न नाही, ल्यायला वस्त्र नाही अशी अन्नान्नदशा त्यांच्या कपाळी आली. गिरणी मालकांना त्यांनी समजावून सांगितले; पण केवळ नफ्यावर लक्ष असलेल्या भांडवलदार मालकांनी तिकडे दुर्लक्ष केले. सरकारही हस्तक्षेप करीना. मजूर उपासमारीने तडफडत होते आणि त्याचबरोबर असंतोषाचा ज्वालामुखी धुमसू लागला होता. शेवटी प्रकरण विकोपाला गेले आणि मजुरांच्या क्रांतीचा लाव्हा रसरसून बाहेर आला तो नॉटिंगहॅममधून. असंख्य मजूर एकत्र येऊन गिरणीतील यंत्राची नासधूस करू लागले. मोडतोड, जाळपोळ यांनी रूद्र रूप धारण केले. जगातील औद्योगिक क्रांतीची सुरुवात नेहमीच विणकर समजापासून होत आली आहे आणि विणकर नेहमीच औद्योगिक क्रांतीत अग्रेसर राहिला

---

२. आपल्या भाषणात बायरन म्हणतो, "My own motive for opposing the bill is founded on its palpable injustice & its certain inefficiency. I have seen the state of these miserable men, and it is a disgrace to a civilised country. . . I have traversed the seat of war in the peninsula, I have been in some of the most oppressed provinces of Turkey; but never, under the most despotic of infidet govts., did I behold such squalid wrechedness as I have seen since my return, in the very heart of a christian country."

आहे हा ऐतिहासिक अनुभव येथेही आला. क्रांती आटोक्यात येईना. शेवटी सशस्त्र सैन्य पाठवून सरकारला क्रांती चिरडून टाकावी लागली. या क्रांतीत भाग घेणाऱ्यांना फाशी देण्यात यावे अशी मागणी करणारे फ्रेमब्रेकर्स बील लॉर्ड भांडवलदारांनी पार्लमेंटमध्ये मांडले. बायरन हा लॉर्ड खरा पण त्याच्या स्वातंत्र्यप्रिय मनाला मजुरांवरचा हा अन्याय खपला नाही. क्रांतिपूर्व प्रवासात मजुरांची व्यथा त्याने अनुभवली होती. सर्व लार्ड एका बाजूला झाले; पण हा एकटा त्या साऱ्यांच्या विरूद्ध मजुरांच्या बाजूने लढायला उभा ठाकला. पार्लमेंटमधील आपल्या पहिल्यावहिल्या भाषणात त्याने या अन्यायावर कडाडून प्रहार केला आणि तेजस्वी विचारांनी साऱ्या इंग्लंडचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले.[२]

बायरनने आपल्या प्रभावी वक्तृत्वाची व स्वातंत्र्यलालसेची पार्लमेंट-मध्ये चुणूक दाखवून दिली त्याच्या तिसऱ्याच दिवशी त्याचे 'चाइल्ड हेरॉल्ड' हे काव्य प्रसिद्ध झाले. बाजारात काव्य वायुवेगाने खपले. त्याच्या सात आवृत्या एक महिन्याच्या आत उडल्या. त्याच्या काव्याचे हे यश तुतारीच्या गगनभेदी आवाजासारखे होते; त्यापुढे पार्लमेंटमधील भाषणाचा पावा पार विरून गेला. बायरन या संदर्भात लिहितो, "I awoke one fine morning and found myself a famous poet."

कीर्तीच्या या अत्युच्च शिखरावर असतानासुद्धा तो निराशेच्या गर्तेत अनेकदा रूतून बसलेला आढळतो. आशा-निराशेचे द्वंद्व त्याच्या मनात सारखे चाललेले असे. कदाचित् प्रेमभंगामुळेही असे होत असेल; कारण १८१३ मध्ये तो लिहितो, "या माझ्या मानसिक विषण्णतेवर माझा विवाह होणे हाच कदाचित् एकमेव उपाय असू शकेल."

समानतेचा व स्वातंत्र्याचा सदैव पुरस्कर्ता राहिलेल्या बायरनला आपल्या कर्तृत्वाबद्दल जसा अभिमान होता तसाच त्याला आपल्या उच्च वर्णाबद्दलही गर्व होता. स्वातंत्र्याचा आग्रही प्रवक्ता म्हणून लंडन सोसाय-टीने त्याला सभासदत्व दिले. सोसायटीत असलेला हा एकुलता एक तरुण पुरुष लवकरच सत्ताधीश सिंह बनला. कमालीची कीर्ती, सतेज सौंदर्य आणि मधुकर वृत्ती या गुणत्रयीमुळे या काळात त्याने स्वतःभोवती प्रेयसींची

मालिकाच गुंफली. 'लेडी कॅरोलिन लँब,' 'लेडी ऑक्स्फोर्ड' व इतकेच नव्हे त्याची सावत्र बहीण 'ऑगस्टा' हिच्यावरही त्याने प्रणयाची बरसात केली. एकीकडे प्रणय खुलत होता व दुसरीकडे काव्य फुलत होते. वाल्झ, जीऑर, दि ब्रॉईड ऑफ ॲबिडॉज, दि कोर्सेर, लारा, आणि हिब्रू मेलोडिज हे त्याचे काव्यसंग्रह याच वेळेला दरवळू लागले होते.

शेवटी १८१५ मध्ये ॲनाबेला मिलबँक या मुलीशी त्याने लग्न केले. लेडी कॅरोलीन लँब (हिच्याशी त्याचे प्रेमप्रकरण होतेच) हिच्या इस्टेटीची ती एकमेव वारस होती; हे अर्थातच त्याने विवाह करतांना दृष्टिआड केले नव्हते. पण हा विवाह त्याला मानवला नाही. पति–पत्नीचे रोज खटके उडत. त्यामध्ये कुणाचा किती दोष होता यावर चर्चा अप्रस्तुत आहे. पण एवढे खरे की घरात पाळणा हलल्यानंतरही ह्या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. त्यांच्यात वैवाहिक दुःख निर्माण व्हायला कोण कारणीभूत होते यावर दोन्ही बाजूंकडून अनेकांची अनेक मते आहेत. पण बायरनच्या मनाचे विशालत्व तेथेही दिसून येते. तो म्हणतो, "जेवढे म्हणून दोष असतील तेवढे सारे माझे. चूक पत्नीकडून झालेली असो अथवा माझ्याकडून झालेली असो मला ती निस्तरता आली नाही म्हणून त्याचे परिणामही मीच भोगले पाहिजेत." नंतर त्याची पत्नी माहेरी म्हणून जी गेली ती परत स्वगृही आलीच नाही. शेवटी बायरनने तिला सोडचिठ्ठी दिली. या पत्नीपासून त्याला झालेली ॲडा नावाची मुलगी १८५२ मध्ये मरण पावली.

पत्नीपासून घटस्फोट घेतला आणि चारच दिवसांनी बायरनने इंग्लंड कायमचे सोडले. १८१६ मध्ये तो जिनेव्हाला प्रवास करीत असतानाच त्याची सुप्रसिद्ध कवी शेली याचेशी गाठ पडली. शेलीबरोबर त्याची प्रेयसी (व नंतर पत्नी) मेरी गॉडवीन आणि तिची सावत्र बहीण क्लेअर क्लेअरमाऊंट या दोघीही होत्या. बायरनने क्लेअरला पाहिले मात्र; तिच्या पहिल्या नजरेनेच तो घायाळ झाला. झाले; लागलीच प्रीतीचे रेशमी नाजूक धागे गुंफले गेले. गोजिरवाण्या बालकाला जन्म देऊन ही प्रीती लग्नाआधीच फुलवंतीही झाली.

बायरनने शेलीवर माणूस म्हणून व शेलीने बायरनवर कवी म्हणून निरतिशय प्रेम केले. या दोघांनी चार महिन्यांचा काळ इटलीत सहप्रवासी म्हणून मोठ्या मौजेत घालवला. तेथे बायरनने 'चाइल्ड हेरॉल्ड'चा तिसरा सर्ग लिहून काढला. 'मॅनफ्रेड' हा काव्य संग्रहही तेथलाच. व्हेनिसमध्ये तो स्थायिक झाल्यावर 'बेप्पो' व 'मॅझेप्पा' आणि 'डॉन जॉन'चे दोन सर्ग या साऱ्यांची निर्मिती त्याच रम्य परिसरात झाली. इटलीच्या दर्शनाने त्याचे सुप्त शौर्य उफाळून आले. ग्रीकांच्या स्वातंत्र्य-संगरात नंतर त्याने उडी घेतली तिची ही प्रेरणाभूमी होती.

१८१९ च्या बहरलेल्या वसंत ऋतूमध्ये 'काऊंटेस गूइसिऑली'शी त्याचा परिचय झाला. ही स्वरूपसुंदरी नवयौवना एका साठ वर्षे वयाच्या म्हाताऱ्याची पत्नी होती. व्हेनिसमध्ये ती बायरनच्या नादी लागली. आपल्या वृद्ध पती-बरोबर ती रेव्हेनाला आली तेव्हा बायरनलाही तिने तिकडे बोलावून घेतले. तेथून ती व बायरन 'ला मिरा'ला गेले. तिचा पती तिथे येईपर्यंत त्या दोघांनी अत्यंत स्वैर व स्वच्छंद असे जीवन मनसोक्त लुटले. या प्रकरणात तो फारच बदनाम झाला. यथेच्छ उपभोग घेतल्यावर ती परत आपल्या पतीकडे निघून गेली. पण तिच्याबरोबर राहत असताना काही चांगल्या गोष्टीही तो शिकला होता, असे शेलीच्या अभिप्रायावरून दिसते. या काऊंटेसबरोबर बायरनचा असलेला व्यवहार व संबंध पाहून तिच्या माहे-रची व सासरची माणसे त्याच्यावर चिडणे स्वाभाविक ठरले असते; पण देशस्वातंत्र्याच्या चळवळीत सहभागी होणाऱ्या शत्रूलाही मित्र समजणाऱ्या काऊंटेसच्या माहेरच्या मंडळीने बायरनला शेवटपर्यंत साथ दिली.

शेलीच्या प्रेरणेने बायरन व ले हंट यांनी 'लिबरल' नावाचे मासिक चालवले होते. बायरनच्या हृदयाची विशालता अशी की, त्याचे व ले हंटचे सूत जमत नसले व खटके उडत असले, तरी शेलीला शब्द दिला म्हणून शेलीच्या अनपेक्षित मृत्यूनंतरही, जिनेव्हाला जाईपर्यंत, बायरनने ले हंटला पदरी बाळगले.

तसा तो मनाचा मोठाच उदार होता. ले हंटशी भांडण असून त्याने त्याला दूर केले नाही. नवकवी जेव्हा त्याच्याकडे येत तेव्हा नेहमीच तो

त्यांना प्रोत्साहन देई व त्यांच्या काव्यप्रकाशनार्थ स्वत: श्रम व पैसा वेचीत असे. त्याची पत्नी अॅनाबेला माहेरी निघून गेल्यानंतर तो आर्थिक अडचणीत आला. तरीही त्याने काव्याचा पैसा प्रकाशकाकडून कधीच घेतला नाही. 'काव्य मी माझ्यासाठी लिहितो, त्याला तुमच्याकडून तो पैसा काय घ्यावयाचा ?" असे प्रकाशकाला तो नेहमीच म्हणत असे.

ग्रीकांचे तुर्की लोकांशी स्वातंत्र्ययुद्ध सुरू झाले आणि ग्रीकांच्या बाजूने या लढयात तो हिरीरीते पडला. त्यांच्या स्वातंत्र्यासाठी त्याने सिंहगर्जना केली. ग्रीकांसाठी त्याने संपत्तीचा पाट वाहवला. जनजागृतीसाठी क्षण न् क्षण वेचला. त्याच्या काव्याचा शब्द न् शब्द आता ग्रीसच्या स्वातंत्र्यासाठी निर्माण झाला. आणि या स्वातंत्र्याचाच ध्यास घेत हा स्वच्छंद देशभक्त १९ एप्रिल १८२४ ला पश्चिम ग्रीसमध्ये मिसलोंघी येथे तेथील खडतर जीवनामुळे तापाचा आजार होऊन मरण पावला. साहित्यातील या नेपोलियनचे शव इतमामाने व थाटाने परत आणण्यात इंग्लंडलाही अभिमान वाटला, यात नवल नाही.

संपले. तेजस्वी बायरनचे तळपते चरित्र इथे संपले. जीवन जगताना मृत्यूशी झुंजणाऱ्या व मृत्यूशी झुंजताना जीवनालाही अर्थ व आकार देणाऱ्या या नरकेसरीची कथा इथे तुटली. हा समर्थ साहित्यिक म्हणून जगला आणि देशभक्त शहीद म्हणून अमर झाला. ज्याच्या रंगीबेरंगी आयुष्याकडे पाहावे व जगण्याची स्फूर्ती घ्यावी; ज्याच्या शब्दसृष्टीचे परिशीलन करावे आणि स्वत: भाषाप्रभू म्हणून मिरवावे; ज्याच्या राष्ट्र-निष्ठेचे दर्शन घ्यावे आणि आत्मार्पणाच्या अमर कीर्तीचे लेणे आपण ल्यावे, त्या वीराचे कथानक इथे विसावले. बंधनाचा सागरकिनारा फोडण्यासाठी पुन्हा पुन्हा वेगाने धावणाऱ्या व किनाऱ्यावर आदळून फुटताना गगनाशी भिडणाऱ्या विमुक्त लाटांची बायरन ही झुंजार कहाणी आहे; पश्चिमेस मावळतानाही क्षितिजाला सोनेरी साज देणाऱ्या सूर्याचे हे स्वगत आहे.

★ आणि एकोणीसाव्या शतकाच्या अखेरीस मराठी वाङमयक्षितिजावर एक लुकलुकणारा तारा नव्यानेच चमकू लागला. बायरनप्रमाणेच वाणीत

मधू व नजरेत जादू असलेला[3] विनायक जनार्दन करंदीकर १५ सप्टेंबर १८७२ ला, पांझरा नदीच्या पुराच्या दिवशी, धुळ्याला जन्माला आला. मुळातच विनायक वृत्तीने कवी; त्यात दोन्ही वडील भावांच्या कवित्वाची परंपरा पाठीशी असलेली. त्यामुळे त्याच्यात काव्यगुणांचा विकास न होता तरच नवल. भाषेला पद्यरूप देण्याची त्याची हौस मुलुखावेगळी होती. गद्य निबंधही पद्यातून लिहिण्याचा हव्यास त्याला शाळेतच लागला. भाषेला पद्यरूप देण्याचे त्याचे वेड पुढे इतके वाढले की,कवितेच्या भेंडचा खेळत असताना शीघ्रकवित्व करून तो आपल्या मित्रांना सहजी हरवू लागला; आणि इथेच त्याच्या पुढील काव्यकृतींतील बोथट अनुभूतींचे बीज रूजले. उत्स्फूर्त भावनांचा सहजोद्रेक किंवा आत्मानुभूतीचा आविष्कार ह्या कवितेच्या गाभ्याकडे दुर्लक्ष होऊन यमकांच्या जुळवणीकडे पुढे त्याच्या काव्यगुणांनी व कल्पनाशक्तीने जी धाव घेतली ती त्याच्या शालेय निबंधालाही पद्यरूप देण्याच्या अट्टाहासातून बीजरूपाने दिसून येते. म्हणूनच पुढे सौंदर्यकवी शेली व भावकवी बायरन यांचा काव्यपरिचय त्याला होऊनही शाळेत त्याने भाषांतर केले ते ग्रीन्सच्या 'फेअरी टेल्स' मधील शंभर कथांचे, ग्रे कवीच्या एलेजीचे आणि 'नीतितत्त्वे' या मथळ्याखाली दि प्रिन्सिपल्स ऑफ मोरॅलिटीचे ! जात्याच वाङमयाची तुडुंब आवड असलेल्या विनायकाचा गणित हा तेवढाच नावडता विषय होता. तसे पाहले तर शालेय अभ्यासक्रमाकडेच त्याचे संपूर्ण दुर्लक्ष होते आणि अभ्यासाचा गाडा त्याने जेमतेम स्कूल फायनलपर्यंत ढकलत नेलेला होता.[4] असे असले, तरी विनायकाला वाङमयात मात्र विलक्षण रूची होती आणि मराठी भाषेबद्दल श्री ज्ञानेशांचा, किंवा दामोदर भट्ट बोरीकरांचा किंवा 'राजा शिवाजी' कर्त्या कुंटयांचा जो

---

३. "विनायकांच्या आवाजात मधु व डोळयात जादू असल्याच्या" अनंत तनयांच्या विधानाला भ. श्री. पंडितांनीही पुष्टी दिलेली आहे. "आपले लहान बंधू दत्तात्रय यांना लिहितात, "I regret, the meter though sweet, you cannot enjoy without me." यावरून वाणीतील मधू स्पष्ट होतो." "विनायकांची कविता" पृ. २४. ओळ १ ली व तीवरील टीप.

४. विनायकांची कविता. पृ. २०.

जाज्वल्य अभिमान तोच कवी विनायकाचाही होता. त्याने आपल्या अभ्यासाच्या खोलीत,

> "वाटे ज्या बाळगणे प्राकृत भाषाभिमान हे पाप
> होवो न उंबरा हा चढण्याचा त्याजला कधी ताप"

ह्या लिहून ठेवलेल्या आर्येने त्याचा स्वभाषाभिमान स्पष्ट होतो.

विनायक हा काव्यातच नव्हे तर काव्यचर्चेतही दिलखुलास रस घेणारा रसिक भ्रमर होता. १८९१-९२ साली तो स्कूल फायनलच्या परीक्षेला बसला होता. आधुनिक मराठी कवितेचे जनक केशवसुत मुंबईला असताना विनायकाच्या भेटीला गेले. बायरन शेलीला भेटावा, किंवा वर्डस्वर्थ कोलरिजबरोबर काव्यचर्चेत रंगून जावा, तसेच केशवसुत-विनायकाचे नाते जुळले. दोघेही शब्दात गुंतले, नादात गुंगले आणि वादात रंगले; इतके की, केशवसुतांना त्या दिवशी नोकरीवर जाण्याचे स्मरण राहले नाही आणि विनायकाला परीक्षेला जाण्याचे भान उरले नाही. आणि त्या क्षणापासून विनायकांचा शालेय शिक्षणाचा संबंधच तुटला.

१८९३ साली विनायकाचा विवाह झाला. "ते संसारपाशात अडकले खरे पण त्यांचे गृह्य वर्तन अत्यंत बेफिकीरीचे असे. सरस्वतीबाईचे अंगी नवऱ्याला आपलेसे करून घेण्याची करामत नव्हती म्हणून म्हणा किंवा विनायकांना आपले मन रंगविण्याइतके काव्य आपल्या पत्नीत आढळले नाही म्हणून म्हणा, एवढी गोष्ट खरी की, खरे संसारसुख उभयतांनाही लाभले नाही."

बायरन आणि विनायक! वैवाहिक दुःखाच्या दृष्टीने या दोघात केवढे विलक्षण साम्य! दोघांच्याही नशिबी संसाराची फुलबाग नव्हे, तर वाळवंट आलेले. पण 'अपराध कुणाचाही असो त्याची जबाबदारी माझी आहे व म्हणून उत्तरदायित्वही मीच स्वीकारणार' ही बायरनची बाणेदार वृत्ती आणि 'केला हट्ट तुवाच दोष मजला कां लाविशी तू तरी' ही विनायकाची जबाबदारी टाळण्याची वृत्ती, यात निश्चित फरक दिसतो.

कवीचे हळुवार अंतःकरण असलेल्या ह्या फुलपाखराला पोलिसची

रुक्ष नोकरी कशी रुचावी ? पण तीही करणे त्याच्या नशिबात आले. अर्थात्, विनायक त्या नोकरीत फार दिवस टिकला नाही, यात नवल नाही. पण नोकरीवरून सुटल्यावर तो फरार झाला होता आणि काही काळ अज्ञातवासात राहला होता. म्हणजे नोकरी सुटली, याला कारण, त्याला ती रुचत नव्हती किंवा त्याच्या कविपिंडाला जुळत नव्हती, हे नव्हे; तर नोकरीत त्याने काहीतरी 'भानगड' केली होती. पैशाच्या अफरातफरीमुळे सरकारी नोकरावर फरार होण्याचा प्रसंग येतो, हा सामान्य अनुभव आहे. परंतु विनायकाच्या चरित्रात पैशाच्या अफरातफरीचा कुठेच उल्लेख नाही. उलट, फरार झाल्यावर त्याला काव्यलेखनावर दिवस कंठावे लागले व आर्थिक अडचणीमुळे अत्यंत हाल सोसावे लागले, हीच माहिती मिळते.[५] विनायक मुळात देखणा होता; शिवाय स्वच्छंद होता. तो मुलींची मने सहजच आकर्षित करून घेत असावा. एखाद्या पोलीस ऑफिसरची पत्नी किंवा मुलगी हिच्याशी त्याचा अनैतिक संबंध असल्याचे पोलीस ऑफिसरला समजण्याची शक्यता आहे. पोलीस ऑफिसरच्या धमकावणीला भिऊन तो पळाला असावा किंवा त्याला पळून जाण्यात त्याच्या प्रेयसीनेच मदत केली असावी. 'नानावटी' प्रकरण आपल्या डोळ्यापुढे आहेच. पोलीस, मिलिटरी किंवा ज्यांना नेहमी घराबाहेर नोकरीनिमित्त राहावे लागते, त्या नोकर वर्गात ही प्रकरणे फारदा उपस्थित होतात, हे नव्याने सांगण्याचे कारण नाही. विनायक फरार झाला होता, तो, इतर कोणत्याही कारणापेक्षा, त्याला समाज ज्या कारणांनी चारित्र्यहीन समजत होता, त्याच उपरोक्त कारणाकरिता झाला असावा, हाच निष्कर्ष अधिक तार्किक व व्यावहारिक ठरतो.

---

५. नोकरी सुटल्यावर विनायक लपत छपत आश्रयासाठी आपल्या मित्राकडे अजमेरला गेले. वाढलेली दाढी, फाटलेली लक्तरे, भिकाऱ्याचा वेश हे सारे पाहून त्यांना कोणीच ओळखले नाही. विनायक म्हणाले, "तुम्हाला पत्र पाठविणारा कवी विनायक तो मीच !" मित्राचे वडील सनातनी होते. या वेशातला अमंगळ माणूस आपल्याकडे राहावा, असे त्यांना मुळीच वाटेना. त्यांनी ताबडतोब त्याला वाटेला लावले. अशी माहिती एका माहितगाराकडून मिळाली आहे. अर्थात् याला लेखी पुरावा उपलब्ध नाही.

नोकरी सोडून लपतछपत दिवस कंठण्याचे विनायकाचे कोणतेही कारण असले, तरी बेसुमार मदिरापान आणि अतिरिक्त वेश्यागमन ही सर्व आयुष्याची व संसाराची राखरांगोळी करणारी व्यसने त्याला जडली होती हे निश्चित. "एका असिस्टंट कलेक्टरला मराठी शिकविण्याकरिता राहिले असता एका शिरस्तेदाराने हा मंत्रोपदेश दिला." पोलिसखात्यातील नोकरी या कामाला अधिक अनुकूल म्हणून तेथेच ते व्यसन बळावले; अंकुराचे रोपटे झाले.

पण, कोणीतरी हे व्यसन त्याला लावले व म्हणून त्याला लागले, हे म्हणणेही मानसशास्त्रीय दृष्टीने बरोबर नाही. कोणत्याही वर्तनाचे स्वभावात रूपांतर व्हायचे म्हणजे मूळचा पिंड त्याला अनुकूल असावा लागतो. अंत:प्रवृत्ती विरोधी असतील तर बाह्य वातावरणाचा परिणाम फारसा होत नाही. स्फूर्तिप्रद रणगीते गायिली किंवा वीरश्रीयुक्त आवेशाची व्याख्याने दिली, तरी मूळच्या भेकड माणसाला अवसान कुठून येणार ? विनायकांना शिरस्तेदारामुळे व्यसन लागले असेल; पोलिसखात्यामुळे ते बळावलेही असेल; पण त्याचा मूळ पिंडच जर या दुर्व्यसनाला प्रतिकूल असता तर त्याला वारूणीचा स्पर्श झाला नसता; तिच्या आहारी तो गेला नसता.

सत्प्रवृत्त घराण्यात जन्माला येऊनही असे कां व्हावे ? याला कारण त्याच्यावर घरातील वातावरणाचा होत असलेला परिणाम. बलवंत नावाच्या त्याच्या वडील भावाला वारूणीचे जबरदस्त व्यसन होते.[६] बालपणापासूनच त्याच्या संवेदनाक्षम मनावर हे संस्कार प्रत्यही उमटत होते. त्यामुळे नीतिबाह्य वर्तनाचे बाळकडू त्याला घरातच मिळत आले. या संस्कारातून त्याचे मन घडले आणि त्यास अनुकूल नोकरीमुळे तो त्याचा स्वभाव बनला.

एवढे असूनही त्याच्या वाणीत मधू व नजरेत जादू असल्याने तो

---

६. आपल्या आर्येत बलवंत लिहितात,

"दुस्तर मदिरा मोहे ज्ञान, महाज्ञान सर्व लटपटते
घडते असे कसे हे, नवल नसे, अनुभवे मला पटते"

कोणालाही हवाहवासा वाटे. शिवाय दुसऱ्याची नक्कल हुबेहूब वठविणारा तो निष्णात नट होता. त्यामुळे तर बैठकीमध्ये सर्वांचे लक्ष वेधून घेऊन तो एकदम लोकप्रिय होई. तेवढ्यामुळेच तर त्या फरारी, व्यसनासक्त इसमाला सावद्याच्या देशमुखांनी नोकरी दिली. नंतर धरणगावच्या मिशनरी बायांना शिकवण्याची नोकरीही त्याला मिळाली. १९०७ मध्ये तीही नोकरी सोडून नगरदेवळे येथील जहागीरदाराकडे तो कारभारी म्हणून राहला.

तो नट होता तसा नाटककारही होता. १९०९ साली नाट्यकला प्रवर्तक संगीत नाटक मंडळीने त्याचे 'प्रभावती' नाटक रंगभूमीवर आणायचे ठरविले. नाटकाचा व्याप सांभाळायला त्याने कारभाऱ्याची नोकरी सोडली आणि पुण्याचा रस्ता धरला. पण मराठीला विनायक हा नाटककार म्हणून लाभायचा नव्हता. पुण्याला आल्यावर पाच सहा दिवसातच, म्हणजे ३० मार्च १९०९ रोजी, प्लेगने त्याचे प्राणोत्क्रमण झाले.

मदिरेचे, मदिराक्षीचे आणि मातृभूमीचे सारखेच वेड असलेला हा स्वच्छंद कवी वयाच्या अवघ्या अडतिसाव्या वर्षी इहलोक सोडून निघून गेला. अजूनही त्याच्या काव्याचे वेड मराठी माणसाला असावे, यातच तो अमर झाला आहे; अमर राहणार आहे.

"माझे चरित्र इतके विचित्र आहे की, कोणी (ऐकू नये,) ऐकल्यास माझी कविता तो वाचणारच नाही.तरी चरित्र हवे असल्यास कविता पाठविता येत नाहीत."[७] असे म्हणणारा कवी विनायक आणि दिसेल त्या लावण्यवतीवर प्रेम करणारा बायरन यांच्या स्वभावात काही उल्लेखनीय साम्य आढळून येते. मुखावर मोहक कांती असलेले हे दोघेही रसिक कवी मैफलीमध्ये अगदी रंगून जात असत. विनायकाच्या काव्यामध्ये विनोद आढळत नसला तरी मैफलींमध्ये कोट्या करून लोकांना हसविणारा विनोदी माणूस म्हणून तो सर्वश्रुत होता. बायरनही विनोदी असल्याची साक्ष लेडी हेस्टर स्टॅनहोपने दिलेली आहे. पण त्यांच्या स्वभावात महत्त्वाचे व विलक्षण

७. विनायकांची कविता—सं. भ. श्री. पंडित. या ग्रंथातील अनंततनयांनी लिहिलेले विनायकांचे चरित्र पृ. १५

साम्य म्हणजे ते दोघेही स्वभावाने स्वच्छंद होते. बायरनने हा वारसा वडिलांपासून उचललेला होता, तर विनायकांनी तो आपल्या वडील बंधूपासून उचलला असण्याची शक्यता आहे. पण एवढे खरे की, त्यामुळे या दोघांच्याही संसारात विष कालवले गेले.

"काव्यरसापुढे विनायकाला इतर सर्व रस तुच्छ वाटत असत व व म्हणूनच तो काव्याखेरीज बाकीच्या ऐहिक सुखाविषयी निरासक्त असे" म्हणून त्याचा संसार उध्वस्त झाला, असे अनंततनयांचे मत आहे आणि त्यांनी आपल्या विधानाच्या पुष्ठचर्थ कवी विनायकाचे एक पत्रही उद्‌धृत केले आहे. अनंततनयांच्या या विधानाशी सहमत होणे बुद्धिवादाला व वस्तुस्थितीला धरून होणार नाही, हे स्पष्ट आहे. एकतर, अनंततनयांनीच म्हटल्याप्रमाणे "सर्व आयुष्याची व संसाराची राखरांगोळी करणारी ही व्यसने असल्यामुळे त्यांनीच विनायकाचाही संसार धुळीला मिळणे अधिक शक्य आहे," हे तर्कशुद्ध होय. दुसरे असे की, अस्सल कवींना काव्यवेड हे असायचेच. केशवसुत, बालकवी, सावरकर; कुसुमाग्रज, टिळक, तांबे हे आधुनिक कवी किमानपक्षी विनायकाच्याच दर्जाचे नव्हेत काय ? परंतु यापैकी कोणीही व्यसनाधीन नसल्यामुळे ते कवी असूनही व त्यांच्यात काव्यवेड असूनही, त्यापैकी कोणचाही संसार मातीमोल झालेला नाही. या विगनात्मक पद्धतीने विचार केला तरी विनायकांचा संसार काव्यवेडा ऐवजी वारुणी व वेश्याधीनतेमुळेच विस्कटला होता, हेच सिद्ध होते. आपले चरित्र कोणी ऐकू नये, ह्या आपल्या इच्छेमधून त्याला आपल्या नीतिबाह्य चारित्र्याची पूर्ण जाणीव असल्याचे दिसते. इतकेच नव्हे, तर या व्यसनामुळेच त्याची पत्नी त्याच्यापासून दूर जाऊ पाहत होती, याचीही त्याला स्पष्ट कल्पना होती.

" दुर्दैवे जडले मला व्यसन जे, ते साहवेना तुला
होते दुःसह तापदायक, तरी हा मार्ग का चांगला ?"[८]

वेश्यागमन व वारुणी या दोन्ही व्यसनांच्या तावडीत विनायक सापडले होते, ही गोष्ट अनंततनयांनी निर्विवादपणे मान्य केल्यावरही, त्याचा

८. पाहा · कवी विनायकांची 'प्रत' ही कविता.

स्वभाव रंगेल होता, या रहाळकरांच्या विधानाला त्यांनी विरोध करावा, याचे नवल वाटते. कवी म्हणून विनायकाला योग्य तो मान मिळालाच पाहिजे; पण त्याच्याबद्दलच्या आदरभावाने त्याच्या वास्तव स्वभावगुणांचा विपर्यास होणे इष्ट नाही.

बायरन आणि विनायक या दोघांच्या स्वभावगुणातील वरवरच्या समानधर्मी पापुद्र्यापेक्षा विधर्मी पापुद्राच तीव्र स्वरूपाचा वाटतो. त्यांच्यातील साम्य उल्लेखनीय असेल; पण विरोध विलक्षण आहे. बायरन हा एका पायाने लुळा होता, तरी दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर त्याने क्रिकेटमध्ये नैपुण्य व पोहण्यात प्राविण्य मिळवले होते. मुष्टियुद्धातही तो निष्णात होता. उलट, विनायक शरीराने अव्यंग असूनही खेळामध्ये त्याचा लौकिक कधीच नव्हता. बायरनची कणखर कर्तृत्वशक्ती आणि अमर्याद धडाडी यांचा विनायकात लवलेशही आढळत नाही. आपण मार्शल व्हावे हे बायरनचे लहानपणापासूनचे आवडते स्वप्न; केवळ अधुपणामुळे साकार न झालेले; उलट, विनायकाला "बिचाऱ्याला प्रथम पोलिसमध्येच नोकरी करावी लागली, पण हा जुलुमाचा रामराम फार दिवस टिकला नाही." बायरन हा मुळातच महत्त्वाकांक्षी तरुण होता. आपण सेनापती व्हावे ही त्याची पहिली मनीषा आणि सर्वश्रेष्ठ कवी व्हावे, ही त्याची दुसरी आकांक्षा. विनायकाचे जीवन महत्त्वाकांक्षेने प्रेरित झाले होते, असे त्यांच्या उपलब्ध चरित्रावरून तरी वाटत नाही. दोघेही मैफलीत रंगत असत. परंतु सभेमध्ये विनायक कधी चमकला नाही. तो बैठकीत धीट असला तरी स्वभावाचा, व म्हणून समाजात, लाजाळूच. उलट, बायरनने पार्लमेंटमधील आपल्या वक्तृत्वाने संपूर्ण देशाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते. मातृभूमीच्या भक्तीचा परिपोष दोघांच्याही काव्यातून आढळून येत असला, तरी बायरनला राजकारणात जी अवीट गोडी होती, तिचा मागमूसही विनायकात आढळत नाही. बायरन देशभक्त तसाच सुधारकही होता. विनायकावर आगरकरांपेक्षा टिळकांचाच प्रभाव अधिक असल्याने तो सुधारक केव्हाच नव्हता. इतकेच नव्हे, तर केशवसुतांनी विनायकांना स्वभावातील ज्या स्वैरतेमुळे बायरन म्हटले, त्या गुणविशेषातही समानतेपेक्षा

भेदच मोठा वाटतो. विनायक गडकऱ्यांसारखा किंवा कोलरिजसारखा मदिरासक्त होता; तसा बायरन नव्हता. पाश्चात्यांना मद्यपानाचा विधि-निषेध नसल्याने त्याने मदिरास्पर्श केला नसेल, असे नाही; पण तो त्या व्यसनाच्या आधीन कधीच गेला नाही. दुसरे असे की, विनायक वेश्यागमनी होता, असे त्याच्या चरित्रावरून स्पष्ट दिसते. सुंदर व संपन्न पोरींवर प्रेम करणे हा बायरनचा ध्यास होता; पण तो वेश्येची माडी कधी चढल्याचे त्याच्या चरित्रात नमूद नाही. सौंदर्यासक्ती हा त्याचा आत्मा होता. म्हणून सुंदर पोरींवर तो प्रेम करीत सुटला होता. उलट, विनायकात सुंदरतेच्या आकर्षणापेक्षा रंगेलपणाचाच भाग अधिक आहे. हा भेद वरवरचा नव्हे. त्यामागील मूळ प्रवृत्ती वेगवेगळी असल्याचे हे द्योतक आहे. स्वच्छंद प्रीती हे पाप नव्हे, तर तीच नैसर्गिक आहे आणि विवाह संस्था वगैरे समाजाची कृत्रिम बंधने आहेत, अशी बायरनची धारणा होती. म्हणून कृत्रिमतेकडून नैसर्गिकतेकडे धाव घेणाऱ्या या रोमँटिक कवीचे ते बंडखोरीचे तत्त्वज्ञानच होते.[१]

या उलट, कवी विनायकाने जुन्या कल्पनांचाच आदर्श उराशी बाळगला होता.

---

१. डॉन जॉनमध्ये हैडाच्या पाखरासारख्या स्वच्छंद प्रीतीचे गोडवे गाताना बायरन लिहितो :

"So that there were no reasons for their loves
More than for those of nightingales or doves
. . . She was all which pure ignorance allows
And flew to her young mate like a young bird.
. . . She loved and was beloved-she adored
And She was worshiped after nature's fashion."

नंतर विवाह संस्थेवद्दल तो म्हणतो :

. . . And we are sick of its hack sounds and sights
Intrigues, adventures of tle common school,
Its petty passions, marria͟es and plights."

दा. २१.

"संतसत्कथाश्रवण डुलावी श्रवणी कर्णफुलें
पतिवचनाची शिरी करावी धारण नित्य फुलें"१०

त्याच्या खंडकाव्यातही पूर्वसुरींचाच सूर उमटला आहे; त्यात बंडखोरी नाही. म्हणजेच, स्वैरता हे बायरनचे तत्त्वज्ञान आहे, तर विनायकाची ती केवळ प्रवृत्ती आहे. बायरनने प्रणय प्रकरणे केली आणि विनायक वेश्यागमनी झाला, यातच सारे काही आले.११ मग विनायकाला बायरन म्हणता येईल का ?

★ यावरून त्यांची जीवनदृष्टीही स्पष्ट होते. मानवी जीवनाचे अंतिम सुख व साध्य जीवन-विमुक्ततेत आहे, बंधनात नाही; नैसर्गिकतेत आहे, कृत्रिमतेत नाही; अशी बायरनची विचारप्रणाली आहे. संपूर्ण जीवन विमुक्त असावे व जीवनाचे सर्व पैलू शृंखलाविहिन राहावेत, ही जीवनदृष्टी बायरनने स्वीकारली आहे. उलट, परंपरेची चाकोरी सांभाळूनच स्वातंत्र्याचा पुरस्कार केला पाहिजे, अशी विनायकाची जीवनदृष्टी आहे. पुनरुज्जीवन हाच त्याचा हेतू आहे.

आमचा गुरु श्री शिवराणा
पुनरुज्जीवन हेतू पुराणा
महाराष्ट्र वीर्याचा बाणा
संकटी वाहू

असे त्याचे 'शिवराज दर्शन' मधील निवेदन आहे. म्हणूनच, बायरनला राजा-प्रजा या पद्धतीत जशी कृत्रिमता आढळली, तशी विनायकाला दिसली

---

१०. विनायकाची 'अलंकार' कविता पाहा.

११. म्हणून बायरनच्या बाबतीत पश्चात्तापाचा प्रश्न उद्‌भवला नाही. उलट, विनायकाला आपल्या वर्तनाचा पुढे पश्चात्ताप झाला असावा, असा निष्कर्ष भ. श्री. पंडितांनी (विनायकाची कविता, पृ. ४५) काढला आहे.

नाही. "हळूहळू राजेपण लयाला जाईल व लोकतंत्राचा उदय होईल. त्याकरिता प्रसंगी रक्ताच्या नद्याही वाहतील. पण ही क्रांती अटळ आहे. कदाचित् ही क्रांती पाहण्याचे भाग्य माझ्या पिढीला लाभणारही नाही. पण लोकराज्याच्या काळाची पावले मला स्पष्ट दिसताहेत," असे भविष्यकालाचे महान भाष्य बायरन करून गेला आहे. याचे कारण, राजकीय जीवन हा संपूर्ण जीवनाचा एक पैलू, व म्हणून, राजकीय स्वातंत्र्य हे मुक्त जीवनाचे एक अंग, असे तो मानतो. उलट, आगरकरां-सारखा सुधारक पाठीशी असूनही, विनायक बायरनप्रमाणे तर सोडाच, पण केशवसुतांइतकाही सुधारक होऊ शकला नाही. सनातन बंधनातच आदर्श अंगभूत आहे. व त्यातच समाजविकास अनुस्यूत आहे, अशी विनायकची श्रद्धा. समाजातील उच्चभ्रू लोकांची भयानक पापं सांगण्याचा आणि त्यांचे सोज्वळ मुखवटे फाडण्याचा विडा उपहास पद्धतीने बायरनने उचलला आहे, तसा विनायकाचा कुठेही प्रयत्न नाही; याचे कारण, त्यांच्या जीवनदृष्टीतील भेद हेच होय. विनायकाला बायरन म्हणायचे, तर ते कोणत्या अर्थाने म्हणता येईल ?

या दोघांच्याही काव्यात वाङ्मयीन दृष्टीने बरेचसे साम्य आहे. दोघांचीही कविता मातृभूमीप्रीतीने ओथंबलेली आहे. 'महाराष्ट्र लक्ष्मी माते जगी धन्य वाटे' असे सांगून विनायकाने आपल्या मातृभूमीबद्दल अपार आदर व्यक्त केला आहे, तर आंग्ल समाजाचा मनोमन तिरस्कार करूनही, बायरन, "England, with all thy faults I love thee still असे उत्कट प्रेम आपल्या मातृभूमीवर व्यक्त करतो आहे. "साहेना परबंधनात पडली माझी महाराष्ट्र भू" असे आपल्या मनातील पारतंत्र्याचे शल्य, शिवाजीच्या निमित्ताने, विनायक बोलून दाखवतो आणि A land of slaves will never be mine असे बायरन बजावतो. पूर्वजांच्या पराक्रमाचे पवाडे गातांना व्याकूळ मनाने विनायकाने, "निपजणार कोण धनाजी। तारण्या मराठे शाही। यापुढे. . .अटकेवर झेंडे न्याया। आणिता कुठून भरारी। यापुढे" असे उद्‌गार काढून सद्यकालीन कर्तृत्वहीन पिढीबद्दल उदासीनता व्यक्त केली आहे, तर बायरनच्या

"My fathers ! the tears of your country redress ye
How you faught ! How you died ! Still her annals can tell !"
"What should thy sons do ? anything but weep
And yet they only murmer in their sleep
In contrast with their fathers !... या ओळींतून नेमके तेच विचार व्यक्त झाले आहेत. दोघांच्याही काव्यात असे आशा–निराशेचे द्वंद्व ठिकठिकाणी आढळते.

पण हे सारे असले, तरी बायरनची उत्कटता विनायकाच्या कवितेत आढळत नाही आणि येथेच खरा फरक जाणवतो. बायरनच्या जीवनाशी निसर्ग जसा वेळोवेळी उत्कटनेने एकरूप झाला आहे, तसे विनायकाचे नाही· त्याला आहे, ते केवळ आकर्षण. प्रणयपर काव्यात विनायकाने,

मज निंदो निंदी जन, धरले मी तुझे चरण
होवो झाले त्रिभुवन त्यात पारखे ।

अशा ओळीतून बायरनच्या अत्युत्कटतेची उंची गाठली आहे. पण, त्यात विवाह संस्थेसारखी समाजबंधने तोडण्याची, बायरनची, प्रतिज्ञा नाही. विनायकाच्या अंत:करणाची उत्कटता इतरांच्या प्रत्ययाला आली असती, तर काव्यातील उत्कटतेचा संबंध त्यांनी त्याच्या मनाच्या उत्कटतेशी तेव्हाच जुळवला असता. पण तसे नसावे; व त्याच्या मनातील आणि कवितेतील राष्ट्रीय भावनेच्या उत्कटतेत अफाट अंतर पडले असावे. एरवी, कवीचे मन व तो करतो ती कविता यांचा काहीच संबंध नसतो काय ?, असा प्रश्न त्याला विचारण्याची कोणाला गरजच भासली नसती.[१२] शि. म. परांजपे व शंकरराव देव एकदा गोदावरी किनारी भटकत असताना, मराठेशाहीतील स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून उभवल्या गेलेल्या; पण आता भग्न होऊन पडलेल्या स्तंभाकडे पाहत असताना, शिवरामपंतांचे मन पूर्ववैभवाच्या स्मरणाने व्याकूळ झाले आणि त्यांच्या डोळ्यातून घळघळा अश्रू वाहू लागले, अशी एक आठवण शंकरराव देवांनी सांगितली आहे.[१३] हीच

१२. शंकर श्रीकृष्ण देव यांनी विनायकाला हा प्रश्न विचारला होता. (विनायकांची कविता, सं. भ. श्री. पंडित, पृ. २६–२७)

१३. काळकर्ते परांपजे–ले. वा. कृ. परांजपे.

उत्कटता बायरनमध्ये सापडते.[१४] कुसुमाग्रज आपल्या 'बायरन' या कवितेत म्हणतात,

"वेगे आदळती प्रमत्त गिरीशा लाटा किनाऱ्यावरी ।
पाषाणी फुटती पिसूनी कणिका लक्षावधी अंबरी ।।
आणि झिंगूनी धावती पुनरपी झुंजावया मागूनी ।
मासे वादळ भव्य उग्र असले त्या गर्व-गीतातूनी ।।"

ही भावनोत्कटता आणि संवेदनक्षमता विनायकात अभावानेच आढळते.

★ बायरनचा काव्यविषयक दृष्टिकोण बदलत गेला असला, तरी कोणत्याही विधायक कार्यापेक्षा काव्य श्रेष्ठ आहे, असे त्याला कधीच वाटले नाही. करण्यासारखे चांगले कार्य हाताशी असले, तर कोणीही लेखनात वेळेचा अपव्यय करू नये आणि त्यातल्यात्यात कविता तर मुळीच करू नयेत, असा त्याने सुरूवातीला संदेशच दिला होता. उलट, 'कवी नृपांचा नृपपददाता' व 'चिरंतनाचा विधाता' आहे, अशी विनायकाची धारणा आहे. कविता ही फकिरी आहे, असे तो एका पत्रात म्हणतो. इटलीमध्ये असताना बायरनने काव्य करण्यापेक्षा गनपावडर कशी करावी, पहाडावर गनिमीयुद्ध कसे करावे इत्यादीचे शिक्षण लोकांना द्यायला सुरुवात केली होती. या बाबतीत, विनायकांचे मातृभूमीवरील प्रेम लक्षात घेऊनही, त्याची विधायक कार्याबद्दलची निष्क्रियता तुलना करण्याजोगी आहे. बायरन पुढे काव्य करतो ते विधायक कार्याचे एक अविभाज्य अंग मानूनच. काव्य व जीवन हे त्याला एकरूप वाटते. त्याच्या काव्यात उत्कट जीवनानुभूती आढळते, ती याचमुळे. ही दृष्टी विनायकात नाही. त्याची भूमिका उपदेशकाची, शिक्षकाची आहे; आलेले जीवनानुभव जिव्हाळ्याने सांगणाऱ्या सुहृदाची नाही.

---

१४. "Jeffery says," "It is really impracticable to distinguish the Auther & the Hero. Not only do the auther and his hero travel and reflect together-but in truth, we scarcely ever have any notice to which of them the sentiments so energetically expressed are to be ascribed." Byron-A Critical Study A. Rutherford. p. 50.

एका पत्रात[१५] तो लिहितो, "हल्लीच्या लोकस्थितीस काही विशेष बोध काव्यद्वारा व्हावयास पाहिजे आहे, असे मी समजतो. तिकडे माझ्या बहुतेक कविबंधूंचे अलक्ष दिसते. ती उणीव दूर व्हावी, म्हणून या उपाख्यानांचा जन्म आहे." यावरून बोध हे त्याचे काव्यप्रयोजन स्पष्ट होते. 'स्व' ला जाणवले म्हणून नव्हे, तर कविबंधूंचे अलक्ष होते, म्हणून त्याने कविता लिहिली. यातच त्याच्या कवितेत अनुभूतीची बोथटता किती असेल, याचीही जाण येते.

* "विनायक स्वभावतःच सत्प्रवृत्त, सश्रद्ध व सुधीर होते; परंतु परिस्थितीच्या फेऱ्यात त्यांच्या या स्वभावगुणांची माती झाली" असे भ. श्री. पंडित[१६] म्हणतात. ऑगस्टाला लिहिलेल्या पत्रात "मुळात मी वाईट हृदयाचा नाही; पण परिस्थितीने आणि इतरांनी दिलेल्या वागणुकीने मी पाषाणहृदयी बनलो आहे आणि आता तर, शेवटपर्यंत माझे मन दगडाचे करण्याचा माझा बुद्धिपुरस्सर प्रयत्न चालू आहे" असे बायरन म्हणतो. ज्यामुळे बायरन स्वच्छंद बनला होता ती त्याची सौंदर्यासक्ती व विनायकाचे वारूणी–वेश्येचे व्यसन यात निश्चित भेद असला, अथवा त्यांच्या तात्त्विक अधिष्ठानात अंतर असले; तरी ते दोघेही वृत्तीने स्वच्छंद होते, हे खास; शिवाय, या दोघांनीही मातृभूमीप्रेमाची व स्वातंत्र्याची गाणी गायिली आहेत; एवढ्याच वरवरच्या अर्थाने विनायकाला महाराष्ट्राचा बायरन म्हणता येणे शक्य आहे. केशवसुतांचाही आशय हाच असावा; कारण, केशवसुतांनी हे विधान केले तेही गमतीनेच. इतर कोणत्याही दृष्टीने या दोघात फारसे साम्य आढळत नाही. बायरनची सौंदर्यासक्ती व तत्त्वज्ञान, एवढेच नव्हे, तर नवेनवे शब्द घडविण्याची किमया लक्षात घेता, विनायका-ऐवजी माधव जूलियनच बायरनला अधिक जवळचे नाहीत काय ?

१५. हे पत्र रा. रा. गोविंद पांडुरंग देवधर यांना ५-९-१९०५ ला लिहिले आहे. (विनायकाचे चरित्र–अनंततनय)–विनायकाची कविता, पृ.२८

१६. विनायकाची कविता, पृ. ४७.

# २. तत्कालीन जनतेचा वाचस्पती

* मते आणि मतभेद
* कविता–काल
* मजूर वर्गाचे प्रश्न
* शेतकरी वर्ग
* स्त्री जीवन
* हरिजनांची समस्या
* व्यापारी–चळवळ
* संकुचित राजकीय विचार

* काळाचा परिणाम कविमनावर व म्हणून काव्यावर अपरिहार्यतेने होत असतो. कवी ज्या प्रमाणात आणि ज्या संदर्भात काळाशी समरस झाला असेल,त्याच प्रमाणात आणि त्याच संदर्भात ते संस्कार काव्यातून आविष्कृत होत असतात. कवी समाजाभिमुख असेल, तर साधारणत: त्याची कविता तत्कालीन समाजाची प्रातिनिधिक ठरणे स्वाभाविक असते. कवी समाजविन्मुख असेल,तर कवितेत बहुधा पलायनवादाचे चित्र आढळते.विनायकाचे भाग्य(?) असे की, जसे काही मान्यवर टीकाकारांनी त्याला समाजाशी समरस होणारा जनतेचा वाचस्पती म्हणून मानले, तसेच काही नामवंत साहित्यिकांनी त्याला समाजविन्मुख पलायनवादी कवी म्हणून संबोधिले. इतकी परस्परविरोधी मते क्वचितच एखाद्याच्या वाट्याला आली असतील.

विनायक हा तत्कालीन जनतेचा वाचस्पती होय. –वा. ब. पटवर्धन[1]

समकालीन राजकीय व सामाजिक घटनांच्या बाबतीत त्यांचे चित्त सर्वस्वी उदासीन होते. –रा. शं. वाळिंबे[2]

---

१. विनायकाची कविता, पृ. ६ २. साहित्यातील संप्रदाय, पृ. १८३

प्रचलित परिस्थितीशी समरस होण्याचे सामर्थ्य विनायकांप्रमाणे त्यांच्या एकाही समकालीनात नव्हते. —म. श्री. पंडित[३]

भूतकाळातील स्वप्नरंजनामुळे समाजाच्या वर्तमान दुःखाची झळ विनायकाच्या कवितेला लागली नाही. —म. वि. राजाध्यक्ष[४]

लोकगंगेचे नुसते दर्शन घेणारा नव्हे, तर तीत विमुक्त व स्वच्छंद विहार करणारा आणि तिच्या भावभावनांशी एकरूप होणारा भाष्यकारच जनतेचा वाचस्पती होऊ शकतो. विनायकाला लोकजीवनाचे कितीसे दर्शन घडले होते आणि जनता जनार्दनाशी ते कितीसे तदाकार झाले होते, या निकषावरच, पटवर्धन म्हणतात तसे, त्यांना तत्कालीन जनतेचा वाचस्पती म्हणणे योग्य की अयोग्य हे ठरणार आहे.

* विनायकाची काव्यलतिका १८९३ मध्ये वहरून आली. त्यानंतर या लतिकेवर १९०८ पर्यंत बहरलेल्या नवनवीन कुसुमांच्या परिमळाने साऱ्या महाराष्ट्राचे मन मोहून टाकले.[५] अजूनही त्यांचा भावगंध दरवळतो आहेच. विनायकाच्या कवितेच्या काळात जनता भारावली होती, ती टिळकांच्या स्वराज्याच्या महामंत्राने. इंग्रजी राजवटीने पेंढाऱ्यांचा उपद्रव किंवा सतीची चाल या सारख्या समस्या समूळ संपविल्या असल्या, तरी नव्या राजवटीबरोबर नव-युगातील नव्या समस्यांचाच नव्हे, तर नव्या आकांक्षांचाही जन्म झाला होता. समाजातील प्रत्येक घटकाला आपापली

---

३. विनायकाची कविता, पृ. ५९ ४. पाच कवी, पृ. १०६

५. उपलब्ध प्रसिद्धिकालावरून हा काळ निश्चित केला आहे. या दृष्टीने लाँगफेलोच्या 'साम ऑफ लाईफ'चे भाषांतर असलेली 'जीवित महिमा' ही त्याची पहिली कविता म्हणावी लागेल. ती सत्कार्योत्तेजक सभेच्या स्थापनेच्या दिवशी, म्हणजे १९ मे १८९३ ला 'अष्टक' म्हणून विनायकाने लिहिली होती. तत्पूर्वीचे त्यांचे ग्रेच्या विलापिकेचे रूपांतर, ग्रिमच्या परिकथांचे रूपांतर आणि तीर व गाणे ह्या कविता अनुपलब्ध असल्याने काव्यकालगणनेच्या दृष्टीने त्यांचा विचार करता येत नाहीत. शेवटची उपलब्ध कविता, 'सोंगटीचा खेळ', ही जुलै १९०८ मध्ये प्रसिद्ध झाली.

म्हणून स्वतंत्र गाऱ्हाणी असल्याची जाणीव नव्यानेच होऊ पाहत होती. मजूर, व्यापारी, शेतकरी, स्त्रीवर्ग हे सारे हळुहळू सचेतन होऊन स्वहक्का-करिता लढा देण्याच्या तयारीला लागल्याची चाहूल येत होती. त्याचबरोबर, तत्कालीन राजकीय पुढारी राजकीय स्वातंत्र्याकडे वादळी वेगाने वाटचाल करीत होते. अशा काळात विनायकांच्या कविता जन्मल्या आणि जगल्या आहेत. 'काळ'कर्ते जेव्हा इंग्रजी राजवटीवर वक्रोक्तीने वार करीत होते आणि "सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय ?" असा सवाल, सिंहगर्जनेने, केसरी करीत होता, तेव्हाच विनायकाच्याही कवितेचा उषःकाल झालेला होता.

★ तत्कालीन मजुरांची स्थिती कमालीची हलाखीची होती. गुलामाचे जीवन त्याच्या नशिबी आले होते. घरच्या बायकापोरांना पोसायला तो रात्रंदिवस कष्ट करूनही समर्थ ठरत नव्हता. केशवसुतांनी वर्णिल्याप्रमाणे 'मजुरावर उपासमारीची पाळी' आल्यामुळे,

'हे लाडके आणिक लाडक्यांनो !
दावू तुम्हा तोंड कसे फिरोन ?
जन्मास मी काय म्हणोनी आलो
येताच वा का न मरोनी गेलो ?

हे त्याने काढलेले उद्गार तत्कालीन मजुराचे वास्तवदर्शन घडवि-णारे आहे.या परिस्थितीची जाणीव भावनिक दृष्टीने केवळ कवींनाच होती, असे नव्हे, तर वैचारिक दृष्टीने समाजधुरीणांनाही होती. 'रेल्वे कंपन्या व रेल्वेकडील नोकर' या लेखात आगरकरांनी १८९१ सालीच औद्योगिक क्षेत्रात स्वामी-सेवकांचा वर्गकलह निर्माण होत असून मजुरांनी न्याय्य हक्काकरिता संपाची तयारी करणे आवश्यक असल्याचे सांगितले आहे. वर्गकलहाचा विपरीत परिणाम राज्यक्रांतीत होण्याचा धोका निवेदन करतांना ते म्हणतात, "मजुरांनी काबाडकष्ट करून आवश्यकतेचे आणि चैनीचे पदार्थ उत्पन्न करावे आणि त्यांचा उपयोग वरील दोन वर्गातील (केवळ चिंतन व ग्रंथलेखन करणारे किंवा केवळ सुखाभिलाषी श्रीमंत)

किंवा मधल्या वर्गातील लोकांनी घ्यावा, असे आजपर्यंत बऱ्याच अंशी होत आले आहे व पुढेही अल्पकाळात या स्थितीत विशेष फेरबदल करता येईल, असे वाटत नाही . जेव्हा या असमतेची परमावधी होते, तेव्हा घनघोर राज्यक्रांती होऊन समाजचे समाज लयास जातात, धुळीस मिळतात किंवा त्यात अपूर्व स्थित्यंतरे होतात."[६] तत्कालीन समाजात मजुरांचा वर्ग संख्येने बराच मोठा असून, त्यांचे ज्वलंत प्रश्न समाजाला भेडसावत असल्यामुळेच, केशवसुतांनी त्याचे जिवंत चित्र रेखाटले आणि आगरकरांनी दूरदर्शी भाष्य केले,[७] पण विनायकाचे मात्र तिकडे यत्किंचितही लक्ष गेलेले नाही.

* १८७५ सालीच पुणे, सातारा व नगर या जिल्ह्यात 'दख्खनचे दंगे उद्भवले होते.' हे दंगे म्हणजे दुसरे तिसरे काही नसून शेतकऱ्यांनी केलेला अन्यायाविरूद्ध उठाव होता. या उठावणीमागे महात्मा फुल्यांची प्रेरणा होती, असे मानायला भक्कम आधार आहे. डिसेंबर १८७४ मध्ये कर्डे या गावापासून या दंग्यांना सुरुवात झाली. सुपे, केडगाव, पिंपळगाव, राहू, दौंड, मोरेगाव, आंबेखुर्द, अलिगाव, धारूर येथील दंगलीत कित्येक सावकारांची घरे जाळण्यात आली. भीमथडी तालुक्यातील १७, शिरूर तालुक्यातील १०, हवेलीतील ३ व इंदापूरमधील १, अशा ३१ खेड्या-तील दंगे पोलिसांनी दडपशाहीच्या जोरावर जिरवले. सातारा व नगर जिल्ह्यातही अशाच प्रकारचा उठाव शेतकऱ्यांनी केला. या सर्व दंग्यात एक विलक्षण साम्य आढळते. ते हे की, त्यांनी सावकारांवर व विशेषतः त्यांच्या कागदपत्रावर हल्ला केला; व ती कागदपत्रे जाळण्याच्या हेतूने त्यांची घरे जाळली. हा त्यांच्या कर्जबाजारीपणाचा वैताग होय. १८६६ मध्ये जेथे ७५२ खाती नोंदली गेली होती, तेथे १८७३ मध्ये, म्हणजे केवळ ७–८ वर्षाच्या कालावधीतच, जवळ जवळ दुप्पट, म्हणजे १४१४, खाती नोंदल्याचे नमूद आहे. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचे भेसूर पण वास्त-

६. आगरकर निबंध संग्रह, भाग १ पृ. ५६–५८

७. १९०८ साली मुंबईला स्वयंस्फूर्तीने झालेला सार्वत्रिक संप येथे विचारात घेणे आवश्यक आहे.

विक दृष्य यामुळे स्पष्ट होते.[८] वीस वर्षापूर्वीची शेतकऱ्यांची ही स्थिती विनायकाच्या काळातही फारशी सुधारली नव्हती. इतकेच नव्हे, तर १८९६ च्या दुष्काळात ती अधिकच भयाण झाली होती. पण, तेव्हा लोकमान्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांच्या चळवळीला बंडखोरीचे स्वरूप न येता आपल्या हक्काकरिता लढा देण्याचे विधायक स्वरूप येऊ पाहत होते. ही शेतकऱ्यांची चळवळ फोफावू लागली होती; त्याचबरोबर अधिकाऱ्यांची दंडुकेशाही आणि दहशत वाढू लागली होती. टिळकांच्या व सार्वजनिक सभेच्या प्रचारकांच्या सभांना हजारो शेतकरी हजर राहून, आपले हक्क समजावून घेऊ लागले होते. "पोलिसांच्या पेटलेल्या बंदुकीच्या टप्प्यात भरलेली रयतेची जंगी सभा" या मथळ्याचा टिळकांचा तत्कालीन लेख इतिहासप्रसिद्ध आहे. या सर्व प्रक्षोभक घटना विनायकाचे काव्य बहरत असलेल्या काळातीलच होत. तरीही संपूर्ण शेतकरी वर्गासंबंधाने विनायक सर्वस्वी उदासीन राहिलेला आहे.

* स्त्री जातीची उन्नती शिक्षणप्रसारानेच होणार आहे, हे सत्यशोधन प्रथमतः महात्मा फुल्यांनी केले आणि पहिली मुलींची शाळा, १८४८ मध्ये पुण्याला स्थापन केली. ९ कोटी ९७ लक्ष स्त्रियांपैकी ९ कोटी ९५ लक्ष स्त्रिया अक्षरशून्य आहेत, हे विदारक सत्य पंडिता रमाबाईने हंटर कमेटीपुढे १८८२ साली मांडले होते.[९] आगरकरांनीही 'स्त्रियास चरितार्थ शिक्षण' देण्याची आवश्यकता प्रतिपादिली होती. स्त्रियांची खरी गुलामगिरी राजकीय पारतंत्र्यात व पारतंत्र्यामुळे नसून पुरुषप्रधान समाजरचनेत त्यांच्या हक्काची व कर्तव्याची जाणीव न होण्यात आहे, हे तत्कालीन विचारवंतांना प्रतीत झालेले उघड सत्य होते. म्हणून, स्त्रीशिक्षणाखेरीज त्यांच्या कल्याणाचा विचारच होऊ शकत नाही, अशी धारणा विचारवंतात दृढमूल झाली होती. अशा वेळी स्त्रियांना काही विशेष बोध देण्याच्या आवश्यकतेतून विनायकाच्या आख्यानक कवितांचा जन्म झालेला आहे.

---

८. आजकालचा महाराष्ट्र,–पृ. ३०३–३०५

९. अर्वाचीन पंचकन्या,–पृ. ५६–बा. गो. नाईक.

तेव्हा, विनायकांनी स्त्री शिक्षणावरच भर दिला असावा, असे तत्कालीन परिस्थितीवरून वाचकाला वाटणे अगदी स्वाभाविक आहे. पण वस्तु-स्थिती तशी नाही. पतिनिष्ठा, धर्मपरायणता इत्यादी पारंपारिक प्रथांचा आदर्श त्यांनी तत्कालीन स्त्रियांच्या डोळ्यापुढे उभा केला आहे. स्त्रियांच्या वेदनेशी एकरूप झालेले महात्मा फुले, पंडिता रमाबाई, आगरकर हे खरे स्त्रीसमाजाचे वाचस्पती होत; हे सर्वमान्य आहे. मग त्यांच्याशी विरोधी सूर लावणारा विनायक स्त्रीजीवनाचे वाचस्पती कसा ठरणार ?

★ "आम्ही अस्पृश्य कां ?" असा 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न', विनायकाला समकालीन असलेल्या, केशवसुतांचे काळीज करकरा कापीत गेला आहे. धार्मिक, सामाजिक किंवा कोणत्याही प्रकारचा न्याय व समता हरिजनांच्या वाटयाला कधी आलेली नाही. जेव्हा जेव्हा गावांत सार्वजनिक समारंभ होत, तेव्हा तेव्हा "दर वेळी हे ध्यानात ठेवावयास हवे की, अस्पृष्ट समाजाला दूर उभे ठेवलेले असे. गावचा तराळ म्हणून, वेसकर म्हणून, खजिन्याची ने आण करणारा म्हणून, महाराला त्यातल्यात्यात औदार्याने वागवीत. बाकी मांग वगैरे कोणाच्या खिजगणतीतही नसत .... ज्या जाती आणि जमाती संस्कृतीच्या कक्षेत दाखलच झाल्या नव्हत्या, त्या अजून गुन्हेगारीकडे झुकलेल्या असत; आणि चार दोन वर्षे गेली, म्हणजे अमूक रामोशाचे बंड, तमूक कोळ्याचे बंड, अशा वार्ता मधून मधून उठत"[१०] उपेक्षितांच्या अंतरंगांत, माटयांनी सत्या रामोशी, पिऱ्या मांग, पिऱ्या व तबा महार इ. चित्रे स्वानुभवातून रेखाटलेली आहेत. त्यामधून प्रकट झालेल्या दलितांच्या भावभावना लक्षात घेतल्या म्हणजे त्यांच्या सुप्त मनातील असंतोषाची बीजे कळून येतात आणि मग, या उपेक्षित विशाल वर्गाच्या दुःखाकडे डोळेझाक करणाऱ्याला तत्कालीन जनतेचा वाचस्पती म्हणता येईल काय ? असा मोठा प्रश्न डोळ्यापुढे उभा राहतो.

---

१०. चित्रपट–श्री. म. माटे, पृ. १०-१२

* विद्या आणि विज्ञान यांच्या दृष्टीने इंग्रजी राजवट भारताला जरी नवजीवन देणारी संजीवनी ठरली असली, तरी आर्थिक दृष्टीने ती भारताला लागलेली जळू होती. या देशातील पूर्वापार चालत आलेले धंदे पारतंत्र्याने पार धुळीला मिळविले होते. परकीय व्यापाऱ्यांची नोकरी, भांडवलशाहीची दलाली आणि इंग्रजी साम्राज्यशाहीचे दास्य याखेरीज एतद्देशीयांना उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन उरले नव्हते. "आमच्या देशातून आधी सर्व पैसा लुबाडून विलायतेत नेण्यात येतो व त्यातीलच काही भाग पुन्हां भांडवलरूपाने येथे येतो; व लोकांची अधिक लूट करून अनेक पटींनी परत विलायतेत जातो. असे हे रक्तशोषणाचे कालचक्र एकसारखे चालू असते."[११] यामुळे ब्रिटिश भांडवलवाले येथे येऊन व्यापार करतात व कारखाने काढतात ही आपल्या देशावर एक आपत्तीच आहे, असे दादाभाई नौरोजी म्हणत. भारतीय व्यापाऱ्यांच्या या प्रश्नाने विनायकाच्या काळात बरेच उग्र रूप धारण केले होते. औद्योगिक परिषद भरवून अर्थ-शास्त्राच्या तज्ज्ञांकडून या विषयावर विचारविनिमय व्हावा, अशी परिस्थिती तेव्हा निर्माण झाली होती, यावरूनच काय ते समजून येते. १८९० साली पुण्यास भरलेल्या औद्योगिक परिषदेतील भाषणात दादाभाईंच्या विरुद्ध विचारप्रणाली न्या. रानडे यांनी प्रतिपादिली होती.[१२] तरी त्यावरून असा निष्कर्ष सहज काढता येईल की, राजकीय क्षेत्रातल्या सर्वच कार्यकर्त्यांवर या आर्थिक परिस्थितीच्या विचाराचे जबरदस्त दडपण पडलेले होते. शिवरामपंत परांजपेही 'शिवाजीची एक रात्र' या निबंधात नेहमीच्या वक्रोक्तीच्या शैलीने रूपकात्मक भाषेत म्हणतात, "बहुतकरून सगळ्या जुलमी राजांची फसवण्याची एकच तऱ्हा असते. त्याने तुमच्यात फूट पाडून तुम्हाला जिंकले काय ? आणखी त्याने तुमच्या देशांत काय अनन्वित कृत्ये केली ? बहुतकरून त्याने तुमची रत्नखचीत देवळे तर खास फोडली असली पाहिजेत. कारण, हे सर्व आकाशभर अस्ताव्यस्त पडलेले, त्या भग्न

---

११. आधुनिक भारत– आचार्य शं. द. जावडेकर, पृ. ११९

१२. सविस्तर माहितीसाठी आधुनिक भारतातील, न्या. रानडे यांची आर्थिक विचारसरणी, हा परिच्छेद पाहावा.

करून टाकलेल्या देवळांच्या कोंदणातील लखलखीत हिरे या गोष्टींची साक्ष स्पष्टपणे देत आहेत. इतके हिरे ज्यांनी टाकून दिले, त्यांनी लुटून नेलेल्या हिऱ्यांची संख्या कितीतरी प्रचंड असेल. काय ही लूट आणि काय हा परचक्राचा परिणाम !" ही भारताची हीनदीन अवस्था विनायकालाही जाणवली होती. पण

सार वस्तूंचा लोट सारखा परदेशी जाता
नैवद्यास्तव काही नुरले, काय करू आता ?
किती आळवू, गाऊ ध्याऊ तुम्हा दीनानाथा
रचिले, रचितो, अपराधांचे शत पोटी घाला.[13]

अशी त्यामागे त्यांची केवळ दैवधादी प्रवृत्ती आहे. या आर्थिक भयावहतेच्या बुडाशी औद्योगिक क्षेत्रातली इंग्रजी नीती कारणीभूत आहे आणि तेव्हा तिच्याविरूद्ध प्रक्षोभ निर्माण करायला पाहिजे, याची मात्र त्याला जाणीव दिसत नाही.

सामाजिक आणि आर्थिक जीवनाविषयी विनायकाची कविता उदासीन आहे, हे उघड आहे. संमतीवयाच्या बिलाने किंवा चहाग्रामण्य प्रकरणाने संपूर्ण पुणे खळबळले होते; तरी विनायकाच्या भावनांचा आवेग त्यांनी उफाळला नाही. कारण, विनायकाच्या कवितेचा खराखरा उगम राजकीय भावनेत आहे. पण राजकीय भावना जेव्हा प्रत्यक्ष कार्यान्वित होते, तेव्हा तत्कालीन राजकारणाच्या कोणत्यातरी एका प्रवाहाबरोबरच तिचा प्रवास निश्चित होत असतो. ती कविता अन्य प्रवाहांची प्रातिनिधिक ठरत नाही. तत्कालीन राजकारणात तीन वैचारिक प्रवाहांचा संगम घडलेला होता. न्या. रानडे यांचा नेमस्त सर्वांगीण सुधारणावाद, आगरकरांचा जहाल सर्वांगीण सुधारणावाद आणि टिळकांचा जहाल राजकारणवाद. पैकी आगरकरांचा जहाल सर्वांगीण सुधारणावाद लवकरच लुप्त झाला. विनायक हा टिळकांच्या विचारसरणीचा; परंतु त्यातही त्याच्या मनावर सशस्त्र क्रांतिकारकांच्या अद्‌भुतरम्य कथांचाच प्रभाव अधिक आढळतो.

---

१३. 'गणेशपूजन' ही विनायकाची कविता पाहा.

'पुष्प एक वाहून टाकिले आहे 'चाफ्या'चे
दुसरे मिळवावयास जाऊ–करू उद्यमाला'

यात रँड आणि आयर्स्टचा खून करणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांसारखे वीर निर्माण करण्याचा उद्योग आरंभला पाहिजे, ही भावना व्यक्त होते. म्हणजे, राजकीय दृष्टया देखील, देशभक्तीची भावना झालेल्या सामान्य माणसाच्या मनावर उठणाऱ्या उत्स्फूर्त तरंगांचेच ढोबळ प्रतिनिधित्व त्यांनी केले, एवढेच फार तर म्हणता येईल.

★ सारांश, शेतकरी, स्त्रीवर्ग, मजूर इ. वर्गाचे भावाविष्करण विनायकाच्या कवितेत नाही. 'समकालीन राजकीय व सामाजिक घटनांच्या बाबतीत त्यांचे चित्त सर्वस्वी उदासीन होते' या डॉ. वाळिंबे यांच्या विधानातील राजकीयतेबद्दलचा मुद्दा जरी विवाद्य होऊ शकत असला, तरी सामाजिकतेबद्दलचे त्यांचे मत सर्वार्थाने मान्य होण्याजोगे आहे ! वा. व. पटवर्धनांनी जेव्हा विनायकांना तत्कालीन जनतेचा वाचस्पती म्हटले किंवा भ. श्री. पंडितांनी त्यांना स्वतःच्या युगाचे प्रातिनिधिक कवी म्हटले, तेव्हा त्यांना त्याच्या कवितेत सर्व वर्गाचे प्रतिनिधित्व आहे, असे म्हणायचे नव्हते. त्यांच्या विधानातून असा अर्थ काढणे हा त्यांच्या हेतूचा विपर्यास करणे आहे. जनतेमध्ये जे राजकीय स्वातंत्र्याचे अस्फुट भाव उसळत होते त्यांना विनायकाने शब्दरूप दिले, असा त्यांच्या म्हणण्याचा भावार्थ आहे. "मद्यस्थितीच्या दिखाऊ लखलखाटाने दिपलेल्या आणि भान विसरलेल्या जनतेला पूर्वीची आठवण देणे हे त्याच्या कवितेने आपण होऊन अंगावर घेतलेले कार्य होते आणि तिने ते आपल्या आवाक्या-प्रमाणे केले, हे कोणासही कबूल करावे लागेल. विनायकाची बहुतेक कविता त्याच धोरणाची आहे. या दृष्टीने विनायकाची कविता म्हणजे तत्कालीन महाराष्ट्राचे प्रतिबिम्ब होय. 'शिवाजी उत्सव', महाराष्ट्राच्या इतिहासाची साधने गोळा करण्याचा उद्योग वगैरे चळवळींचा उदय विनायकांच्या देखत झाला. त्याचा पडसाद त्याच्या काव्यात उठल्यासारखा दिसत आहे. या चळवळीमुळे विनायकाची कविता जन्म पावली असे नव्हे;

परंतु त्याची कविता आणि त्या चळवळी या सर्वांचे उगमस्थान त्यावेळची महाराष्ट्राची लौकिक अवस्था होय असे म्हणावयास हरकत नाही. म्हणजे एका अर्थी विनायक हा काळमहात्म्याचा परिपाक आहे. त्यावेळच्या जनतेत अस्फुटपणे जे विचार, जे भाव, ज्या मनःप्रवृत्ती जागृत होत होत्या त्यांना विनायकाने तोंड फोडले. विनायक हा तत्कालीन जनतेचा वाचस्पती होता. त्याच्या काव्याचे द्वारा त्यावेळची लोकस्थिती गाऊ किंवा बोलू लागली." पटवर्धनांनी मांडलेले हे विचार लक्षात घेऊन किंवा पंडिताचा हेतूही लक्षांत घेऊन विनायकाला तत्कालीन जनतेचा वाचस्पती अथवा प्रतिनिधी म्हणणे योग्य वाटत नाही. कारण, ज्याला आपण जनतेचा वाचस्पती म्हणतो त्याला राजकीयतेबरोबरच सामाजिक व आर्थिक विचारांनीही प्रतिनिधित्व असणे आवश्यक असते. 'जनतेचा वाचस्पती' हा शब्दप्रयोग वापरताना केवळ राजकीयता लक्षात घेणे, म्हणजे दिशाभूल करणे होय. शिवाय गणेशोत्सव, शिवजयंती इ. काही राजकीय चळवळीत जरी तो स्वतः भाग घेत असला; व त्या विचारांचे प्रतिबिम्ब त्याच्या कवितांत उमटले असले, तरी संपूर्ण महाराष्ट्रातील राजकीय भावनांचे प्रतिनिधित्व तरी त्याने पूर्णपणे केले काय ? ज्या सशस्त्र क्रांतिकारी मार्गाचा विनायकाने पुरस्कार केला त्याचा टिळकांनी तिरस्कारच केला नव्हता काय ? कट रचणारी व इंग्रजांचा खून करणारी चाफेकरांसारखी मंडळी जमविण्याचा मानस जेव्हा विनायक व्यक्त करतात,तेव्हा त्याच चाफेकर प्रकरणावर लिहिताना लो. टिळक म्हणतात, "ज्याने कोणी खून केला असेल त्याला खुशाल फाशी द्या. त्यात आमचे कल्याण व समाधान आहे. वर्तमानकर्त्यांचे लेख गुन्ह्यास उत्तेजन देण्यासारखे असल्यास इंडियन पिनल कोडाप्रमाणे त्यास गुन्हेगार ठरवून त्यासही शिक्षा करा; त्यास आमची हरकत नाही."[१४] खून इंग्रजाचा असो वा अन्य कोणाचाही असो तो करणाऱ्याला फांशी देण्यात केवळ आमचे समाधानच नव्हे, तर कल्याण आहे, ही टिळकांची विचारसरणी महत्वाची आहे. या दृष्टीने, टिळकांच्याच राजकीय दृष्टीचे ज्याने यथायोग्य प्रतिनिधित्व

१४. कित्ता, पृ. ६७७

केले नाही, त्याला वाच्छा-मेथा-गोखले-रानडे प्रभृतींचे प्रतिनिधी कसे म्हणता येईल ? राजकीय विचारसरणीच्या संकुचित अर्थानेही का होईना, पण विनायक बहुसंख्य जनतेच्या भावना गात नव्हता. माटे आपला अनुभव कथन करतांना म्हणतात, 'बाँब गोळयाच्या प्रक्रियेची छापलेली पुस्तके फर्ग्युसन कॉलेजच्या मैदानात एका विद्यार्थ्याने जाहिरातीसारखी वाटली होती. शहरातही तोच प्रकार चालू होता. कुठल्यातरी दुसऱ्या गावाहून असल्या पत्रकांची पुडकी बुकपोस्टाने शहरात येत. कोण पाठविते हे नावावरून कधी कळावयाचे नाही. पण ते पुडके अजाणतेपणामुळे पत्कर-णारा मात्र पोलिसांच्या हाती शहाजोग सापडत असे. सगळया शहरात भयाचे साम्राज्य माजले. कोण कोणाचे नाव सांगेल, पोलीस कोणाच्या दारी येतील, आणि कोणाला बांधून नेतील, अशी धास्ती सर्वत्र पसरली. सुदैवाने प्लेग झाला, शाळा कॉलेजे बंद झाली; आणि विद्यार्थ्यांच्या टोळचा जिकडे तिकडे पांगल्यामुळे शहरच्या लोकांनासुद्धा थोडे हायसे झाले.'[५] प्लेग होण्याला देखील माटयांनी सुदैव म्हटले आहे; व चळवळ बंद होण्यात लोकांना हायसे वाटले, असे सांगितले आहे. याचा अर्थ, लोकांना स्वातंत्र्य-प्रीती नव्हती, असे नाही; तर विनायकाने पुरस्कारलेला क्रांतिवादी मार्ग त्यांना संमत नव्हता. म्हणून राजकीय विचारांच्या पार्श्वभूमीवरही तो वाचस्पती ठरत नाही.

विनायक हा बहुजन समाजाच्या भावनेशी कधीच एकरूप होऊ शकला नाही; व म्हणून तो कोणत्याही अर्थाने तत्कालीन समाजाचा वाचस्पती होऊ शकत नाही.

५. चित्रपट, पृ. ११८–११९

# ३. राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्गाते ?

- * प्रास्ताविक
- * व्याप्ती व मर्यादा
- * लक्षणे
- * कवितांचे वर्गीकरण
- * ऐतिहासिक व राष्ट्रीय कविता
- * राष्ट्रीय चतुःसूत्रीची मीमांसा
- * इतर (राष्ट्रीय) कवींशी तुलना
- * विनायकाच्या राष्ट्रीय कवितेचे स्वरूप
- * विनायक : एक अराष्ट्रीय कवी
- निष्कर्ष

★ "विनायकांच्या गणेशपूजन, महाराष्ट्रलक्ष्मी, शिवसंदेश, हतभागिनी, यापुढे, प्रो. छत्र्यांचा केसरी आदी राष्ट्रीय कविता ओजोगुण विशिष्ट[1] असून त्यांनी राष्ट्रीय शिक्षण, स्वावलंबन, स्वदेशी व बहिष्कार या चतुःसूत्रीच्या १९०६ ते १९०८ च्या काळात[2] अख्ख्या महाराष्ट्राला

---

१. हतभागिनी, यापुढे, ह्या कविता ओजोगुणविशिष्ट तर नाहीतच, पण संपूर्णतया निराशेच्या सुरांनी व्याप्त आहेत; हे याच टीकाकारांनी पुढे मान्य केले आहे. ते म्हणतात, "हतभागिनीमधील 'गायजी गाळी–चेपत ती चालली' या कल्पनेवरून; व 'यापुढे' या कवितेतील 'हास्याचे दिन मावळले' या कल्पनेवरून विनायक हे निराशावादी होते की काय, असे वाटण्याचा संभव आहे." —विनायकाची कविता, पृ. ६०

२. १९०६ सालच्या काँग्रेसच्या कलकत्ता अधिवेशनात महर्षी दादाभाई नौरोजी यांच्या अध्यक्षतेखाली स्वराज्याचा ठराव पास झाला. त्याचबरोबर स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार हे ठरावही संमत झाले. तेव्हा ही चतुःसूत्री अवतरणात दिल्याप्रमाणे नसून राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार अशी होती.

हलवून जागे केले, हा इतिहास विसरून चालणार नाही.. अशा काही कविता महाराष्ट्रापुरत्या मर्यादित असल्या तरी त्यातील देशाभिमानाची प्रचंड लाट साऱ्या भारतावरून उसळण्याइतकी आवेगी व प्रभावी आहे. विनायक हे स्वतःच्या युगाचे प्रातिनिधिक कवी आहेत . त्यांची राष्ट्रभक्ती अलोट होती व स्वदेशबांधवप्रीती उत्कट होती विनायक हे आधुनिक मराठी कवितेतील राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्‌गाते होत."[३]

* विनायक राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्‌गाते होते काय, हे यथार्थतेने कळण्यासाठी आधी राष्ट्रीय कविता म्हणजे काय, याचे आकलन होणे आवश्यक आहे. स्वातंत्र्याचा पुरस्कार व पारतंत्र्याचा तिरस्कार म्हणजे राष्ट्रभक्ती; व ती ज्या कवितेत आहे, ती राष्ट्रीय कविता, असे पंडिताच्या विवेचनावरून वाटते. परंतु राष्ट्रभक्ती केवळ राजकीय स्वातंत्र्यातच समाविष्ट नसते. समाजहिताकरिता तळमळणारे महात्मा फुले किंवा आगरकर राष्ट्रभक्त नव्हते, असे म्हणता येईल काय ? "राष्ट्राचे अंतःकरण, राष्ट्राच्या भावना आणि राष्ट्राचे विकार ज्या कवितेत आविर्भत झालेले असतात, ती राष्ट्रीय कविता. सामान्य जनतेच्या आशा–अपेक्षांशी, विचार-विकारांशी समरस झालेल्या ज्याच्या अंतःकरणातून राष्ट्रभावनांच्या उज्ज्वल लहरी उसळू लागतात, तो राष्ट्रकवी."[४] राजकीय पारतंत्र्याविषयीचा ज्वलंत द्वेष आणि स्वातंत्र्याची उत्कट अभिलाषा, एवढेच राष्ट्रीय कवितेचे मर्यादित स्वरूप असत नाही. तिची भूमिका याहून अधिक व्यापक आहे. जेथे जेथे म्हणून आर्थिक, सामाजिक किंवा राजकीय असे कोणत्याही प्रकारचे पारतंत्र्य असेल, तेथे तेथे क्रांतीचे निशाण उभविणारी कविता हीच व्यापक अर्थाने राष्ट्रीय कविता होय.[५] "राष्ट्रपुरुषाचे समग्र दर्शन घ्यावयाचे असेल तर धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषी,

---

३. विनायकाची कविता, पृ. ५८ ते ६२.

४. आधुनिक कविपंचक–ग. त्र्यं. माडखोलकर, पृ. ८७

५. राष्ट्रीय कवितेचे स्वरूप सांगताना डॉ. अ. ना. देशपांडे यांनीही या मताचे समर्थन केले आहे. आ. म. वा. इ., भाग २ पृ. ४२६,

कलाकौशल्य, कायदेकानून, राजकारण व तत्साध्यर्थ केलेल्या अंतस्थ व बहिस्थ खटपटी इतका सर्वांचा विचार केला पाहिजे."

★ विनायक हा ज्या भूमिकेवरून तत्कालीन जनतेचा वाचस्पती नाही, त्याच व्यापक भूमिकेवरून तो राष्ट्रीय कवीही वाटत नाही. विनायकाची कविता केवळ राजकीय स्वातंत्र्याची लालसा व परकीय जुलुमांबद्दल असंतोष एवढ्याच संकुचित व मर्यादित क्षेत्रात संचार करते. राष्ट्रीय कवितेमधून देशभक्तीचा झरा अव्याहत ओसंडून वाहावा लागतो; तो समाजजीवनातील साऱ्याच समस्यांना व्यापून टाकणारा असावा लागतो. 'ज्याची काव्यप्रतिभा संकुचित व स्वयंकेंद्रित व्यक्तिवादात अडकून न राहता जी प्राधान्याने राष्ट्रवादाचे पोषण करण्यात रंगते'[६] ती राष्ट्रीय कविता म्हणता यईल. राष्ट्रीय कवितेचे हे लक्षण सर्वमान्य होय.

★ कोणत्याही राष्ट्रीय कवितेची व्याप्ती, मर्यादा व स्वरूप लक्षात घेताना तिचे वर्गीकरण करणे, म्हणूनच आवश्यक ठरते. अनुभूतीच्या उत्कटतेला देशभक्तीची ऊत्र कारण झाली असेल, तर त्या कवितेचा विषय राष्ट्रीयतेच्या आशयातूनच उत्स्फूर्त होणे अपरिहार्य ठरते. या दृष्टीने विनायकाने विविध विषयावरील लिहिलेल्या किती कवितांचा उगम राष्ट्रीय भावनेत आहे, हे पाहणे मनोरंजक ठरेल. परिशिष्ट १ मधील वर्गीकरण पाहिले, म्हणजे सहजपणे लक्षात येते की, ईश्वरविषयक आठ कवितांपैकी केवळ दोन कवितातून कवीला होत असलेली देशस्थितीची जाणीव डोकावत आहे. त्यातील 'गणेश पूजन' मध्ये पारतंत्र्यामुळे होत असलेल्या हानीचे प्रत्ययकारी पण अगतिकपणाचे चित्रण आहे, तर सोंगटीच्या खेळात तत्कालीन रूसो–जपान युद्धप्रणित परिस्थितीवर एक प्रकारची व्याजोक्ती आहे. समजस्थितीपर कविता देशप्रीतीतूनच उद्‌भवली आहे. सर्वच ऐतिहासिक कवितांतून शिवकालाच्या उज्ज्वलातेचे दर्शन घडवून वर्तमानकालीन दुरवस्थेचे चित्रण केलेले आहे. बोधवाद्याच्या भूमिकेतूनच कथाकाव्यांची

---

६. आ. म. वा. इ., भा. २, पृ. ४११

निर्मिती आहे. मातृभूमीविषयक, ध्येयवादजन्य, क्षात्रवृत्तीप्रधान व स्वधर्मपर कवितांचा झरा हितोपदेशाचा आहे. सणविषयक कवितात दसऱ्यावर असलेल्या कविता वीरवृत्ती जागृत करणाऱ्या आहेत. काव्य-विषयक कवितात 'कवि आणि पोपट' ही पारतंत्र्याच्या तिरस्कारातून तयार झाली आहे. प्रणयपर, जीवन तत्त्वज्ञानात्मक, निसर्गवर्णनपर, वात्सल्यप्रधान आणि विनोदी कविता मात्र स्वदेशप्रीतीच्या भावनेपासून सर्वस्वी अलिप्त असून, केवळ काव्य दृष्टीनेच त्यांचे मूल्यमापन करायला हवे. याचा अर्थ विनायकाच्या एकूण ८० कवितापैकी ४६ कवितात प्रकट वा सुप्त स्वरूपात स्वदेशप्रीतीचा आढळ होतो. अर्थात् या स्वदेशप्रीतीत आर्थिक व सामाजिक समतेची जाणीव नाही. तीत केवळ राजकीय स्वातं-कीय स्वातंत्र्याची ओढ व पारतंत्र्याची चीड अंतर्भूत आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण, स्वदेशप्रीतीपर कवितांचे एकूण प्रमाण अधिक असले तरी खऱ्या व व्यापक अर्थाने त्यांना राष्ट्रीय कविता म्हणणे कितपत न्याय्य होईल, तेही ठरवावे लागणार आहे.

★ विनायकाच्या कथाकाव्याचा उद्देश बोधप्रवणता असल्याने त्यांची गणना स्वदेशप्रीतीपर कवितात केली आहे. विनायकाने सांगितल्या-प्रमाणे, 'आपल्या देशात जी भूषणभूत स्त्री-रत्ने निर्माण झाली, त्या स्त्री-रत्नांचे गुणवर्णन काव्यात रचण्याचा प्रयत्न' कवीने केला आहे. वास्तविक, काटेकोरपणे पाहिले तर त्यातील अनेक कवितांचे प्रयोजन स्वदेशप्रीती असण्याऐवजी स्त्रियांनी आचरावयाची धर्मनीती, त्यांची पति-निष्ठा, सद्‌गुणजोपासना हेच आहे. हे राष्ट्रवादाला पोषकच ठरेल, असे सांगता येत नाही.

त्यांनी गायिलेली 'पन्ना' ही राजपुत्रासाठी स्वतःच्या मुलाचाही बळी देणारी असामान्य स्वामिभक्त स्त्री आहे आणि या काव्यातून कवीने स्वामिभक्तीचा आदर्श स्त्रियांपुढे उभा केला आहे. विनायकांच्या काळी इंग्रज हे भारताचे सार्वभौम सत्ताधीश स्वामी होते, हे लक्षात घेतले म्हणजे स्वामिभक्तीचा आदर्श देशभक्तीशी कसा विरोधी होतो, हे सहज ध्यानात

येईल. या ठिकाणी असा आक्षेप पुढे येण्याचा संभव आहे की, पन्नेची स्वामिनिष्ठा हा जर त्याकाळी देशनिष्ठेला विरोधी ठरणारा आदर्श असेल, तर पुत्राआधी कोंडाण्याचे लग्न लावणाऱ्या तानाजीसारख्यांची स्वामिनिष्ठा लोकांच्यापुढे आदर्श म्हणून ठेवण्यात तोच धोका निर्माण होत नाही काय ? याचे उत्तर, निश्चितच, नाही, असे आहे. पन्ना व तानाजी यांच्या स्वामिभक्तीमध्ये उत्कटतेची समानता असली, तरी मूलगामी भेद आहे. ज्याला त्याच्या दुर्व्यसनी राजाच्या मुलाला वाचविण्याचा पन्नेचा प्रयत्न आहे. स्वातंत्र्याचे अधिष्ठान तेथे नाही. तानाजीच्या स्वामिनिष्ठेत (व स्वामीतही) ते आहे. म्हणून राजा कोणताही व कसाही असला, तरी त्याची सेवा हाच आपला धर्म होय, असे सांगणाऱ्या पन्नाचा आदर्श विनायककालीन देशनिष्ठेला मारक ठरणारा आहे. हरिभाऊंच्या 'उषःकाल' मध्ये नेमका हाच संघर्ष रंगरावआप्पा आणि नानासाहेब या पितापुत्रातील मतभेदातून चित्रित झालेला आहे. स्वामिनिष्ठा या मूल्याचा खरा अर्थ कोणता, याबाबतच तेथे खरा लढा आहे. "स्वामिनिष्ठा आणि स्वराज्यनिष्ठा या दोन विचारांचे जाणीवपूर्वक चित्रण हरिभाऊंना या कादंबरीतून करावयाचे आहे."[७] स्वामिनिष्ठेचा खरा अर्थ आकलन न झाल्यामुळे म्हणा किंवा विनायकाने या सूक्ष्मतेकडे दुर्लक्ष केले म्हणून म्हणा, (आणि विनायकाने सूक्ष्मतेकडे नेहमीच पाठ फिरवली आहे.) ह्या अविवेकी विभूतिपूजेची सांगड राष्ट्रभक्तीशी घातली गेली आहे. 'गणिकोद्धार' या काव्यात लौकिक जीवन क्षणभंगूर असून परमेश्वर भक्तीनेच मानवाचा देह सार्थकी लागणार आहे, असा विरक्तीचा, निवृत्तीचा उपदेश आहे. राष्ट्रजागृतीच्या काळात ही शिकवण राष्ट्रीयत्वाला पोषक कशी ठरणार ? कुलासाठी व्यक्तीने बलिदान करावे, हा राष्ट्रपोषक बोध ज्या संदर्भात प्रत्यक्ष कृष्णाकुमारीने केला आहे, तो न्यायाला व नीतीला निश्चितच विरोधी वाटतो. कृष्णाकुमारीच्या सौंदर्यामुळे तिच्याकडे आकृष्ट झालेल्या जयपूर नरेशाला तिच्या वडिलांकडून नकार मिळतो. म्हणून जयपूर नरेश

---

७. हरिभाऊ–विविध दर्शन–सं. म. ना. अदवंत, या ग्रंथातील व. दि. कुळकर्णी यांचा लेख.

त्याच्यावर स्वारी करतो. पुढे होणाऱ्या युद्धात प्राणहानीचा अनर्थ टाळण्याकरिता भीमराजा कृष्णाकुमारीला विष देतो. हा संदर्भ लक्षात घेतला, म्हणजे कृष्णाकुमारीने वडिलांच्या या वागणुकीचे केलेले समर्थन कितपत न्याय्य वाटते ? आणि कृष्णाकुमारीचा आदर्श तत्कालीन स्त्रियांपुढे ठेवण्यात विनायकाने जे साधले, ते राष्ट्रीय अस्मितेला कितपत पोषक ठरते ? सारांश, विनायकाची सर्वच खंडकाव्ये बोधकाव्ये आहेत खरी; पण, तेवढ्यामुळे ती देशभक्तीप्रवणच आहेत, असे होत नाही. विनायकाला स्त्री-जातीस केवळ काही बोध करावयाचा होता; म्हणजेच त्या काव्यात समाजाभिमुखता होती, एवढ्याच एका व्यापक अर्थाने त्याचे वर्गीकरण स्वदेशप्रीतीपर काव्यात केले आहे.

★ राष्ट्रीय शिक्षण, स्वराज्य, स्वदेशी व बहिष्कार या चतु:सूत्रीच्या १९०६ ते १९०८ च्या काळात विनायकाने अख्ख्या महाराष्ट्राला हलवून जागे केले होते, असे म्हणण्यांत येते. पण राष्ट्रीय शिक्षणाचा प्रचार त्याच्या काव्यात कुठेही आढळत नाही. इतकेच नव्हे, तर केवळ विद्या हीही वाघिणीचे दूध ठरू शकते, असे त्याला वाटत असावे, हे सिद्ध करावयाला त्याच्या जीवनात आणि काव्यातही पुरावा आढळत नाही. स्वत:च तो व्ह. का. पर्यंत आला होता, तो पुढे चढला नाही. त्याचा इतिहासाचा व्यासंग नव्हता, हेही उघड आहे. राष्ट्राच्या दुर्धरतेचे, कारूण्याचे, दास्याचे चित्र त्याने रेखाटले आहे. पण, त्यावर उपाय म्हणून जनतेत विद्याप्रसार व्हायला पाहिजे, अशा आशयाचा पुसटसा उल्लेखही कुठे नाही. वास्तविक शिवजयंती उत्सव किंवा गणेशपूजन, खेडूतांनाही देशस्थिती समजावून देण्याच्या दृष्टीने टिळकांनी सार्वजनिक स्वरुपाचे केले होते. "पूर्वीच्या जत्रा म्हणजे राष्ट्रातील धार्मिक, औद्योगिक व सामाजिक चळवळीची जंगी प्रदर्शनेच होत···मोठ्या जत्रांना प्रचंड सभांचे स्वरूप आम्ही कां देऊ नये ? तुमच्या राजकीय चळवळीचा प्रवेश खेड्यापाड्यातील झोपडीतही अशा प्रकाराने व्हावयाचा नाही काय ?···अशा (जत्रेच्या) वेळी आपली खरी स्थिती काय आहे, याचे ज्ञान लोकसमूहाला सुशिक्षितांनी कां करून देऊ नये ? सरकार करीत असलेल्या जुलुमाची आठवण त्यावेळी लोकांना

शहाणे म्हणविणाऱ्या लोकांनी कां करून देऊ नये ?" ही उत्सवासंबंधीच्या कर्तव्याची टिळकांची भूमिका होती. या दृष्टीने विनायकांच्या कवितांचे विश्लेषण केल्यास खास मेळ्याकरिता म्हणून त्यांनी ज्या दहा कविता केल्या आहेत, त्यात या दृष्टीचा संपूर्णतया अभाव आढळतो. त्या कविता केवळ ईश्वरवर्णनपर आहेत.

१८९६ साली इंग्रजसरकारने विलायतेतून येणाऱ्या सुतावरील जकात काढून टाकली आणि विलायतेतून इकडे येणाऱ्या कापडावर पाच ऐवजी साडेतीन प्रतिशत जकात बसवली. देशी जाडसुतावर जकात नव्हती; ती नव्याने बसवून परदेशी तलम व देशी जाड सुतावरील जकात साडेतीन प्रतिशत अशी समान झाली. त्यामुळे तलम कपड्यावरील म्हणजेच श्रीमंतावरील कर कमी होऊन जाड कपड्यावरील म्हणजेच पर्यायाने गरिबांवरील कर वाढला. टिळक म्हणतात, "म्हणून रडत बसण्यात काही हशील नाही. सरकारने जरी अन्याय केला तरी त्याचा प्रतिकार करणे काही अंशी तरी तुमच्या स्वाधीन आहे. तो प्रतिकार कोणता म्हणाल, तर सर्वांनी देशी कपडा वापरावयास लागणे हा होय."[८] ही टिळकांची स्वदेशीच्या सामर्थ्याची सिंहगर्जना तर सोडाच; पण, स्वदेशीचा साधा पुरस्कारही विनायकाच्या काव्यात कुठे आढळत नाही. 'गणेशपूजन' मध्ये '(गणेशाला) वाहू पट जो कर बसल्याने जीर्ण असे झाला' अशी एक ओळ आली आहे. कापडावर बसविलेल्या कराने व्यथित झालेले त्याचे मन त्यातून दिसून येत असले, तरी त्या करवाढीमुळे आपण स्वदेशीकडे वळलो पाहिजे, हा विचार त्यात नाही. ह्याच काय, पण कोणत्याही कवितेत स्वदेशीचा विचार अनुस्यूत नाही.

---

८. "महाराष्ट्राच्या राजधानीत म्हणजे पुण्यात राहणाऱ्या लोकांना प्रथमपासूनच इंग्रजांनी आपले राज्य हरण केले आणि आपला सर्व व्यापार धंदा काबीज केला हे पाहून स्वराज्याची व स्वदेशी धंद्याच्या उन्नतीची हळहळ लागली होती." (आधुनिक भारत, पृ. २३३) ती स्वदेशी धंद्याच्या उन्नतीची हळहळदेखील विनायकाच्या काव्यात आढळत नाही.

१९०६ मध्ये स्वराज्याचा ठराव पास झाला तो वसाहतीच्या स्वराज्याचा होता.[९] प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने वसाहतीचे स्वराज्य हे ध्येय या ठरावात मान्य केले असले, तरी त्या ठरावांतील भाषेचा आधार घेऊन पूर्ण स्वातंत्र्य हेम अंतिम ध्येय होय, असा त्याचा अर्थ जहालपक्षीयांनी स्वीकारला होता. या स्वराज्याबद्दल बोलताना, स्वराज्य–लोकांनी आपण-होऊन चालविलेले स्वराज्य–आपल्यास प्राप्त झाल्याखेरीज आपल्या उद्धाराचा दुसरा मार्ग नाही, असे दादाभाईंनी सांगितले, यावरून भारतीय राजकारणाचा गाडा पाश्चिमात्य राष्ट्रांसारख्या स्वातंत्र्याचे ध्येय मानून चालला होता, हे स्पष्ट आहे. स्वराज्याची ही आधुनिक कल्पना विनायकात आढळत नाही. त्याची वृत्ती,

मूललो पूर्व विसरलो सारे
अंगी भरले नूतन वारे
मूर्खत्वाचे तुटती वारे

अशी असून 'पुनरुज्जीवन हेतू पुराणा' साधण्याचे त्याचे स्वप्न आहे. म्हणूनच १८९३ च्या ऑगस्ट महिन्यात हिंदु-मुसलमानांच्या दंगलीचा संपूर्ण देशांत जो डोंब उसळला होता, त्याला इंग्रजांची भेदनीती कारण आहे, असा टिळकांनी लावलेला अन्वयार्थ विनायक लावू शकला नाही.

वंगभंगचळवळीचा प्रारंभ ७ ऑगस्ट १९०५ रोजी कलकत्त्यांत व बंगालमधील इतर शहरात जाहीर सभेने झाला; व या सभेतच इंग्रजी मालावर बहिष्कार टाकण्याच्या सामुदायिक शपथा घेण्यात आल्या.

---

९. नेमस्त आणि जहाल दोघांनाही संमत ठरेल, अशाच दृष्टीने ठरावाची आखणी करावयाची असल्यामुळे दादाभाईंनी खालील स्वरूपाचा ठराव तयार केला होता,–

" Resolved that the Congress is of the opinion that the system of govt. obtaining in the self-governing British Colonies should be extended to India & that, as steps leading to it, it urges the following reforms should be immediataly carried out. आधुनिक भारत, पृ. ३०६

या बहिष्काराच्या चळवळीला महाराष्ट्रातून टिळकांनी ताबडतोब पाठिंबाच दिला असे नव्हे, तर 'बहिष्कार हे आमचे राजकीय शस्त्र' आहे, अशी नि:संदिग्ध घोषणाही त्यांनी केली. लगेच १९०६ च्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात हा ठराव संमतही झाला.[१०] ही चळवळ केवळ विलायती मालाचाच बहिष्कार आणि केवळ बंगालपुरती मर्यादित असावी, असे या ठरावाचे प्रतिपादन ना. गोखले, मालवीय यांनी केले असले, तरी पाल-प्रभृतींनी या चळवळीचे स्वरूप राष्ट्रव्यापी मानले. ब्रिटिश माल, ब्रिटिश सरकार, ब्रिटिश कायदेमंडळे, ब्रिटिश नोकऱ्या, ब्रिटिश न्यायकोर्टे या साऱ्यांचा बहिष्कार सभेला अभिप्रेत होता. ठाणे जिल्ह्यात सभेच्या कार्यकर्त्यांनी 'तुमची पिके बुडाली असली, तर तुम्ही सावकारास सारा देऊ नका' असे असिस्टंट कलेक्टरसमोर लोकांना सांगितले. या नव्या वर्धिष्णू क्रांतीची गाणी विनायकाने गायिली नाहीत. गायिली आहेत, ती शिवकालीन परिस्थितीची आणि सद्यकालीन दैन्याची. शिवकालीन स्वातंत्र्याचे ध्येय तत्कालीन तरुणापुढे विनायकाने उभे केले. परंतु, चतु:सूत्रीच्या काळात त्या सूत्राशी एकरूप होऊन, स्वातंत्र्यनिष्ठ आशय त्याने अभिव्यक्त केला, असे म्हणता येणार नाही.

कवी गोविंदाची कविता विनायकासारखीच क्रांतिभावप्रेरक वीररसप्रधान आहे. तिची उत्कटता मात्र विनायकाहूनही अधिक वाटते. "पराकाष्ठेच्या रसरशीत असलेल्या गोविंदाच्या कवितेला ज्वालामुखी पर्वतातून बाहेर पडून आसमंतातील गावेची गावे बेचिराख करणाऱ्या"

---

१०. हा ठराव खालील प्रकारचा होता.

Resolved that having regard to the fact that the people of this country have little or no voice in its administration & that their representations to the Govt. do not receive due consideration, this Congress is of opinion that the Bycott movement inaugurated in Bengal by way of protest against the partition of that province, was & is legitimate.

लाव्हा रसाची उपमा देऊन वा. ना. देशपांडे यांनी लिहिले आहे, "तुकारामाने आपल्या अभंगात जितक्या उत्कटतेने व परोपरीने विठ्ठलास आळविले आहे, तितक्याच उत्कटतेने व परोपरीने गोविंदांनीही स्वातंत्र्य-देवतेस आळविले आहे." कवी गोविंदांच्या उद्दाम आणि ऊर्जस्वल अशा स्वातंत्र्यभक्तींच्या 'स्वतंत्रतेचा क्षण', 'स्वातंत्र्याचा पाळणा', 'स्वतंत्रता देवी', 'स्वातंत्र्य लक्ष्मीस्तव' 'स्वराज्यसवितेच्या उदयार्थ', 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?', 'हिंदभू वांच्छिते विगत स्वातंत्र्यते', इ. कविता पाहाव्या, म्हणजे कवी विनायक व कवी गोविंद यांच्यातील एक महत्त्वाचा फरक लक्षात येतो. तो असा की, कवी विनायक गतवैभवाबद्दल दुःखाचे स्वर आळवितात किंवा भविष्यकालीन आशावादाचे पवाडे गातात, तर कवी गोविंद शुद्ध स्वातंत्र्यदेवतेची उपासना करतात. पूर्ववैभव गेले म्हणून किंवा सांप्रतची हलाखीची स्थिती बदलावी म्हणून गोविंदांना स्वातंत्र्याचा ध्यास (विनायकाप्रमाणे) नाही. त्यांना परिस्थितिनिरपेक्ष स्वातंत्र्याची अपेक्षा आहे. विनायकाला स्वातंत्र्याची आस आहे, ती एकतर पूर्वकालीन वैभवाच्या आसक्तीमुळे किंवा सद्यकालीन दुरवस्थेमुळे.

केवळ राष्ट्रीय कवितेच्या दृष्टीने विचार केला, तरी सावरकरांशी विनायकाशी तुलना करणे अप्रशस्त ठरेल. राष्ट्रनिष्ठा ही सावरकरांच्या रक्तामासाशी एकजीव झालेली निष्ठा असल्यामुळे; व त्यांचे जीवनही क्रांतिकार्यात गेल्यामुळे, त्यांच्या काव्याला उत्कट अनुभूतीचे मोल आले आहे. या असीम उत्कटतेपुढे विनायकाची कविता फारच थिटी पडते. "स्वातंत्र्याचा पुरस्कार काव्याच्या माध्यमातून सावरकरांनी इतक्या तन्मयतेने व निर्भयतेने केलेला आहे, की प्रभावी आणि प्रतिभासंपन्न असे सर्वश्रेष्ठ स्वातंत्र्य शाहीर म्हणवून घेण्याचा त्यांचा एकट्याचाच हक्क आहे"[११] हे विधान अतिशयोक्त वाटले, तरी त्यावरून विनायकाच्या तुलनेत सावरकरांची कविता किती उत्कट आणि प्रखर, किती तेजस्वी आणि प्रभावी आहे, याची सहज कल्पना येते.

'ने मजसी ने परत मातृभूमीला । सागरा प्राण तळमळला ।'

---

११. आ. म. वा. इ., भाग २, पृ. ३७.

ही अत्यंत प्रत्ययकारी अशी एकच कवितादेखील याची साक्ष द्यायला पुरेशी आहे.

राष्ट्रीय कवितेचा व्यापक अर्थ लक्षात घेता, कुसुमाग्रज हे मानवतावादी आणि म्हणूनच खरे राष्ट्रवादी कवी मराठीत आढळून येतात.

"आकाशावरी उदार माझी । गाढ गहन प्रीती ।
दास्य अनीती, सहानुभूती । हीच मला नीती ।।
जुमानितो ना जातिवर्ण मी । कर्मबंधने वा ।
एक मानतो मी मानवता । योग्य तिची सेवा ।।"

कुसुमाग्रजांना ह्या क्रांतीचा जयजयकार करायचा आहे. त्यातून जागृत व प्रक्षुब्ध अशा सामाजिक मनाचा तेजस्वी उन्मेष पाहावयास मिळतो. केवळ उच्चवर्णीय किंवा सुशिक्षित मनाच्या आशा-आकांक्षाशी नव्हे, तर सामान्य जनतेच्या भावभावनांशी त्यांची कविता एकरूप झाली आहे. म्हणून तिला खरी राष्ट्रीय कविता म्हणता येईल.

पूर्ववैभवाची स्मृती हे विनायकाचे, निर्भेळ स्वातंत्र्यपूजन हे गोविंदाचे, शिगोशिग उत्कटता हे सावरकरांचे आणि मानवतेचे अधिष्ठान हे कुसुमाग्रजांचे, राष्ट्रीय कवितांबावत वैशिष्टय मानता येईल.

* कवी जन्मावा लागतो, हे जेवढे खरे; तेवढेच, राष्ट्रीय काव्याच्या बाबतीत त्याच्या मनावर तत्कालीन परिस्थितीचाही प्रभाव पडतो, हेही खरे. अर्थात्, गणिती समीकरणच मांडायचे, तर देशातील नानाविध लोकसमुदायाशी, त्यांच्या इच्छाआकांक्षांशी कवी जेवढा जास्त समरस होईल, तेवढा तो अधिक प्रातिनिधिक राष्ट्रीय कवी म्हणून मान्यता पावेल. १९०५ साली जेथे 'वन्दे मातरम्'च्या घोषणेवर लागलेली बंदी आणि १९०६ मध्ये पोलिसांच्या लाठ्यांना बळी पडलेले बंगाली नेते[१२] ही घटना सामान्य

१२. १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यात पूर्व बंगालचे ले. गव्हर्नर फुल्लर यांच्या सेक्रेटरीने, रस्त्यातून 'वंदे मातरम्'ची घोषणा करू नये,

माणसाच्याही मनात विलक्षण वीरश्रीचा संचार करविणारी ठरली, तेथे क्रांतीच्या उपासक कवींनी तर महाकाव्य रचायला उत्स्फूर्त व्हायला हवे होते. पण, विनायक येथेही उदासीन आहे. त्याला या घटनेचे ज्ञान नव्हते म्हणावे, तर तेही असंभव वाटते. सामान्य माणसाच्या कानापर्यंत ही वार्ता विजेप्रमाणे पोचली होती. विनायक हे तर कवी. शिवाय, भ. श्री. पंडितांनीच निर्वाळा दिल्याप्रमाणे, ते बहुश्रुत होते.[१३] या घटनेची हकीकत केसरीमध्येच अत्यंत ओजस्वी रीतीने आली होती.[१४] त्याचप्रमाणे, १९०८ च्या एप्रिल महिन्यात बंगालमध्ये पहिला बॉम्ब उडाला आणि त्या प्रकरणावर लिहिलेल्या केसरीतील लेखाबद्दल तर लो. टिळकांना शिक्षाच ठोठावण्यात आली. या पहिल्या वहिल्या बॉंबचे रोमांचकारी वृत्तही विनायकाला क्रांतीस आलिंगन देण्याला प्रवृत्त करू शकले नाही. अशा या क्रांतिविन्मुख कवीला, राष्ट्रीय भावनांचे उद्दीपन करणारा

---

असा हुकूम काढला होता आणि स्वदेशी–बहिष्काराची चळवळ दडपून टाकण्यासाठी गुरखे लोक आणून लष्करशाही सुरू केली होती. या फुल्लरशाहीचा निषेध करण्यासाठी बंगाली पुढाऱ्यांनी बारिसाल येथे सन १९०६ तील प्रांतिक परिषद् भरविण्याचे ठरविले होते. या प्रांतात विद्यार्थ्यांनी चळवळीत पडू नये आणि ज्या निमसरकारी शाळातील विद्यार्थी चळवळीत पडतील त्यांना सरकारी मदत मिळणार नाही, असाही हुकूम काढण्यात आला होता. 'वंदे मातरम्'च्या घोषणेने शांततेचा भंग होतो, हा हुकूम बेकायदा आहे असे लोकांचे म्हणणे असून त्याविरूद्ध सत्याग्रह करण्याचे पुढाऱ्यांनी ठरविले होते. या परिषदेच्या अध्यक्षांच्या मिरवणुकीच्या वेळी 'वन्दे मातरम्'चा जयघोष हजारो लोकांनी केला; व त्या मिरवणुकीत शेकडो विद्यार्थी सामील झाले. 'वंदे मातरम्'चा जयघोष होताच बाबू सुरेंद्रनाथ यांना अटक करण्यात आली आणि मिरवणुकीतील लोकांची डोकी पोलिसांच्या लाठ्यांनी फोडण्यात आली.—आधुनिक भारत, पृ. २९८.

१३. "यावरून करमणूक, वि. ज्ञा. वि., केसरी, मनोरंजन, इ. नियतकालिकातच त्यांच्या प्रतिभेला भरपूर खाद्य मिळत असे."

१४. लो. टिळकांचे केसरीतील लेख, भाग ३, पृ. ८९-९०

रा. १५२२५


महाराष्ट्रांतील राष्ट्रीय कवितेचा जनक मानता येईल काय ? १९०७ मध्ये लाला लजपतराय यांना विनाचौकशी हद्दपार करून इंग्रजांनी दडपशाहीला सुरुवात केली होती. त्याही घटनेचा कुठे उल्लेख नाही. तात्पर्य, विनायकाची दृष्टी धुळे, पुणे यांच्या आसपासच खिळलेली होती. त्याच्या अनुभूतीची कक्षा जेथे महाराष्ट्रालाही पूर्ण व्यापणारी नव्हती तेथे इतर प्रांतांचे काय ? "शिवराजदर्शन, शिवसंदेश, यापुढे, महाराष्ट्रलक्ष्मी अशा काही कविता महाराष्ट्रापुरत्या मर्यादित असल्या तरी त्यातील देशाभिमानाची प्रचंड लाट साऱ्या भारतावरून उसळण्याइतकी आवेगी व प्रभावी आहे. विनायक हे स्वतःच्या युगाचे प्रातिनिधिक कवी आहेत," हे विधान अतिशयोक्त वाटल्यास नवल नाही. कारण, विनायकाच्या कवितेचे भौगोलिक स्वरूप संपूर्ण महाराष्ट्रव्यापी नसून महाराष्ट्राच्या काही भागापुरतेच मर्यादित आहे. विनायकाच्या राष्ट्रीय कवितेचे स्वरूप असे की, राष्ट्रातील केवळ हिंदुधर्मापुरतेच तिचे क्षेत्र मर्यादित आहे; व त्यातही मराठी माणसाबद्दल, व त्यातही शिवाजी महाराजाबद्दलच, त्याचा अभिमान जाज्वल्य आहे. राणा प्रतापाचा, रजपुतांचा किंवा इतर देशभक्तांचा इतिहास त्याच्या डोळ्याआड झालेला आहे. धर्मनिष्ठेमुळे तो परंपरेचा पुजारी बनला आहे. परंपरेतील कोणताही दोष त्याला दिसत नाही. फ्रेंचांनी यावे व सत्ताधीश व्हावे, पोर्तुगीजांनी यावे व अधिराज्य करावे, इंग्रजांनी यावे व साम्राज्य स्थापावे, याचा अर्थ काय ? आपण निस्सत्त्व बनलेले होतो व कोणतेही परदेशीय आपल्यावर अधिसत्ता गाजवू शकत होते, याचे मूळ आपल्या परंपरेतच कुठेतरी लपलेले होते. हे उघड सत्य, 'धोंड्यामधूनी दिसणाऱ्या' कवीला दिसू नये, हे आश्चर्य होय. पण आश्चर्य तरी कां वाटावे ? विनायकाला समाजस्थितीचे दर्शन घडले नव्हते आणि आपल्या काळाची नसही सापडलेली नव्हती. १८९३ मध्ये हिंदू-मुसलमानांचे दंगे पेटले होते. राष्ट्रसभेच्या कार्यकर्त्यांच्या दृष्टीने, व स्वतः टिळकांच्याही दृष्टीने, ही राष्ट्रीय आपत्ती निर्माण झाली होती. पारतंत्र्याचे पाश आवळायला असले जातीय दंगे अनुकूल असतात, याची जाणीव टिळकांना होती, म्हणूनच या दंगलीमागे इंग्रजांचा हात आहे, असे निस्संदिग्धपणे त्यांनी केसरीतून जाहीर केले होते. त्याचवेळी विनायकाने 'ध्यास तो भास' या काव्यात

"निजधर्म त्यजिला त्वा, यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला
टाकूनी अमृतवल्ली आवडीने घेतला करी कुचला"

या शब्दात 'यवन धर्म हा हीन आहे; विषसमान आहे' अशी शिकवणूक द्यायला सुरुवात केली होती. तत्कालीन नेत्यांना नको होते तेच त्याच्या कवनातून विकत होते. विनायकाच्या राष्ट्रीय कवितेचे आशयात्मक वैशिष्टच असे की, त्याच्या सर्वच प्रकारच्या काव्यात मातृभूमीविषयक प्रेम आणि स्वातंत्र्याची आसक्ती दिसून येते. त्यातही गतवैभवाचा शोक हाच स्थायी भाव अधिक प्रमाणात आढळतो. "आपले पूर्ववैभव नष्ट झाले व आपण पारतंत्र्यात अवनत अवस्थेमध्ये आहोत, या घटनेबद्दल शोक करणे किंवा पूर्वजांचे वैभव व पराक्रम गाऊन स्वातंत्र्य मिळविण्यास प्रोत्साहन देणे, असे दोन प्रकार राष्ट्रीय काव्यात आढळतात कवी विनायक आणि अज्ञातवासी यांची कविता स्थूल मानाने पहिल्या प्रकारात पडते."[१५]

विनायकाच्या शैलीसंबंधी विचार करता लक्षात येते की, त्याने इंग्रजावर वारंवार टीकास्त्र उपसले. काही वेळेला ते उघड आहे, तर काही वेळेला ते गर्भित आहे. "इंग्रजांच्या त्या कायदेशीर राजवटीत परतंत्र भारताला उघड उघड सूचना देता येणे शक्य नव्हते. तेव्हा विनायकांनी (प्रो. छत्र्यांचा केसरी या कवितेतील) त्या सर्कशीतील सिंहाच्या आड 'ही इष्ट नव्हे परवशतेत बहाली' असा आपल्या राष्ट्राला इशारा देऊन टाकला."[१६] सिंहाच्या पिंजऱ्यावर विनायकाने परतंत्रतेचे प्रतीक पेरले, ते अभिव्यक्तीतील विविधता, नवीनता म्हणून; इंग्रजांच्या कायदेशीर राजवटीत उघड सूचना करता येत नव्हते, म्हणून नव्हे. कारण,

---

१५. अर्वाचीन मराठी काव्य,--रा. श्री. जोग, पृ. २७.

याच संदर्भात म. ना. अदवंत, 'महाराष्ट्र लक्ष्मी'च्या प्रस्तावनेत पृ. १२ वर म्हणतात, "विनायकांच्या राष्ट्रीय काव्यामध्ये दोन महत्वाचे भावनाप्रवाह आलेले आढळतात. एक पूर्ववैभवाचे स्मरण व दुसरा ते हरविल्याबद्दल व सद्यपरिस्थितीबद्दल वाटणारी खंत."

१६. विनायकांची कविता,–म. श्री. पंडित,–पृ. ६१

कठीण काळ आला पाही
देशभक्ती ज्याचे ठायी
ठरतो तो राजद्रोही...
..अथवा कोणाच्या देशावर स्वबलमदे कोण चालवी सत्ता
दुबळ्याच्या नम्र शिरी निर्दय बलवंत हाणिती लत्ता..
..आर्यभूमी घायाळ जाहली रक्ताने न्हाली—
उठा करा संरक्षण–जन हो तिचे यथाकाली
पारतंत्र्य शृंखला वाजते पायी खळखळते–
कर्कश रव नायकवे तीचा हृदय विद्ध होते !

अशी विदारक उघड टीका विनायकानेच इंग्रजावर केली असून, पारतंत्र्या विरूद्ध उठाव करण्याचे जनतेला सरळ सरळ आवाहन केले आहे; याचे समर्थन एरवी कसे करता येणार ? तेव्हा कधी वक्रोक्तीतून तर कधी उघड अशा निवेदन शैलीच्या भिन्नतेतून आपला आशय त्यांनी व्यक्त केला आहे; उघड सूचना करता येणे शक्य नव्हते म्हणून वक्रोक्तीचा आधार घेतला, असे म्हणणे, हे वस्तुस्थितीचा विपर्यास करणे होय.

* विनायकाच्या राष्ट्रीय कवितेचे धार्मिक स्वरूप स्वधर्माभिमानीच होते असे नाही, तर परधर्माचा तिरस्कार करणारेही होते, मुसलमान हे दुर्जन आहेत, यवनधर्म हीन आहे, परमेश्वरप्राप्तीपासून तो दूर नेणारा आहे, हिंदुधर्माच्या हिऱ्यापुढे ती गारगोटी आहे, असे अनेक उद्‌गार त्याने काव्यातून काढले आहेत. हे विचार राष्ट्रीय एकात्मतेला बाध आणणारे आहेत. मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष म्हणतात,[१७] "तो इतिहास अतिरंजित होता, त्याला धर्माभिमानाचे अधिष्ठान मिळाल्यामुळे राष्ट्रीय ऐक्यभावनेला तो बाधक होता आणि नवी परिस्थिती ही त्याची केवळ पुनरावृत्ती आहे हा समज भोळा आहे, इ. आक्षेप आज सबळ ठरले तरी त्या काळी त्यांची मातब्बरी नव्हती." या विधानातील पूर्वार्ध खरा आहे; पण त्याकाळी त्यांची मातब्बरी नव्हती, हे म्हणणे मात्र सर्वस्वी वस्तुस्थितीला सोडून

१७. पाच कवी, पृ. १०६

आहे. कारण, हिंदु-मुसलमानांच्या दंग्याच्या काळात म्हणजे १८९३ मध्ये इंग्रजांनी आपले साम्राज्य स्थिर करण्यासाठी हिंदु-मुसलमानात यादवी घडवून आणली होती, असा अभिप्राय स्वत: टिळकांनीच दिला होता. स्वधर्माचा अतिरेकी अभिमान व परधर्माबद्दलचा जळजळीत द्वेष हा राष्ट्रहिताला घातक आणि मारक ठरतो, अशी धारणा अगदी प्रारंभापासून सर्वच भारतीय लोकनेत्यांच्या मानमात दृढमूल झालेली होती, हे ऐतिहासिक सत्य आहे. म्हणून, टिळक ज्या दृष्टीने ब्रिटिश राज्यकर्त्यांना अराष्ट्रीय मानीत, त्याच दृष्टीने, हिंदु-मुसलमानांच्या ऐक्याला बाध आणणारी कविता ही देखील अराष्ट्रीय मानता येईल.

* राष्ट्रीय कवितेच्या परंपरा व प्रकार सांगताना डॉ. वा. भा. पाठकांनी "गतेतिहासातील स्फूर्ती चेतविणाऱ्या घटना अथवा व्यक्ती यांना आपल्या कवितेत स्थान देऊन त्यांचे यशोगान करणे, ही प्रथा सावरकर-विनायकांपासून माधव-तिवारीपर्यंत चालत आलेली दिसते"[१८] असे विधान केले आहे. राष्ट्रीय कविता आणि पूर्वजस्मृतीपर कविता यांत अभेद मानला तरच हे विधान तर्कशुद्ध ठरेल. परंतु, राष्ट्रीयता व पूर्वज वैभवस्मृती यांत सदैव अभेद असतोच, असे नाही, केवळ राजकीय दास्य सोडले, तर इतर कोणत्याही क्षेत्रातल्या दास्याचा तिरस्कार विनायकाच्या कवितेत नसल्याने, तिला व्यापक अर्थाने राष्ट्रीय कविता म्हणणे, केवळ अशक्य आहे. शिवाय, स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतु:सूत्रीचा त्याच्या काव्यात कुठेही उद्घोष नाही. एवढेच नव्हे, तर देशातील अत्यंत क्रांतिकारी घटनांकडेही त्याचे संपूर्ण दुर्लक्ष झालेले आहे. लाल, बाल, पाल या त्रयींचे नाव साऱ्या महाराष्ट्रात दुमदुमत असता लाला लजपतराय व बिपीनचंद्र पाल यांचा साधा उल्लेखही (टिळकांबरोबर) त्याच्या कवनात नसावा, इतकी त्याच्या कवितेची भौगोलिक व्याप्ती संकुचित आहे. मात्र त्याची स्वत:ची मातृभूमीविषयक भक्ती अलोट आणि स्वधर्मबांधवप्रीती उत्कट आहे. या उत्कटतेमुळेच मराठ्यांच्या इतिहासाबद्दलचा अफाट

१८. आधुनिक मराठी काव्यातील अंत:प्रवाह.

अभिमान त्याला आहे. या इतिहासपूजनाचा एक परिणाम असा झाला की, मुसलमानासंबंधी वैरत्वाची भावना त्याच्या मनातून कधीच गेली नाही. मोगल हे शिवाजीचे शत्रू होते, हे भूतकाळातील शल्य तो वर्तमान-काळाशी निगडित करतो. त्यामुळेच शिवकालात जी गोष्ट कदाचित् राष्ट्रीय ठरू शकली असती, तीच आज कालसापेक्षतेमुळे अराष्ट्रीय ठरू शकते, या महत्त्वाच्या गोष्टीकडे त्याचे संपूर्ण दुर्लक्ष झाले. टिळक हे विनायक, परांजपे प्रभृतीप्रमाणे धर्मवेडे नसले, तरी आगरकरांच्या बुद्धि-प्रामाण्याला विरोधी अशा, सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचाच त्यांनी राज-कारणाला आधार घेतला होता. टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन करताना आचार्य जावडेकर लिहितात, "लोकमान्यांनी सांस्कृतिक पुनरुज्जीवनाच्या आधारावर जे राष्ट्रीयत्व निर्माण केले त्यामुळे त्यांच्या हयातीत महा-राष्ट्रातील ब्राह्मणेतर जनतेत फारशी राजकीय जागृती झाली नव्हती." यावरून त्यांच्यापेक्षा कितीतरी पटींनी सनातनी असलेली विनायकाची कविता बहुजनसमाजापासून किती योजने लांब असावी, याची सहज कल्पना येते. जावडेकर पुढे म्हणतात, "त्यांच्या मृत्यूनंतरच्या परिस्थि-तीत याच सांस्कृतिक राष्ट्रीयत्वाचा आधार घेऊन त्यांचे अनुयायी म्हणविणारे काही लोक पुढे राष्ट्रसभेला विरोध करू लागले व आमची विशिष्ट संस्कृती रक्षण होत नसेल तर ते स्वराज्य आम्हास नको, म्हणून परकीय सत्तेशी सहकार्यही करू लागले ! यावरून स्वसंस्कृतीचा अभिमान हा नेहमी प्रखर राष्ट्रीय राजकारणास पोषकच होईल, असे म्हणता येत नाही. इतकेच नव्हे, तर पाश्चिमात्य भांडवलशाही हीच आपली संस्कृती म्हणून तिला प्रेमाने कवटाळणारे आणि हिंदु संस्कृतीच्या नावाने फॅसि-झमचा पुरस्कार करणारे अनेक लोक आज निघत आहेत."[१९] विनायकाच्या धर्माधिष्ठित राष्ट्रीय काव्याचे किती भीषण दुष्परिणाम होऊ शकतात, याचे याहून अधिक मार्मिक विश्लेषण कोण करू शकेल ? विनायकाने इतिहासावर व तज्जन्य स्वधर्माभिमानावर खिळलेली आपली दृष्टी, आपले पूर्वग्रह सारून बाजूला पाश्चिमात्य संस्कृतीकडे वळविली असती,

---

१९. आधुनिक भारत, पृ. २३०

तर केवळ बायरनप्रमाणेच नव्हे, तर लोकहितवादीप्रमाणेही, त्याला राजेशाहीचा अस्त आणि लोकशाहीची अरुणप्रभा दिसू लागली असती. या दृष्टीतून जन्मास आलेल्या काव्याने एक वेगळीच क्रांती घडवली असती आणि आधुनिक भारताच्या निर्मितीत त्या काव्याचा गौरवपर उल्लेख करणे, क्रमप्राप्त ठरले असते. पण दुर्दैवाने तसे घडावयाचे नव्हते. त्याची कविता गतकालीन विचारसरणीच्या आवर्तनात गुरफटून पडली होती. निजसंस्कृतीच्या अभिमानामुळे डोळे बांधले गेल्याने नव्या जाणीवांची विज्ञानप्रणित पाऊलवाट तिच्या नजरेआड झाली. त्याची प्रतिभा राष्ट्रीयत्वाची नवी धारणा पेलायला असमर्थ होती. म्हणून विनायकाला 'राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्गाते'[२०] म्हणण्याऐवजी 'निजसंस्कृतीचे पवाडे गाणारा पहिला आधुनिक कवी' म्हणणेच संयुक्तिक होईल; आणि हेच मराठी कवितेतील त्याचे खरे स्थान आहे.

---

२०. आधुनिक मराठी कवितेत विनायकाबद्दल भ. श्री. पंडितांनी काढलेले हे उद्गार आहेत. सामाजिक बंधुभाव, आर्थिक समता व राजकीय पारतंत्र्याची जाणीव ज्याच्या कवितेत आहे त्या केशवसुताला त्यांनी राष्ट्रीय कवितेचे पहिले उद्गाते म्हटलेले नाही. कारण, रूढीविरूद्ध हल्ले, सामाजिक विषमतेबद्दल असंतोष व आर्थिक पिळवणुकीने होणारी व्यथा ही ज्या काव्यात आहेत, ते 'राष्ट्रीय' काव्य असण्यापेक्षा मातृभूमीचा अभिमान व राजकीय स्वातंत्र्याची अभिलाषा ज्यात उमटली आहे, तेच राष्ट्रीय काव्य, असे त्यांना वाटत असावे. पण हा राष्ट्रीयत्वाचा संकुचित अर्थ त्यांना आता सोडावा लागला आहे. मुंबई व उपनगर साहित्य संमेलनाच्या १८ व्या अधिवेशनातील अध्यक्षीय भाषणात ते म्हणतात, "या युगात केशवसुत, रे. टिळक, विनायक, सावरकर, गोविंद इत्यादिकांनी काव्याचे स्वरूप उज्ज्वल केले. त्यांच्या काव्यात राष्ट्रीय भावनांचे उद्भावन आहे." या विधानाप्रमाणे केशवसुतांच्या काव्यात राष्ट्रीय भावनांचे उद्भावन आहे, हे जर त्यांनी कबूल केले; तर त्याच्या मागाहून येणाऱ्या कवीला—विनायकाला—पहिले उद्गाते कसे म्हणता येईल ?

# ४. चंद्रशेखर–विनायक–केशवसुत

* प्रास्ताविक
* तीन संप्रदाय
* 'ऑगस्टन' कालखंड
* चंद्रशेखरांचा परंपरावाद
* 'रोमॅंटिक' कालखंड
* विनायकांचा पुनरुज्जीवनवाद
* 'रॅडिकल रोमॅंटिक' कालखंड
* केशवसुतांचा अभिनवतावाद
* निष्कर्ष

* तौलनिक अभ्यास करण्याकरिता चंद्रशेखर, विनायक आणि केशवसुत हेच तीन कवी निवडण्यामागे विशिष्ट दृष्टी आहे. वास्तविक हे तिघेही एकाच दशकातले कवी. केशवसुतांचा जन्म १८६६ मध्ये झाला आणि त्यांनी 'कविता आणि कवी' ही आपली पहिली कविता १८८५ मध्ये लिहिली. चंद्रशेखर १८७१ साली जन्मले आणि १८९५ मधील मधील 'कोकिल' या कवितेपासून त्यांच्या काव्यलेखनास प्रारंभ झाला. विनायकांचा जन्म १८७२ मधला असून त्यांची पहिली कविता सत्कार्योत्तेजक सभेसाठी १८९३ मध्यें अवतीर्ण झाली. म्हणजेच १८८६ ते १८९५ या दशकात तिघांनीही काव्यलेखनाला प्रारंभ केला. परंतु असे असूनही या तिघांच्याही काव्यांतर्गत आशयात आणि दृष्टिकोणात विलक्षण फरक आढळून येतो. हा भेद केवळ कवी-कवी मधील व्यक्तिगत स्वरूपाचा नाही, हे महत्त्वाचे प्रमेय लक्षात घेणे आवश्यक आहे. केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवी, टिळक, बी यांच्यातील फरक संप्रदायाचा नसून व्यक्तिसापेक्ष

वाटतो. उलट चंद्रशेखर विनायक व केशवसुत यांच्यातील वैधर्म्य सांप्रदायिक स्वरूपाचे जाणवते. म्हणून या तिघांच्याही विशिष्ट संप्रदायांचा अभ्यास केल्याशिवाय त्यातील एकाच्या अथवा तिघांच्याही कवितांचे संपूर्ण आकलन होणें केवळ अशक्य आहे. म्हणूनच विनायकाचा अभ्यास केशवसुत व चंद्रशेखर यांच्या सांप्रदायिक तुलनेनेच पूर्ण होऊ शकणार आहे. अर्थात् हा तौलनिक अभ्यास कवींच्या व्यक्तिजीवनाचा नसून काव्यांतर्गत आशय व काव्यदृष्टी एवढ्यापुरताच मर्यादित असणार, हे उघड आहे.

* चंद्रशेखरांच्या काव्याचे स्वरूप सहज पाहिले, तरी ते काव्य परंपरावादी असल्याचे ध्यानात येते. विनायकाच्या कवितेत पुनरुज्जीवनवादाचा स्पष्ट आढळ होतो आणि केशवसुत अभिनवतावादाचे[१] प्रणेते आहेत असे दिसून येते. वास्तविक केशवसुत हे या दोघांनाही वयाने आणि काव्यनिर्मितीच्या दृष्टीने ज्येष्ठ. पण तरीही गंमत अशी की, परंपरावाद, पुनरुज्जीवनवाद व अभिनवतावाद हा काव्यविकासाचा क्रम आणि उपरोक्त तीन कवींच्या काव्यनिर्मितीचा कालक्रम नेमका उलट आहे. या कवित्रयात सर्वाआधी कविता करूनही विकासाचा सर्वात पुढचा टप्पा केशवसुतांनी गाठला, तर सर्वात उशीरा काव्यलेखन करूनही चंद्रशेखर काव्यविकासाच्या सर्वात मागच्या पायरीवर उभे राहिले. चंद्रशेखर अजून चांदण्यात उभे आहेत, विनायक धूसर वातावरणात चाचपडत आहेत आणि केशवसुतांच्या कवितेला त्याच वेळी फुटत्या पहाटेचे दर्शन झाले आहे. असा हा काव्य-कालाचा चमत्कारिक संधिकाल आहे

* चंद्रशेखरांच्या काव्याचे स्वरूप आंग्लवाङ्मयातील ऑगस्टन कालखंडातील कवितेशी बरेच जुळते मिळते दिसते. प्रत्येक देशाच्या काव्यविकासात विशिष्ट स्तबके आढळून येतात. पाश्चिमात्य ललितलेखनातील

---

१. Romanticism ला डॉ. वाळिंबे 'स्वच्छंदवाद' म्हणतात. प्रा. श्री. के. क्षीरसागर 'सौंदर्यवाद' असे संबोधतात.डॉ.वि.भि. कोलते यांनी मला 'अभिनवतावाद' हा शब्द सुचविला आहे. हिंदीत त्याला 'छायावाद' म्हणतात. डॉ. कोलते यांनी सुचविलेला पर्याय अधिक अन्वर्थक वाटल्यामुळे तोच मी स्वीकारला आहे. प्रस्तुत लेखक डॉ. कोलते यांचा आभारी आहे.

अठराव्या शतकातील प्रवृत्ती आणि त्यांचे क्लासिकल वाङ्मयाशी नाते; व आपल्याकडील चंद्रशेखरांच्या कवितेची प्रकृती आणि तिचे पंडित-कवीशी नाते हे सामान्यतः समप्रकृती आहे. म्हणूनच वाङ्मयेतिहासाच्या दृष्टीने ऑगस्टन काव्याची प्रकृती चंद्रशेखरांच्या काव्यप्रवृत्तींचा अभ्यास करायला नुसती सहाय्यभूतच नव्हे, तर अपरिहार्य ठरणार आहे.

ड्रायडन, जॉन्सन आणि पोप यांचा कालखंड म्हणजे ऑगस्टन काल समजला जातो. वास्तविक, हे युग अभिजातवादाचेच (Classical) होय. परंतु याला ऑगस्टन म्हणण्याचे कारण एवढेच की, लॅटिन वाङ्मयात ज्या प्रमाणे ऑगस्टसचे युग हे सुवर्णयुग मानले जाते, त्याप्रमाणे पोपकालीन प्रज्ञावंत १८ वे शतक सुवर्णयुग समजत असत. त्यांच्या युगाला अभिजात-वादाचे परंपरायुग म्हणता येईल. कारण, एक तर त्यांच्यामते अभिजात-वादी लेखकांनीच आदर्श वाङ्मय निर्माण केलेले होते; व उत्तम अभिरुचीची तीच परिणत अवस्था होती. आणि दुसरे असे की, अभिजातवादी लेखका-प्रमाणे त्यांचाही व्यक्तिसापेक्ष प्रतिभेवर विश्वास नसून आप्तवाक्य त्यांना प्रमाण वाटत असे, जुन्यांची प्रतिकृती म्हणजेच उत्तम वाङ्मय ही त्यांची धारणा होती. जुन्यांची वाङ्मयीन बंधने झुगारून दिली म्हणून शेक्स-पिअरला देखील ते कमी प्रतीचा मानीत. बुद्धिवाद आणि उपयुक्ततावाद यांचा संगम साधणारा सुसंस्कृतपणा हा त्याकाळचा आदर्श होता. म्हणूनच तत्कालीन सांप्रदायिकांनी वाङ्मयातून भावनिक खळबळ चेतविण्याऐवजी रसिकांच्या बुद्धिवादालाच आवाहन केले आहे. तत्कालीन लेखकांचा खरा भर होता तो वैचारिकतेवर; वर्डस्वर्थ किंवा रोमॅंटिक कवीप्रमाणे भाव-नेच्या उत्कटतेवर नव्हे. विचार-प्रधानताच मानवाच्या सर्वांगीण सुधारणेचा एकमेव मार्ग असू शकतो, हा दृढविश्वास या मागे उभा होता.[२] विशिष्ट

२. It was very definitely the age of understanding, the age of enlightenment when literature which had become clear and pellucid began to diffuse knowledge among a growing public. The supremacy of Reason was scarcely challanged, there reigned a general belief in the advancement of human mind.—A Short History of English Literature Emile Legouis-P. 195.

विचारांचे व मर्यादांचे अधिष्ठान असल्यामुळे समाजाच्या उन्नतीकरिता धार्मिक बंधनाची आवश्यकता त्यामुळेच त्यांना भासत होती. समाज नियमनाकरिता पोलिसांची जी गरज तीच व्यक्तिमनाचा कोणताही तोल सावरण्याकरिता धर्माची आहे, असे त्यांना वाटे. अर्थात् सर्वच क्षेत्रातला अतिरेक व भावनांची उत्कटता टाळणे हेच तत्कालीन प्रतिभासंपन्न लेखकांचे लेखन-प्रयोजन असणे स्वाभाविक होते. व्यक्तिस्वातंत्र्य अथवा आत्मनिष्ठा ह्या चिरंतन वाङमयवैशिष्टयांचा अत्यंत अभाव, हे या वाङमयाचे आणखी एक स्वरूप. वाङमयाची निर्मिती समष्टीकरिता, लोककल्याणाकरिता, समाजजीवनाला आदर्श घालून देण्याकरिता आहे; स्वतःच्या भावाविष्काराकरिता नव्हे; ही तेव्हाची वृत्ती होती. व्यक्तिभावनेपेक्षा समाजभावनेलाच अधिक प्राधान्य दिले जात असे. त्यांचा भर बुद्धिवादावर असल्यामुळे शहरी जीवनाच्या संकुचित क्षेत्रापलीकडे फारसे क्षितिज त्यांनी पाहिले नाही, अनुभवले नाही किंवा शब्द-साकार केले नाही. कॉफी हाऊसमध्ये अथवा घरच्या दिवाणखान्यात बसावे व तत्कालीन पांढरपेशीयांच्या समाजकारणावर अथवा राजकारणावर लिहावे, एवढ्याच अनुभूतीच्या डबक्यापुरते त्यांचे लेखन सीमित झाले होते.[3] म्हणून त्यांच्या काव्यात निराशेला स्थान नाही. परिस्थितीशी जुळते घेण्याचा त्यांचा स्वभावधर्मच आहे. जीवन आणि तत्वज्ञान यांच्या तत्कालीन धारणावर त्यांचा संपूर्ण विश्वास असल्याने त्या वाङमयात सर्वत्र समाधानाचे सूर उमटले आहेत. त्या वाङमयाचे आणखी एक वैशिष्टय असे की, रचनेच्या ते सर्वस्वी आहारी गेले आहे. रचनेसाठी आशयाचाही त्याग करायची जणु त्यांची तयारी आहे आणि वरवरची कुसर अथवा कारागिरी त्यांना प्राणापलीकडे प्यार आहे. त्यांची रचना म्हणजे भूमितीची अगदी काटेकोर मोजमापच. या कारागिरीच्या हव्यासा-

---

३. The principal characteristic of the age was its urbanity. To urbanity pertains interest in men, chiefly as living in civilised society, in domestical nature, in usefulness and the moral way, in the whole more than the part in construction and rule; in doctrine, in logic, wit and polish.

पोटी त्यांचे काव्य निष्प्रभ व अत्यंत कृत्रिम स्वरूपाचे झाले आहे.* विशिष्ट आशय विशिष्ट वृत्तातूनच आविष्कृत झाला पाहिजे, असा समज असण्याचे कारणही हेच होय. 'कल्लेद' हेच वृत्त काव्यातील गांभीर्य व्यक्त करू शकते, असे या मंडळीचे खास मत असल्यामुळे या चाकोरीपलीकडे ते कधी गेले नाहीत. म्हणूनच या कालखंडातील वाङमयाने खऱ्याखुऱ्या अर्थाने कलेपेक्षा कारागिरीचेच वाङमय निर्माण केले, असे म्हणावे लागते.

* ऑगस्टनकालीन पोपप्रभृती लेखकांप्रमाणेच समाजबंधनप्रियता, रूढ चाकोरीतून जाण्याची प्रवृत्ती, जुन्या वळणाच्या श्रेष्ठत्वाची हमी इत्यादी गोष्टी चंद्रशेखरात स्पष्टपणे दिसून येतात. अर्थातच त्यांची तुलना ऑगस्टन कालखंडातील लेखकाशी करणे स्वाभाविक ठरते. मुक्तेश्वर, रघुनाथ, वामन, श्रीधर, मोरोपंत इ. पंडित कवींचा त्यांनी 'कवितारती' मध्ये सादर गौरव केला आहे, हेही परंपराप्रियतेचे द्योतक होय. त्यांचा परंपराभिमान 'कविसंदेश'मध्ये

> कवि, तत्त्वज्ञही, पंडित, कलानिधी, राजकारणी, वीर,
> धर्मज्ञ आणि योगी ह्यांचे हे भरतखंड आहेर
> गुण भूमिचाच या की, नरमणी हे तिजमधूनीं निपजावे,
> त्यांनी निजकिरणांनी अन्यांचे नयनसंघ दिपवावे

या ओळीतून स्पष्ट दिसतो. 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' या मनुवचनाचा पाठपुरावा करणाऱ्या' तेथे प्रभुत्व अधिकारही गाजवाया । का इच्छितात न कळे अबला मला या' या ओळीतूनही त्यांचा परंपराभिमान स्पष्ट दिसतो. (स्त्री स्वातंत्र्यासाठी घराबाहेर पडणाऱ्या इब्सेनच्या नोराची वाचकांना येथे विरोधाने आठवण व्हावी.) "चंद्रशेखर हे आधीच्या पंडित युगाचे अर्वाचीन काळातले प्रतिनिधीच राहिले आणि ते प्रतिनिधत्व त्यांनी

---

• ४. Extreme devotion to form and a love of superficial polish led to the establishment of a highly artificial and conventional styce, which presently became stereotyped into a regular traditional poetic diction.— Outline of History of English Literature— Hudson

चांगल्याप्रकारे केले."[५] दुसरे असे की, पंडित कवीप्रमाणे अथवा ऑगस्टन काळाप्रमाणेच, त्यांचे निसर्ग चित्रण वस्तुनिष्ठ राहिले आहे. कोकिळावर्णन ते करतात; पण त्या कोकिळेच्या गाण्याने चंद्रशेखरांच्या हृदयात उमटलेले पडसाद ऐकायला मिळत नाहीत; कोकिळेचे केवळ वस्तुनिष्ठ वर्णन वाचायला मिळते. निसर्गातिही विशिष्ट प्रकारचा पद्धतशीरपणा आहे; विशिष्ट नियम, त्यामुळे व्यक्तिपरत्वे त्याचे स्वरूप विविधतेने जाणवण्यापेक्षा त्या नियमांचीच प्रचिती आपल्याला येते. याच तत्त्वज्ञानाचा परिपोष, पोपप्रमाणेच,[६] त्यांच्या निसर्गविषयक कल्पनेत आढळतो. तिसरे वैशिष्टय म्हणजे, त्यांचा दृष्टिकोणच असा वस्तुनिष्ठ असल्यामुळे त्यात आत्माविष्काराचा आत्यंतिक अभाव आहे. आत्मनिष्ठेची उणीव, हे ऑगस्टन काळाचे वैशिष्टय चंद्रशेखरातही आढळते. काव्यातून आत्माविष्कार ही वर्डस्वथेची भूमिकाच[७] त्यांना अमान्य होती. अविभक्त कुटुंबपद्धतीच्या वातावरणात वाढलेल्या चंद्रशेखरांना "व्यक्तिगत सुखदुःखाच्या आविष्काराकरिता काव्यलेखन करणे अप्रशस्त आणि अप्रयोजक वाटत होते. असे करणे म्हणजे चारचौघात वस्त्रे फेकून देऊन नागवे हिंडण्यासारखे आहे, अशी त्यांची समजूत होती. वैयक्तिक भावनांचा सहजोद्गार हे

---

५. कुंजकूजन–प्रस्तावना, रा. श्री. जोग, पृ. ८

६. पोप लिहितो,

'Nature like liberty is but restrained
By the same laws which first himself ordained...
Learn hence for ancient rules a just esteem,
To copy nature is to copy them.

(Essay on Criticism)

७. "I have said that the poetry is the spontaneous overflow of powerful feelengs;it takes its origin from emotion recollected in tranquility; the emotion is contemplated till, by a species of reaction, the tranquility gradually disappeares, and an emotion, kindred to that which was before the subject of contemplation, is gradually produced, and does itself actually exist in the mind."

Preface to Lyrical Ballads-W. Wordsworth.

काव्याचे सर्वस्व नव्हे; तर त्या भावनांना प्रौढ आणि अवैयक्तिक स्वरूप देऊन त्यांची सालंकृत टापटिपीची मांडणी केल्याने त्यांना जे प्रतिष्ठित स्वरूप प्राप्त होते ते काव्य होय, अशी त्यांची काव्यदृष्टी होती"[८] वैयक्तिक भावनाविष्कार म्हणजे काव्य नव्हे, हे मान्य केले की, वैचारिकता हेच काव्याचे प्रधान लक्षण होऊन बसते. चंद्रशेखरांचे नेमके हेच झाले आहे.

जे जे निसर्ग रमणीय म्हणोनी काही
निर्माण होऊनी जगी विलसूनी राही
सौंदर्य ते नयनगोचर होय साचे
अज्ञेयशा भुवन सुंदर ईश्वराचे
विश्वास ठेऊनी मनात असा विवेके

'जळावीण मासोळी'सारख्या तळमळणाऱ्या भावनेतून नव्हे, तर विवेकातून परमेश्वरावर विश्वास ठेवणाऱ्या चंद्रशेखरांच्या कवितेचा आत्माच वैचारिकतेचा आहे. "भावनेपेक्षा चिंतन हे त्या विषयाचे स्वरूप आहे. त्यातही नवविचारप्रवर्तनापेक्षा रूढ सर्वमान्य असे विचारच समजून सांगण्याकडे त्यांची प्रवृत्ती होती."[९] चंद्रशेखरांच्या कवितेचा "उद्‌भव भावनेच्या अतिरेकातून न होता, विचारांच्या परिणतावस्थेतून होतो. एखादी गोष्ट पाहाताच त्यांच्या हृदयातील भाव तर जागृत होतातच; परंतु लागलीच डोक्यातील विचारही थैमान घालू लागतात. आणि अशा तऱ्हेने भावना व व विचार यांनी युक्त असे त्यांचे काव्य तयार होते."[१०] वैचारिकतेला प्राधान्य आणि आत्माविष्काराचा अभाव ह्यामुळे चंद्रशेखरांच्या परंपरावादी काव्याचे 'साधारणीकरण' हे आणखी एक लक्षण लक्ष वेधून घेते. सर्वांना मान्य असलेल्याच गोष्टी काव्यात यायला पाहिजेत, अशी त्यांची दृष्टी आहे. म्हणजेच संस्कृतमधील 'साधारणीकरणा'वर त्यांचा विश्वास आहे. शकुंतला सासरी जाताना कण्वऋषींच्या मनाला होणाऱ्या वेदना सार्वत्रिक म्हणजे सर्वच वडिलांच्या अनुभवाला येणाऱ्या असल्या पाहिजेत.

---

८. मराठी साहित्याची रूपरेषा-वि. पां. दांडेकर
९. आधुनिक मराठी कविता. भ. श्री. पंडित.
१०. आधुनिक मराठी कविता–भ. श्री. पंडित

किंबहुना, काव्यात असेच विचार अनुस्यूत असावेत की, सर्व प्रकारच्या लोकांना ते सर्वकाल मान्य होतील, व्यक्तिवैशिष्टच त्यात असणार नाही.

शिशु लहान जे काव्य चोखिती,
समजती मुले नित्य वाचती
पुरुष बायका सर्व जाणती
जरठ लोक जे काव्य वानिती
सरसरम्य ते काव्य तू लिही–

ही त्यांची भूमिका आहे. "चार चौघासारखे चालले बोलले पाहिजे; चाल चुकली तरी बोल बदलू नये, असा संकेत असला पाहिजे .... आणि त्यामुळेच त्यांच्या काव्यातील भावना सार्वजनिक होत्या."[११] ऑगस्टन कालखंडतील कवी जसे शहरी जीवनामध्येच मश्गुल होते; ग्रामीण जीवनाचा जराही संपर्क त्यांनी कधी साधला नव्हता; तशीच चंद्रशेखराच्या कवितेने सामान्य माणसापासून फारकत घेतली होती. ('काय हो चमत्कार' हे कथाकाव्य अपवाद आहे.) त्यांना कविता म्हणजे समारंभ वाटत असे. दिल्ली दरबार–निमत्त 'करमणूक' साप्ताहिकाने काढलेल्या खास अंकांकरिता रचलेली 'हिंदवंदना' 'राजनीतिगीतिका' किंवा नववर्षाकरिता, संक्रमणाकरिता, गायकवाड महाराजांच्या सुवर्णमहोत्सवाकरिता अशा प्रासंगिक कवितांची पदोपदी निर्मिती, हे त्याचेच द्योतक आहे. कविता सर्वमान्य असावी, वैयक्तिक दु:खाचे तीत प्रदर्शन नसावे या धोरणामुळे त्यांच्या काव्यात निराशावादाचा आढळ कुठे होत नाही, हे त्यांचे आणखी एक परंपरावादी वैशिष्ठच. भरतमुनीच्या नाटयशास्त्रात शोकांतिका लिहू नये, असा दंडक घातला आहे. निराशा ही वैयक्तिक स्वरूपाची असल्याने जनामध्ये अप्रदर्शनीय आहे, ही वृत्ती ऑगस्टन काळात व पंडित काळात सर्वत्र आढळते. "स्वत:च्या सुखदु:खाचे आपल्या काव्यात उघडेनागडे प्रदर्शन करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता" असे निदान भ. श्री. पंडितांनी केले आहे. वास्तविक हा त्यांचा स्वभाव नव्हता, असे म्हणण्यापेक्षा, ही त्या संप्रदायाचीच बैठक नव्हे, असे म्हणणे अधिक अन्वर्थक होणार आहे. कारण विवंचना आणि अवहेलना यांनी त्यांचे जीवन

---

११. पाच कवी–मं. वि. राजाध्यक्ष.

व्यापलेले असूनही दुःखाचा अथवा निराशेचा मागमूस त्यांच्या कवितेत आढळत नाही. ऑगस्टन काळात रचनाचातुर्यालाच खरे काव्य समजण्याची प्रवृत्ती होती; यमक्या वामन व शब्दश्लेषी मोरोपंत यांचीही प्रकृती तीच. हीच प्रवृत्ती चंद्रशेखरांचीही आहे. आपल्या कवितेचे बहिरंग निर्दोष, निर्दोष व आकर्षक असावे म्हणून आपल्या प्रौढ रचनेने काव्याला सालंकृत करून आणि शब्दांची कारागिरी साधून एकंदर रचनासौष्ठवाला त्यांनी घोटीवपणा आणलेला आहे. सुयोग्य शब्दरचना साधण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून आणि 'आजन्म मानसिक व शारीरिक श्रम सोसून' त्यांनी भाषाप्रभुत्व कमाविलेले आहे.

चंद्रशेखरांच्या परंपरावादाची बैठक अशी पंडिती वळणाची व ऑगस्टन कालखंडाला सादृश स्वरूपाची आहे.

* कवी विनायकाचे 'प्रि-रोमँटिक' काळाशी बरेच जवळचे नाते आहे. विनायक हा जसा चंद्रशेखराप्रमाणे परंपरावादी नाही, तसाच तो केशवसुताप्रमाणे अभिनवतावादीही (Radical Romantic) नाही. पाश्चिमात्यांमध्येही असाच फरक वर्डस्वर्थ, कोलरीज, बायरन, शेली, कीटस् यांच्यात आणि स्कॉटमध्ये आढळून येतो. म्हणून स्कॉटला रोमँटिक म्हणावे की नाही, हा तिकडे वादाचा विषय झाला होता. वास्तविक, स्कॉटचे वर्गीकरण प्रि-रोमँटिक मध्ये म्हणजेच आपल्याकडील पुनरुज्जीवनवाद्यामध्ये व्हायला पाहिजे. परंपरावाद किंवा ऑगस्टनीझम हा केवळ जुन्याचे अंधानुकरण करणारा व जुने ते सोने मानणारा पंथ होय. त्यांना जुन्या नीतिनियमात बदल नको असतो. उलट पुनरुज्जीवनवादात किंवा प्रि-रोमँटिकमध्ये जुन्या परंपरेबद्दल जरी आदर आढळत असला, तरी त्यात परिस्थितिसापेक्ष बदल व्हावा, अशी त्यांची अपेक्षा असते. अभिनवतावादी आणि पुनरुज्जीवनवादी या दोघांनाही प्रचलित समाजात दोष आढळतात. म्हणून समाजाच्या रूढ चाकोरीपासून ते दूर जाऊ पाहतात. या भावनेचा परिपाक म्हणजेच व्यक्तिवाद, अशक्य-शक्यतावाद, अतिरेकीपणा व एकटोकीपणा होय. पण अभिनवतावादी आणि पुनरुज्जीवनवादी यात फरक एवढाच की, पुनरुज्जीवनवाद्यांना समाजव्यवस्था स्वाभाविक वाटते, ती कृत्रिम आहे अशी त्यांची भावना

नसते, समाजात राहणे इष्ट अशी त्यांची धारणा असते. इतकेच की, तत्कालीन समाजाऐवजी पूर्वकालीन समाजाशी ते अधिक समरस झाल्याने वर्तमानापासून ते दूर जातात. यातूनच त्यांचा निराशावाद निर्माण होतो. तर, पूर्वकालीन असो अथवा सद्यकालीन असो, समाजव्यवस्था व समाज-बंधनेच कृत्रिम आहेत, स्वतंत्र वृत्तीच्या माणसांवर ती लादली गेली आहेत, व्यक्तिस्वातंत्र्याची त्यामुळे गळचेपी होत आहे, अशी'रॅडिकल-रोमॅंटिक्स'ची-अभिनवतावाद्यांची-भूमिका आहे. म्हणून ते समाजबंधनापासून दूर आहेत. समाजापासून ते दोघेही दूर आहेत, याचा अर्थ पुनरुज्जीवनवादी लेखक तत्कालीन समाजापासून दूर आहेत, असाच घ्यावा लागतो. पुनरुज्जीवनवाद्यांनी पूर्वसुरींचा पक्ष उचलला आहे. धर्माबद्दल व चर्च–मंदिरासारख्या धर्मस्थानाबद्दल श्रद्धा बाळगली आहे. उलट, अभिनवतावादी, विश्वाशी समरस होतांना, धर्म-मंदिराचे माध्यम नेहमीच नाकारीत आला आहे. आणखी असे की, पुनरुज्जीवनवादी लेखक आपल्या तत्कालीन सांस्कृतिक किंवा राजकीय स्थितीबद्दल जरी नापसंती व्यक्त करीत असले, तरी ते बंडखोर कधीच नसतात. उलट, अभिनवतावादी लेखकांनी रूढ समाजाविरूद्ध ताबडतोब क्रांती पुकारली. परिणामतः ते धीट बनले, आत्मसंशोधन करू लागले आणि काव्यातील सखोल आणि आजवर कुणीही न पाहिलेल्या संघर्षाचा शोध घेऊ लागले. या दोन्ही वर्गांना अपुऱ्या, अप्रातिनिधिक रूढ समाजव्यवस्थेचा व शिस्तीचा उबग येतो. पण, प्रमेय, सूत्र, सिद्धांत व उत्कटता या बंडखोरीला आवश्यक असणाऱ्या घटकांचा पुनरुज्जीवनवादात अभाव आढळतो. प्रस्थापित सरकारच्या उणिवा दाखविणारे प्रखर विचार मांडण्याइतपत त्यांची प्रगती झाली होती खरी; पण त्यातून त्यांचा मार्ग निघाला तो, व्यक्तिगत पलायनवादाचा. उलट, अभिनवतावाद्यांना राजकीय कुचंबणा (त्यात आर्थिक, धार्मिक, सामाजिक कुचंबणाही अनुस्यूत आहे) म्हणजे मानवजातीवरील व स्वतःवरीलही संकट वाटले.[१२] म्हणजे, अभिनवतावादी मूर्तिभंजक बनले, तर पुनरुज्जीवनवादी मूर्तिपूजकच राहिले.

---

१२. "The earlier Romantic writers were unhappy about many aspects of their situation, cultural & polilical, but they

* विनायकाचे विचार प्रि-रोमँटिक तत्त्वप्रणालीशी जुळणारे आहेत. प्रि-रोमँटिकचे पहिले लक्षण म्हणजे, पूर्ववैभवाचे आकर्षण. विनायक तर पूर्ववैभवाकरिता वेडा झालेला कवी होता. पूर्ववैभवाचे पवाडे गाताना त्याचा उत्साह उदंड ओसंडून येतो. पूर्ववैभवाच्या सामर्थ्यावर उद्याचे भविष्यही घडविता येईल, असा साक्षात्कार त्याला आपल्या अंध इतिहास-भक्तीने घडतो. म्हणून पुनरुज्जीवनाचाच त्याने ध्यास घेतला आहे. श्री शिवाजीच्याच काळात तो अजूनही वावरत असून 'पुनरुज्जीवन हेतू पुराणा' सफल करण्याचेच त्याचे स्वप्न आहे. दुसरे असे की, या वैभवशाली इतिहासाच्या आकर्षणामुळे तो भूतकाळातच रममाण झाला आहे. "सामाजिक सुधारणांच्या काळात वावरूनही विनायकांनी आपली कविता समाजाभिमुख न ठेवता तिला ऐतिहासिक काळातच वावरू दिली, हे विशेष होय."[१३] अर्थातच या भूमिकेपासून उत्पन्न झालेला पलायनवाद हे विनायकाचे तिसरे वैशिष्टच. त्यांच्या काही कविता आशावादी आहेत खऱ्या; पण, त्या वर्तमानकाळाला विसरण्याच्या प्रयत्नात निर्माण झाल्या आहेत. शिवाय, जनवासापेक्षा विजनवासच त्यांना अधिक आवडतो. कवी टिळकांच्या वनवासी फुलाची, जीवितातले दुःख पाहून वनवासाचा आश्रय घेण्याची, प्रवृत्ती ही पलायनवादाचीच. नेमका हाच पलायनवाद विनायकात दृष्टीस पडतो. या जगात 'मात्सर्याचा वारा भरला आहे, अहंपणाचा पिसारा फुलला आहे, अज्ञानाची द्वाही मिरवते आणि आणि रसिकत्वाला थारा नाही' असे सांगून विनायक म्हणतो,

काय अशा जनतेत राहावे ?
काय पाहावे काय चाहावे ?
बरे राहणे निर्जन रानी,
ओढ्यासंगे गाणे गाणी !

---

were not rebelious. The latter Romantic writers revolted radically against their society because they were revolted by it, and this provoked a daring, an heart-searching, a struggle both deeper and more directed than anything their predecessors got into their poetry." The Romantic Conflict p. p. 14

१३. मराठी साहित्याची रूपरेषा—वि. पां. दांडेकर.

प्रि-रोमँटिकचे आणखी एक लक्षण असे की, तत्कालीन राजकीय स्थितीबद्दल ते नेहमीच नापसंती व्यक्त करतात. भारत परतंत्र असल्यामुळे तर ही नापसंती विनायकात तीव्र स्वरूपात दिसून येते. केवळ या राजकीय पारतंत्र्याच्या तिरस्कारामुळे आणि मातृभूमीच्या प्रीतीमुळे अनेक प्रबुद्धांनी त्याला राष्ट्रीय कवी म्हटल्याचे आपण पाहिले आहेच. पण गंमत अशी की, 'प्रि-रोमँटिक्स'चा हा राजकीय असंतोष कितीही वरच्या स्तराला गेला, तरी त्याची परिणती बंडखोरीत कधीच झाली नाही. तो त्याचा स्वभावच नव्हता. भारत पारतंत्र्यात असूनही बंडखोरीची भाषा विनायकात कुठेच नाही. त्याचा पीळ केवळ अकरणात्मक आहे. 'सार वस्तूंचा लोट सारखा परदेशी जाता' त्याला चीड तर येतच नाही; पण, 'नैवेद्यास्तव काही नुरले, काय करू आता' अशी अगतिकत्वाची, पलायनवादाला जवळची, जाणीव मात्र तो व्यक्त करतो. प्रि-रोमँटिक मध्ये प्रमेय, सूत्र, सिद्धात यांचा अभाव आढळतो; तसे मात्र महाराष्ट्राच्या पुनरुज्जीवनवादात दिसत नाही. याचे कारण पाश्चिमात्य राष्ट्रातील हा वाद स्वातंत्र्यकालीन होता, तर महाराष्ट्रातील हा वाद पारतंत्र्याच्या काळातील आहे. परतंत्र देशाच्या तत्त्वज्ञानाच्या बैठकीत आपोआपच फरक पडतो. चिपळूणकर व टिळक हे दोघेही पुनरुज्जीवनवादाचे थोड्याफार फरकाने पुरस्कर्ते. पण राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीत ते जसे जहाल होते; तसेच ते सामाजिक सुधारणांच्या विरुद्ध होते. टिळकांचा आशावाद कणखर व कर्तृत्वशक्ती दांडगी होती. त्यांच्या पुनरुजीवनवादाला या दोन्ही गुणांची जोड होती. या बाबतीत विनायकाचे त्यांच्याशी असलेले वैधर्म्य सोडले, तर विनायकाचा पुनरुज्जीवमवाद चिपळूणकर, टिळक यांच्याच पुनरुज्जीवनवादावर अधिष्ठित होता, हे कोणीही मान्य करील.

* रोमँटिसिझम आणि केशवसुत यांच्यात इतका घनिष्ट संबंध आहे की, मराठीतील अभिनवतावादाचा आद्य प्रणेता म्हणून केशवसुतांकडेच अंगुलिनिर्देश करावा लागतो. आंग्लवाङ्मयात ज्याला रोमँटिसिझम म्हणतात त्याचे महत्त्वाचे लक्षण म्हणजे व्यक्तिमाहात्म्य होय. या व्यक्तिमाहात्म्यामुळे कविता आता पूर्वीची वस्तुनिष्ठता सोडून आत्मनिष्ठ स्वरूपात प्रकट होऊ लागली. व्यक्तिस्वातंत्र्य हा तिचा बाणा झाला. समाजनियमांना दूर

झुगारून देऊन 'आत्मरतिः आत्मक्रीडा' अशा नव्या अवतारात ती अवतीर्ण झाली. व्यक्ती ही समाजाचा घटक आहे, असा दृष्टिकोण बदलून व्यक्ति-व्यक्तींनी मिळून समाज बनला आहे, असे तत्त्वज्ञानं उदयाला आले. 'स्वत्व' हा काळाचा, म्हणून कवितेचा, प्राण होऊन बसला. यातूनच दूसरे वैशिष्ट्य निर्माण झाले; ते आत्मविष्काराचे. सामान्य जनतेच्या नव्हे, तर स्वतःच्याच भावना कवितेतून रंगविणे, हे या संप्रदायाचे व्यवच्छेदक लक्षण होय, रोमँटिसिझमचा आद्य प्रणेता वर्डस्वर्थ तर, उत्कट भावनांचा सहजोद्रेक म्हणजे काव्य, अशी व्याख्याच करून ठेवतो. परंपरावाद्यांचा भर जर वैचारिकतेवर तर अभिनवतावाद्यांचा भावनेवर आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. भावनेचे केवळ प्राधान्यच नव्हे, तर तिची उत्कटता म्हणजे रोमँटिसिझम. ही भावनेची उत्कटता त्यांना जनसमुदायापेक्षा निसर्गसान्नि-ध्यातच अधिक जाणवे. निसर्गरमणीय परिसरात आपल्या भावना अधिक आवेगी होतात, हा साऱ्यांचाच अनुभव आहे. म्हणून निसर्गाची आत्यंतिक ओढ हे त्यांचे आणखी एक वैशिष्टय. वर्डस्वर्थने निसर्गालाच परमेश्वर मानले आहे; व पँथॅईझमचा, म्हणजे निसर्ग व परमेश्वर एकरूप आहेत, या तत्त्वज्ञानाचा त्याने पुरस्कार केला. इतकेच नव्हे, तर बुद्धिप्रामाण्यापेक्षा निसर्गन्यायालाच तो प्रमाण मानीत असे. निसर्गाची प्राणपणाने पूजा ही शहरी राहणीतील कृत्रिमतेच्या तिरस्कारात परिणत झाल्यास नवल नाही. प्रौढ वयातच कृत्रिमतेचे व औपचारिकतेचे नाते अधिक जुळते; बालपणी माणूस स्वाभाविक, नैसर्गिक पद्धतीने वागतो. म्हणून हे कवी बालपणाचे गोडवे गाऊ लागले. बालपणाचे त्यांना जे विलक्षण आकर्षण होते, ते यामुळे. मानवी जीवनाची उन्नती व्हावयास हवी असेल, तर मनुष्याने बालपणातील नैसर्गिक प्रवृत्तींना जपले पाहिजे, असे त्यांचे मत. त्याचबरोबर, शहरी राहणीत कृत्रिमता आढळते म्हणून नागरी जीवनाचाही ते तिटकारा करीत. वर्डस्वर्थने आपल्या 'लिरिकल बॅलडस्'च्या प्रस्तावनेत स्पष्ट उद्‌गार काढले आहेत की, ग्रामीण जीवनावर काव्य लिहिणे, हेच नैसर्गिक असून, खऱ्या-खुऱ्या जीवनाचे दर्शन जसे त्यांच्या राहणीतून होते, तसेच अंतर्यामातील उत्कट भावनांचा आविष्कारही त्यांच्याच बोलभाषेतून होतो. निसर्ग-सान्निध्यामुळे कविप्रकृती चिंतनशील होत जाते. सर्व विश्वाचे व्यापकतेने

चिंतन करण्याची निसर्गसान्निध्याने सवयच जडते. आणि मग, ॲबरक्रॉम्बी म्हणतो त्याप्रमाणे, चिंतनशीलता हा रोमँटिक कवींचा स्थायीभाव बनतो. या चिंतनशीलतेमुळे निसर्गसौंदर्यातच नव्हे, तर सर्व थरातील सौंदर्याच्या संवेदनेत एक प्रकारची नवलाई (Strangeness) निर्माण होते. वॉल्टर पेटर म्हणतो, "सौंदर्याचा सुघटपणा म्हणजे जर अभिजातवाद, तर सौंदर्यातील नवलाई म्हणजे अभिनवतावाद."[१४] या सौंदर्यपूजेतून गूढगुञ्जनाची वलये उठतात आणि मनोहारी कल्पनांची सुरंगी इंद्रधनुष्ये थरथरतात. कल्पनांचे विविध रंग आणि तरंग म्हणजे रोमँटिसिझम, अशी जी अनेकदा व्याख्या केली जाते, ती यामुळेच. तत्पूर्वी अभिजातवादात कल्पनारम्यता नव्हती, असे नाही; पण, त्यांना ती बुद्धिवादाची एक दासी वाटत होती. अभिनवतावाद्यांना कल्पकता हीच, कवीची प्रतिभा म्हणून, प्राणभूत असल्यामुळे, तिच्याशिवाय काव्यनिर्मिती अशक्य वाटते. त्यामुळे अभिनवतावाद्यांना कल्पकतेत परमेश्वराचा अंश दिसतो.[१५] या कल्पनाप्रधानतेमुळे त्यांना वस्तुनिष्ठ सौंदर्याचा साक्षात्कार होण्याऐवजी वस्तूंच्या दूरीभावातच सौंदर्य दृग्गोचर होते. डोंगर दुरून साजरे दिसतात; आणि ते नयनरम्य सौंदर्य डोंगरावर चढूनही हाती गवसत नाही, म्हणून तळमळ, हुरहूर आणि शेवटी निराशा हेही लक्षण रोमँटिक कवीमध्ये पाहावयास मिळते. व्यक्तिस्वातंत्र्य हे तर रोमँटिसिझमचे आद्य लक्षण. त्यामुळे कोणत्याही प्रकारचे बंधन अभिनवतावाद्यांना अभिप्रेत नसते. राजकीय क्षेत्रात ते स्वातंत्र्याचा पुरस्कार करतात, सामाजिक क्षेत्रात ते रूढीविरुद्ध हल्ला चढवितात, आर्थिक दृष्टीने ते समतेची कास धरतात, धार्मिक दृष्टीने जुन्या परंपरांना फेकून

---

१४. "The essential classical element is that quality of order in beauty...It is the addition of strangeness to beauty that constitutes Romantic character in Art."

१५. या संदर्भात ब्लेक म्हणतो, The Primary imagination I hold to be the living power & prime agent of all human perception. कोलरिज Biographia Literaria मध्ये लिहितो, "The Poet...brings the whole soul of man into activity...by that synthetic & magical power. .of imagination."

देऊन बंधुत्वाची गाणी गातात आणि वाङमयीन क्षेत्रात जीर्ण संकेत मोडून नव्या वृत्तांची, नव्या आशयाची व नव्या दृष्टिकोणाची ते प्रतिष्ठापना करतात. म्हणूनच ते रूढीच्या दृष्टीने ध्वंसनप्रिय आहेत; मूर्तिभंजकता हा त्यांचा धर्म ठरला आहे आणि साहसप्रियता हे त्यांचे वैशिष्टय समजले गेले आहे.

★ आंग्लवाङमयातील रोमँटिसिझमची ही, जवळजवळ सर्वच, लक्षणे मराठीत प्रथमतःच केशवसुतात आढळतात. म्हणूनच, त्याना मराठीतील अभिनवतावादाचा प्रणेता म्हणणे सार्थ ठरते. व्यक्तिवादाचे ते पुरस्कर्ते होते व त्यांच्या व्यक्तिवादाला आगरकरांच्या प्रखर बुद्धिनिष्ठ व्यक्तिवादाचे अधिष्टान होते, हे आता सर्वमान्य झाले आहे. त्यांच्या व्यक्तिमाहात्म्याचे रूपांतर आत्यंतिक अहंकारात झाले की काय, असे 'आम्ही कोण म्हणूनी काय पुसता आम्ही असू लाडके–देवाचे' या ओळीतून वाटू लागते. हा अहंभाव व त्यातून निर्माण झालेला आत्माविष्कार हा त्यांच्या कवितेचा प्राण आहे. "स्वभावतः रसमधुर असणाऱ्या कवितेच्या निर्मितीकडे केशवसुत वळले. उत्कट आत्मनिष्ठा केशवसुतांच्या ठिकाणी विपुल प्रमाणात होती."[१६] मानवी भावना त्यांच्या कवितेतून उत्कटतेने ओसंडून वाहतात. आत्मनिष्ठ कवी स्वतःच्या जीवनानुभूतीतूनच काव्यनिर्मिती करतो. 'आई करिता शोक' ही त्यांची कविता

"...नुरले कोणी प्रेम करायाते
अंतरले पाय तुझे हाय हाय माते"

अशा उत्कट भावनांनी काठोकाठ भरली आहे. या उत्कटतेने त्यांचे संपूर्ण काव्य व्यापले आहे. क्षेत्र राजकीय असो, सामाजिक अथवा धार्मिक असो, तेवढयाच उत्कटतेने त्यांचे काव्य फुललेले दिसते. प्रणयातील उत्कटता हा तर रोमँटिक कवींचा खास विशेष. केशवसुतांनी प्रणयाचे विविध रंग

---

१६. 'केशवसुत-काव्य आणि कला,' या पुस्तकातील खांडेकरांची प्रस्तावना.

रेखाटले आहेत. अभिजातवादामध्ये शृंगाराला रसराजाचे स्थान असले तरी, त्यात उपभोगप्रधान शारीर प्रणयाची कल्पना अनुस्यूत असते. केशवसुतांच्या प्रणयाची कल्पना रोमँटिक कवीप्रमाणेच, मानसिक वा बौद्धिक आहे. निसर्गपूजेबाबत वर्डस्वर्थइतका नव्हे, तरी तत्सम, म्हणजे ईश्वराचे निसर्गाशी नाते जोडणारा, आविष्कार मराठीत केशवसुतात प्रथमच आढळतो.

उंच डोंगर ते उंच कडे भारी
पडे घो ! घो ! ज्यांचियावरूनी वारी
भोवताले रान ते दाट आहे
अशा ठायी देव तो स्वयें राही

अशी त्यांची निसर्ग व देव यांच्यातील तादात्म्यतेची भावना आहे. रोमँटिक कवीप्रमाणे त्यांना कृत्रिमतेचा तिरस्कार व नैसर्गिकतेची ओढ असल्यामुळे, एका खेड्याचे ( एका शहराचे नव्हे ) चित्र त्यांनी अगदी साध्यासुध्या भाषेत रंगविले आहे. त्याचबरोबर, या नैसर्गिकतेचे आकर्षण आहे म्हणूनच 'प्रौढत्वी निज शैशवास जपणे बाणा कवीचा असे' असे बालपणगौरवाचे उद्गार वर्डस्वर्थ, कोलरिज किंवा ब्लेकप्रमाणे तेही काढतात. केशवसुतांना सौंदर्यात, अभिनवतेचा, नवलाईचा आणि अद्भुततेचाही प्रत्यय आलेला आहे.

रम्य धुक्याची अद्भुत सृष्टी
त्यात उघडसी अपुली दृष्टी
मग तो भास्वान् तुजवर करतो
तेजाची वृष्टी

असे शेलीप्रमाणे त्यांनाही वाटते. त्या अद्भुततेतूनच विश्वातील गूढतेचे कोडे त्यांना पडते; व ते उलगडताना 'झपूर्झा' किंवा 'हरपले श्रेय' या सारख्या कविता निर्माण होतात. निसर्गाच्या सान्निध्यात त्यांची कविता चिंतनशील असणे हे या प्रवृत्तीला स्वाभाविक ठरते. कोलरिजने प्रतिपादलेली उत्तुंग कल्पकता व तिचे उसळणारे नानाविध द्युतिसंपन्न तरंग केशवसुतांच्य

कवितेत सर्वत्र आढळतात. 'कल्पकता' ही कविता तर या दिव्यशक्तीच्या सामर्थ्यांचाच आविष्कार करावयाला अवतीर्ण झाली आहे. दूरीभावातील सौंदर्यांचा त्यांना झालेला साक्षात्कार 'क्षणात नाहीसे होणारे दिव्यभास' या कवितेत आढळतो आणि

> हा ! हा ! हे जर सर्व भास धरता येतील माते, तर
> पृथ्वीचा सुरलोक की बनवूनी टाकीन मी सत्वर !

अशा सौंदर्यपिपासेतूनच पुढे विश्वचिंतन व त्यातून त्यांची आंतरिक निराशा जन्माला आली की काय, असे वाटू लागते. व्यक्तिस्वातंत्र्यवाद आणि चिंतनशीलता यातून निर्माण झालेला बंधनांचा तिरस्कार; व त्यामुळे ठरीव चाकोरीतून बाहेर पडण्याची रोमँटिक कवींची ईर्ष्या, केशवसुतातही प्रकर्षाने आढळते. राजकीय स्वातंत्र्याचा पुरस्कार 'गावी गेलेल्या मित्राची खोली लागलेली पाहून' यासारख्या कवितेत केला आहे. सामाजिक व धार्मिक रूढीचे मूर्तिभंजन करताना, 'जुने जाऊ द्या मरणा लागूनी । जाळूनी अथवा पुरूनी टाका' अशी तुतारी फुंकली आहे. आर्थिक समतेची समस्या 'मजुरावर उपासमारीची पाळी' या कवितेत मांडली आहे आणि 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' समाजासमोर मांडून बंधुत्वाचे निशाण त्यांनी उभारले आहे. साध्याही विषयातून मोठा आशय व्यक्त करून आणि नवनव्या वृत्तांच्या योजनेने जुने रचनाबंध झुगारून देऊन त्यांनी काव्यक्षेत्रात क्रांती केली आहे.

* एकाच कालखंडातील हे तीन कवी तीन भिन्न संप्रदायांचे पृथगात्मक प्रतिनिधित्व करतात. चंद्रशेखरांचा परंपरावादी संप्रदाय केशवसुतांच्या अभिनवतावादाहून सर्वस्वी भिन्न असला, तरी विनायकाचा पुनरुज्जीवनवाद हा परंपरावाद आणि अभिनवतावाद यांच्या सीमारेषेवर उभा आहे. त्यामुळे दोन्ही संप्रदायातील काही वैशिष्टचे या एका वादात आढळतात. पुनरुज्जीवन वादाच्या या वैशिष्टयामुळे व वादसंप्रदायात परंपरावाद व अभिनवतावाद हे दोनच संप्रदाय मान्य केल्यामुळे, विनायकाला

परंपरावादी म्हणावे की अभिनवतावादाची माळ त्याच्या गळ्यात घालावी, याचे कोडे अनेक मराठी टीकाकारांना पडले आहे. विनायकाच्या कवितेचे सांप्रदायिक स्वरूप सांगताना म्हणूनच त्यांची ओढाताण झालेली दिसते. रा. श्री. जोगांनी 'तथापी तिचे (विनायकाच्या कवितेचे) आजचे स्वरूप साकल्याने पाहिले तर ती जुन्या संप्रदायातील म्हणावी लागेल,"[१७] असे विधान केले आहे; तर म. श्री. पंडितांनी, "आधुनिक कवितेला नवे वळण लावण्यात केशवसुत व टिळक यांच्या बरोबरीने विनायकाचा वाटा आहे, हे विसरून चालणार नाही" असा अभिप्राय दिला आहे.[१८] डॉ. वाळिंबे यांनी तर दोन्ही प्रकारची विधाने केली आहेत. "मध्ययुगीन काळातील गूढरम्य घटनांविषयी अनेक स्वच्छंदवादी कवींना जे विचित्र आकर्षण वाटत असते तसले आकर्षण विनायकांच्या या कवितात दिसून येईल" असे मत मांडून, मराठीतील रोमँटिसिझममध्ये त्यांनी विनायकाचा समावेश केला आहे; तर दुसऱ्या बाजूला, "विनायकाची कविता हा एकप्रकारचा पुनरुज्जीवनवाद Revivalism होता असे कबूल करण्याशिवाय गत्यंतर नाही" असीही निस्संदिग्ध कबूली देऊन टाकली आहे.[१९] विनायकांना आधुनिक अभिनवतावादात गणावे, तर त्यांच्या पुनरुज्जीवनाच्या ओढीचे समर्थन करता येत नाही आणि त्यांना जुन्या वळणाचे परंपरावादी म्हणावे, तर त्यांच्या काव्यातील अभिनवतावादाच्या काही वळणांची संगती लावता येत नाही, अशी या टीकाकारांची कोंडी झाली आहे. परंपरावाद, पुनरुज्जीवनवाद आणि अभिनवतावाद या तिघांचेही अस्तित्व मान्य केल्याशिवाय या पेचाला बिनतोड उत्तर मिळणार नाही. पाश्चिमात्यांनी हे तीन संप्रदाय सिद्ध आणि मान्य केले आहेत. मराठी वाङमयातही ते मान्य केल्याशिवाय विनायकाच्या कवितेचे खरेखुरे आणि वादातीत आकलन होणे अशक्यप्राय आहे.

---

१७. अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ६६

१८. आधुनिक मराठी कविता, पृ. ८

१९. साहित्यातील संप्रदाय—रोमँटिसिझम, पृ. १८५

# ५. आशा-निराशावाद

* प्रास्ताविक
* आशावादाचे स्वरूप
* आशा-निराशावादी कवितांचे संख्याबल
* निराशावादी कवितांचे अधिष्ठान
* आशावादी कवितांची बैठक
* 'महाराष्ट्रलक्ष्मी' आशावादी आहे काय ?
* निष्कर्ष

* कवीचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण जसा असेल, तसे त्याचे आंतरिक विचार काव्यरूप धारण करीत असतात. एखादे वेळी त्याची अनुभूती खिन्नतेची असेल, तर एखादे वेळी ती उदंड उत्साहाचीही असेल. आकाशाला गवसणी घालू पाहणारा कवी एखादे वेळी मांजरालाही भिऊन जाईल. काव्यनिर्मितीच्या क्षणी त्याची जी अवस्था असेल ती कवितेत प्रतिबिंबीत होईल. काही क्षण तो आनंदाचे स्फूर्तिगान गात असेल, काही क्षण रडवेपणात आणि हळवेपणात घालवीत असेल. त्यामुळे एखाद्या प्रामाणिक कवीला संपूर्ण जीवनात आशावादीच ठरविणे किंवा निराशावादीच म्हणणे फारसे संयुक्तिक होत नसते. वास्तविक, एखाद्याच्या माथी या 'वादा'चे लेबल लावणेच चुकीचे होय. तरीही एकूण कवितेचा सामान्य सूर मात्र शोधता येतो. तो त्याच्या जीवनदृष्टीतच आढळतो. काही कवींच्या काव्यात उत्कट आशावाद असण्याचे व काहींमध्ये रडवा निराशावाद आढळण्याचे एकमेव कारण कवीची जीवनदृष्टी हेच होय. विनायकाच्या जीवनदृष्टीसंबंधीही एकवाक्यता आढळत नाही. "विनायक कवींनी इतर गोष्टी केल्या असल्या तरी नवीन पराक्रमाला प्रोत्साहन देणे त्यांच्याकडून

थोडेच झाले. "महाराष्ट्रलक्ष्मी" ही एकच कविता त्या स्वरूपाचीं दिसते. त्यांचा एकंदर दृष्टिकोण नैराश्याचाच आहे" असे विधान रा. श्री. जोगांनी केले आहे.[1] उलट 'शिवसंदेश' या कवितेत

स्वातंत्र्यक्षम होय सर्व जनता जाणेल जेव्ह प्रभू
तेव्हा वेळ नको स्वतंत्र सुभगा व्हाया महाराष्ट्र भू

अशी आशा त्यांनी व्यक्त केली असून 'महाराष्ट्र लक्ष्मी'त तर 'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावी काळ ।. . .रात्र सरे तेव्हा उगवे दिनही पूर्ववाटे ।' असा सिद्धांतच काव्यमय करून सोडला आहे, असे सांगून, 'ते पक्के आशावादी होते' असे मत भ. श्री. पंडितांनी मांडले आहे.[2] या मतामतांच्या गलबल्यामुळे, विनायकाच्या काव्याचे वास्तव आकलन होण्याकरिता, मुळात त्याची जीवनदृष्टी काय होती, हे समजावून घेणे अत्यंत आवश्यक आहे.

* परंतु त्याआधी आशावाद म्हणजे काय ? त्याचे स्वरूप कोणते ? 'काव्यातील आशावाद' म्हणजे नेमके काय ? या प्रश्नांची वीण उकलली जाणे महत्त्वाचे ठरते. आशा–निराशा ह्यांचे धागे भविष्यकालात गुंतलेले असतात. आशा वाटते ती, भविष्य काळाची; निराशा दाटते, तीही पुढील काळाबद्दलच. तत्त्वज्ञानाच्या अथवा अध्यात्माच्या भूमिकेतून प्रवृत्तीवादी आशयाला आशावाद म्हणता येईल. ज्यात प्रवृत्तीवाद बळकट असेल ते आशावादी काव्य. रे. टिळकांच्या 'वनवासी फूल' या काव्यात कवीचे तत्त्वज्ञान प्रवृत्तीवादी म्हणजेच आशावादी आणि फुलाचे निवृत्तीवादी म्हणजेच निराशावादाला जवळचे आहे. जीवनाच्या संदर्भात विजिगिषू वृत्तीचा जीजिगिषू वृत्तीशीं समन्वय साधला म्हणजे निर्माण होणारी लढाऊ प्रवृत्ती हा आशावाद ठरतो; तर जीवनात हतबल होऊन हताश दृष्टीने सुस्कारे सोडणाऱ्या प्रवृत्तीला निराशावादी म्हटले जाते. काव्यात प्रवृत्तीवादाचा किंवा विजिगिषू अथवा जीजिगिषू वृत्तीचा पुरस्कार असेल, तर ते काव्य

---

१. अर्वाचीन मराठी काव्य, पृ. ६७
२. आधुनिक मराठी कविता, पृ. ६०

आशावादी आहे. असे म्हणावयास प्रत्यवाय नाही. कवी अनिल किंवा कुसुमाग्रज हे असेच जीवनाचा रसास्वाद चाखणारे आशावादी कवी आहेत. उलट, संपूर्ण जीवनाकडे निराशेच्या काळवंडलेल्या छायेने पाहण्यात गडकऱ्यांच्या निराशावादाचा उगम आढळतो.

* कवी विनायकाच्या संपूर्ण काव्यात निराशावादाचा सूर एकूण अकरा कवितांत आढळतो. आशावादी सूर एकूण सात कवितात दिसतो. दोन कवितातील सूर आशावादी भासत असला, तरी त्यांचा कल कर्तृत्व-शून्य दैववादाकडे झुकलेला असल्याने अंतरंगातील आशावाद विवाद्य ठरतो. पांच कवितातून वर्तमानकाळाबद्दल खेद आहे; पण, त्यात भविष्याबद्दलचा कोणताही दृष्टिकोण व्यक्त झालेला नाही. म्हणजे केवळ संख्याबल लक्षात घेता विनायकाच्या काव्यात निराशावादी कवितांचे प्रमाण अधिक आहे, असे आढळून येते

* विनायकाच्या निराशावादाचा उगम अनेकरूपी आहे. 'गणेश-पूजन' कवितेतील "नेत्रावाटे खळखळ वाहे दुःखाने पाणी। विघ्नहराते प्रेमे न्हाणू त्याच आसवांनी !" या ओळीतून किंवा 'नैवेद्यास्तव काही नुरले काय करू आता' या ओळीमधून आपल्या कर्तृत्वशक्तीची अगतिकता त्याने व्यक्त केली आहे. कर बसल्याने महाग झालेले वस्त्रच गणेशाला वाहणे आता भाग आहे, असे त्याचे पुढील निवेदन. पारतंत्र्यामुळे निर्माण झालेल्या या महागाईविरुद्ध आपण क्रांती करू किंवा 'सार वस्तूंचा लोट सारखा परदेशी जाता' आपण बहिष्कार टाकू, अशी गर्जना तो करीत नाही. लोक-मनाला व लोकमताला तो चेतावीत नाही. आपण अगतिक आहोत, हीच त्याची धारणा आहे. येथे त्याची जशी कर्मवादी अगतिकता दृष्टीस पडते, तशीच दैववादी अगतिकता 'भोगमुक्ति'मध्ये 'भोग कुणा सुटले जगी या' या ओळीतून प्रत्ययास येते. 'सत्य दिव्य आणि शांत' या कवितेत जग, जगातील कीर्ती, जगातील सौंदर्य हे सारे मिथ्या आहे, असे त्याचे प्रतिपादन. 'स्वप्न' कवितेतील 'संसृती-जगाची स्थिती-स्वप्नरूप ती-मानूनी सत्य-चाललो पहा आहोत-मानिनी' ; हा सरळ सरळ पारंपरिक जगन्मिथ्या-

वाद आहे. त्यामुळे भौतिक विश्वाविषयी 'वास्तविक सत्य' ही विज्ञानप्रणित निष्ठा अर्थातच येथे अभिप्रेत नाही. मायावादातील दुःखाचा पाठपुरावा व म्हणून जगाकडे पाहण्याची निवृत्तिपर दृष्टी यामुळे या कवितांचे अधिष्ठान निराशावादाचेच आहे. तत्कालीन जनतेत देशभक्तीच्या प्रखर प्रवृत्ती-ऐवजी विनायकाला स्वार्थ, मत्सर या दुर्गुणांचेच प्राबल्य अधिक आढळते; व त्यामुळे त्याचा निराशावाद उफाळून येतो. त्याला 'जगी चहुकडे स्वार्थ, नीचता, मूर्खपणा, अभिमान' 'वनवासी फुला'प्रमाणेच आढळला आहे. 'कल्याण काय नेणती। नित्य भांडती, आपसात ती। परांवश झाली–स्वत्वाला विसरली!' अशी स्थिती असल्यामुळे 'गेले दिन यावे कसे' ही निराशा त्याच्या मनाला पोखरते आहे. 'हतभागिनी'त 'गाय जी गाळी-चेपत ती चालली' या ओळीतून किंवा 'घडगत मज न दिसे देशाची। झुंजावे जे देशासाठी। तेचि परांचे झाले साथी' या ओळीतून विनायक महाष्ट्राच्या भविष्य काळाबद्दल दैवदुर्विलासामुळे सर्वस्वी निराश झाल्याचे दृश्य दिसून यते. विनायकाचा निराशावाद जसा देशबांधवांच्या दुर्गुणांच्या जाणिवेतून निर्माण झाला आहे, तसाच तो सद्‌गुणांच्या अभावाच्या जणिवेतूनही निर्माण होताना दिसतो. 'यापुढे' कवितेत "कोठचा शिवाजी राजा निजधर्माचा अभिमानी–यापुढे।" या ओळीतून सांप्रत स्थितीत स्वधर्माच्या ताठर अभिमानाचा लोप झाला आहे, असे त्याला वाटते; व म्हणून, महाराष्ट्राचा अभ्युदय होण्याची अशक्यता त्याला जाणवते, 'गाण्याचे गाणे' या कवितेतील "कृत्रिम हास्य नको जगताचे. . .सेवावी राने" असल्या ओळीतून किंवा 'सुवास' मधील 'मात्सर्याचा भरला वारा. . .काय अशा जनतेत राहावे ?, असल्या ओळीतून संसारविमुख निवृत्तिवादाचा पाठपुरावा केला आहे, हे उघड आहे. 'विरही' कवितेतील प्रणयनैराश्य हे शारीरिक दौर्बल्यामुळे मानसिक इच्छा कशा अतृप्त राहतात, या खिन्न विचारातून निर्माण झाले असून, 'परि दुबळी मानवकुडी, व्यर्थ बापडी, तियेची उडी, बेत केलेले, सर्व कुणा साधले !' असा सुस्कारा त्याने शेवटी सोडला आहे. म्हणजे गणेशपूजन, भोगमुक्ती, सत्य–दिव्य–शांत, स्वप्न, हतभागिनी, दैवदुर्विलास, यापुढे, गाण्याचे गाणे, सुवास आणि विरही या कवितांतून भिन्नभिन्न रूपाने निराशावाद व्यक्त झालेला दिसून येतो.

प्रो. छत्र्यांचा केसरी सर्कशीच्या पिंजऱ्यात अडकला आहे. मुलीबाळीं-नीही त्याचा कान उपटावा अशी त्याची असहाय्य स्थिती आहे. पिंजऱ्यातील सिंहाची सुटका होणे कदापि शक्य नसते, हे कोणीही जाणतो. महाराष्ट्ररूपी केसरी कठड्यात अडकला असल्यामुळे तो पूर्वकालांत कितीही पराक्रमी असला, तरी त्याची भविष्यकालात सुटका होणे अशक्य आहे, हेच या पिंजऱ्यातील केसरीतून सूचित होत नाही काय ? पिंजरा फोडून बाहेर येण्याचा त्याला कवी आदेश देत नाही, तर 'ही इष्ट नव्हे परवशतेत बहाली, नाचरंग दीप्त महाली,' एवढेच तो सांगतो. 'दसऱ्याचे सोने' या मथळ्याच्या दोन्ही कवितांतून वैभवाची चंचलता आणि प्रासंगिक पदातील दहाव्या पदात वर्तमानातील केवळ हलाखीचे वर्णन आले आहे. या कवितासमुहात आपली दीन अवस्था, हतभागिनीत निवेदन केल्याप्रमाणे, गाळात चेपत चाललेल्या गायीसारखी वाढत जाणार की भविष्यकालाला यापुढे उजाळा-मिळणार, या विषयी निश्चित दृष्टी सापडत नाही.

★ 'इतिहासाचे मर्म' या कवितेतील 'शिवचरिताचे चिंतन आशेचे रूजविते मनी बीज । केल्या उद्योगाचे, कळवी केव्हातरी घडे चीज ।' या ओळीतून प्रयत्नवादी आशावादाचा सूर सापडतो. तसेच, 'दोन मार्ग' या कवितेत प्रयत्नशील कर्मवादाचा आढळ होतो. 'शिवसंदेशात मात्र 'मी केले, करणार काय, अवघी सत्ता प्रभूच्या करी. . .स्वातंत्र्यक्षम होय सर्व जनता जाणेल जेव्हा प्रभू । तेव्हा वेळ नको स्वतंत्र सुभगा व्हाया महाराष्ट्र भू ।' यामधून दैववादी आशावादाचा पुरस्कार केलेला आहे. 'देशभक्ताचे सामर्थ्य' या कवितेत देशाभिमानासारख्या निष्ठेने राष्ट्र जिवंत राहील, असा सद्गुण-श्रद्धाजन्य आशावाद व्यक्त झाला आहे; तर 'आयुष्य विषाचा पेला' या कवितेत, आशावाद हा एक नुसता मनाचा समज आहे, अशी कविभावना स्पष्ट झाली आहे. म्हणजे या कवितेतून निर्मळ आशावादाचे मंडण होण्यापेक्षा अप्रत्यक्षपणे खंडणच झाल्यासारखे वाटते. कवितेचे शीर्षकही निराशेचेच प्रतिबिम्ब मनावर उमटविते. 'मातृभक्तीचे लेणे' या कवितेतील 'बंधमात्र त्याचा तुटतो जो षड्रिपु संहारी । हा ज्ञानविचार वागविता बंदिगृहात होईल तुला निभ्रांत । सुख समाधान चिरकाळ ।' या ओळीतून

इंद्रियानिग्रहाच्या भूमिकेवरून आशावादाचे समर्थन केले आहे. प्रासंगिक स्फूट पदातील 'पुरे करा बहार, उठोनी व्हा तयार' या किंवा 'स्वातंत्र्यास्तव कोण प्राणी सिद्ध न मरण्याला" या ओळीतून विजिगिषू व लढाऊ आशावाद प्रकट होतो. 'जीवित महिमा' ही लाँगफेलोच्या 'दी साम ऑफ लाईफ'चे भाषांतर असल्याने ती विनायकाची जीवनदृष्टी होय, असे मानता येत नाही.

'महाराष्ट्र लक्ष्मी' या कवितेतील

'पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भाविकाळ
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाळ
कासया वहावी चिंता मनी मग जहाल
रात्र सरे तेव्हा उगवे दिनही पूर्व वाटे ।'

या ओळीतून दुर्दम्य आशावादाची पेरणी भाष्यकाराच्या प्रतिभेने झाली आहे, असे अनेकांचे मत आहे. वास्तविक, प्रभावी भूतकाळ लाभलेल्या पुरुषानी भविष्याची फाजील काळजी करण्याचे कारण नाही, त्यांचा भविष्यकाळ उज्वलच असणार, या भ्रामक दैववादातून निर्माण झालेला आशावादही भ्रामक व सद्यकालीन निराशेतून उद्‌भलेला आहे. आजचा मराठी माणूस अजूनही शिवाजीवर व तत्कालीन इतिहासावरच जगतो आहे. इतिहासाकडे पाहण्याची ही दृष्टी, समाजशास्त्र दृष्टया, भविष्य काळाच्या उन्नतावस्थेला नेहमीच मारक ठरलेली आहे. आय्.ए.एस्.सारख्या परीक्षा, सरकारी नोकरीतील स्थान, व्यापार उदीम किंवा वाङमयीन क्षेत्रातदेखील मराठी माणूस आज मागे असण्याचे कारण ही भ्रामक आणि अंध इतिहासनिष्ठाच होय. पंजाब्यांचे आंतरप्रांतीय दळणवळणातील (ट्रक व मोटर सर्व्हिसेस) स्थान, मद्रासी लोकांचे सरकारी नोकरीतील प्राबल्य, निर्वासित म्हणून येऊनही प्रांतोप्रांतीचा व्यापार काबीज करण्याचे सिंध्यांचे कौशल्य, गुजराथचे वित्तवैभव किंवा बंगाली लोकांचे वाङमयीन क्षेत्रातले पुरोगामित्व पाहिले, म्हणजे या साऱ्यांच्या मानाने महाराष्ट्र किती कमकुवत आहे, याची कल्पना येते. असे होण्याचे कारण, अजून तो पराक्रमी भूतकाळात व तज्जन्य भ्रामक भविष्यकाळात वावरतो, हेच होय. रशियाने

आपले भविष्य घडविले आहे, ते पूर्व दिव्याधर नव्हे; तर आजच्या कर्तृत्वावर ! समाजाचे भवितव्य धोक्यात आणणाऱ्या या पूर्ववैभवाची उज्ज्वल भविष्याशी सांगड घालणाऱ्या युक्तिवादाला खरा आशावाद कसा मानता येईल ? दुसरे, मानसशास्त्रीय दृष्टीने विचार केला, तर भूतकाळच्या थोरपणाचा भविष्याच्या रम्यत्वाशी संगती साधण्याचा प्रयत्न हा, वर्तमान काळातील हीन अवस्था लक्षात घेतली जाऊ नये, कारण, तीमधून भविष्यकालीन निराशेचाच उद्‌भव होऊ शकतो, या निराशाजन्य विचार-प्रणालीतून निर्माण झालेला आहे, असे दिसते. आपली मदार आता कर्तृत्वावर उरलेली नाही, तर केवळ पूर्ववैभवाच्या पोकळ आधारावर आपण उभे आहोत, ही कर्तृत्वहीनता व तज्जन्य निराशा, हीच या भ्रामक दैववादाचे अधिष्ठान नव्हे काय ? प्राप्त परिस्थितीला खंबीरपणे, निधडचा छातीने तोंड देण्याऐवजी, आपल्याला हवे ते पूर्वजांच्या कर्तृत्वामुळे आपोआप मिळणार आहे; आपल्याला काळजी करण्याचे काही कारण नाही, असा कर्तृत्वहीनतेचा युक्तिवाद म्हणजे कणखर कर्तृत्वाकडे पाठ फिरविणाऱ्या पलायनवादाचाच प्रकार होय. याच संदर्भात कुसुमाग्रज कसे ऊर्जस्वल आशावादी वाटतात पाहा ! कुसुमाग्रजांच्या 'रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल' ह्या ओळी म्हणजे जणू विनायकाच्या 'रात्र सरे तेव्हा उगवे दिन ही पूर्व वाटे' यांचा भावानुवादच. पण, त्या दोघांचीही बैठक अगदी दोन ध्रुवांमधील अंतराइतकी. आम्ही मृत्युंजय आहोत, याची कुसुमाग्रजांना क्षणाक्षणाला प्रचिती येत आहे. आणि मग ते गातात,

कशास आई, भिजविसी डोळे उजळ तुझे भाल
रात्रीच्या गर्भात उद्याचा असे उष:काल
सरणावरती आज आमुची पेटताच प्रेते
उठतील त्या ज्वालातून भावी क्रांतीचे नेते.

पूर्वजांच्या पुण्याईने नव्हे, तर आजच्या आमच्या आत्मार्पणाच्या तयारींतून उद्याचे भविष्य आम्ही घडवीत आहोत, याची जाणीव या ओळीतील शब्दाशब्दातून ओसंडते आहे. उद्याचे नेते निर्माण करण्यासाठी आज

आम्हाला सरणावर चढावे लागणार आहे, हा ध्येयनिष्ठ, त्यागाधिष्ठित, कणखर कर्तृत्ववाद कोणीकडे आणि पारतंत्र्याची काळजी करण्याचे कारण नाही, आमच्या वडिलांच्या पुण्याईवरच आम्हाला जिवंत राहण्याचा हक्क प्राप्त झाला आहे, अशी विनायकाची विचारसरणी कोणीकडे! आपल्या मनातील आजची काळजी लपविण्याचा विनायकाचा पद्धतशीर प्रयत्न 'कासया वहावी चिंता मनी मग जहाल।' या ओळीतून स्पष्ट होतो. किंबहुना, आजची ही निराशा लपविण्याकरिताच कालच्या कर्तृत्वाचा आधार त्याने अगतिकपणे घेतला आहे. याचाच अर्थ हा, की आजची निराशा, दुःख, विकलता कालच्या ऐतिहासिक स्मरणाचे अधिष्ठान झाली आहे. म्हणूनच या ओळीचे खरेखुरे अंतर्यामी रूप, आजची निराशा लपविण्याचा विफल प्रयत्न करू पाहणारा निराशावाद असे आहे, असे म्हणावे लागते. पाणी ज्याप्रमाणे द्रवरूप असते, पण त्यातील मूलघटक वायुरूप राहतात, त्याचप्रमाणे वरवर दिसणाऱ्या भूतकालाधिष्ठित आशावादाचे मूलघटक वर्तमानकालीन निराशावादात अनुस्यूत आहेत.

हाच भूतकालीन भ्रामक दैववाद 'काळाची प्रतिकूलता' या कवितेत दिसून येतो. म्हणजे आशावादी कवितांमध्ये इतिहासाचे मर्म, शिवसंदेश, दोन मार्ग, देशभक्ताचे सामर्थ्य, मातृभूमीचे लेणे, प्रासंगिक स्फूट पद्ये या सहा कवितांमधून निर्मळ आशावाद व आयुष्य विषाचा पेला, काळाची प्रतिकूलता व महाराष्ट्रलक्ष्मी या तीन कवितातून निराशा दडविण्याच्या प्रयत्नातून उत्पन्न झालेला आशावाद आढळून येतो.

* कवितांचा संख्याबलाने विचार करता विनायकाची निराशावादी कविता अधिक असली, तरी कवी विनायक संपूर्णतया निराशावादीच होता, असे म्हणता येणार नाही. कारण, "कवीचा दृष्टिकोण ठरविताना त्यांचे संख्याबल लक्षात घेण्याऐवजी त्यांचा रसिक मनावरील प्रभाव व परिणामकारकत्व लक्षात घ्यायला पाहिजे"[३] या दृष्टीने विनायकाचा

---

३. हे विधान डॉ. वा. भा. पाठकांनी 'मराठी काव्याचे अंतःप्रवाह' या पुस्तकात केशवसुतांच्या बाबतीत केले आहे.

परिणाम होतो तो आशा व निराशा या दुहेरी स्वरूपाचा, विनायकाचा निराशावाद बायरनप्रमाणे नाही. बायरनला जशी लहर येईल तसे सूर त्याच्या काव्यातून उमटत. कारण, त्याच्या काव्यात जीवनानुभूती व उत्कट आत्माविष्कार होता. कवी विनायकात 'आत्माविष्कार पर्यायाने' असल्यामुळे तो कमी उत्कट आहे; व त्यामुळेच, विनायकाचा निराशावाद बायरनप्रमाणे स्वभावलहरीतून निर्माण झालेला नाही. त्याची मनोवृत्तीही केशवसुतासारखी चिरचिरी, एकलकोंडेपणाची व कुरकुरी नव्हती. तो आनंदी असे. म्हणून केशवसुतांची निराशा त्याच्या किरकिऱ्या मनोवृत्तीतून जशी निर्माण झाली,[४] तशी विनायकाची झाली नव्हती. विनायकाच्या निराशेचे उगमस्थान गोविंदाग्रजाप्रमाणे प्रणयभंगात नव्हते. कारण, त्यांची निराशा व्यक्तिभावनेशी संबंधीत नसून, देशाच्या पारतंत्र्याशी निगडित आहे.

प्रि-रोमँटिक कवी भूतकाळात रममाण झाल्यामुळे वर्तमान कालापासून ते दूर राहत; व या एस्केपिझम मुळे, म्हणजे पलायन-वादामुळे, निराशावादी बनत, असे त्या संप्रदायाचे एक लक्षण सांगितले जाते. पुनरुज्जीवनवादी विनायकाला नेमके हेच लागू आहे. त्याची नजर जेव्हा भूतकाळात वावरते व भूतकाळाची सांगड तो भविष्याशी घालू जातो, तेव्हा त्याचा आशावाद स्वाभाविकपणे फुलून येतो. उलट, भविष्यकाळाची संगती जेव्हा तो वर्तमानाशी लावतो, तेव्हा त्याचे मन खिन्नतेने व्यापले जाते; व त्यातून निराशावाद जन्माला येतो. म्हणूनच, विनायकाची कविता 'साकल्याने पाहता निराशावादी' आहे असे रा. श्री. जोगांचे; 'व ते पक्के आशावादी आहेत' असे भ. श्री. पंडिताचे, अशी दोन्ही विधाने आपापल्या परीने सत्य असूनही, अपूर्ण वाटतात. त्याचा आशावाद भूतकालजन्य असून, निराशावाद मात्र वर्तमानजन्य आहे, हेच त्याच्याविषयीच्या आशा–निराशावादी दृष्टिकोणातील महत्त्वाचे प्रमेय होय.

---

४. 'पाच चिंतनिका' या पुस्तकातील हे विधान भ. श्री. पंडितांचे आहे.

# ६.  कथाकाव्ये व दृष्टिकोण

- प्रास्ताविक
- विनायकाची भूमिका
- कथाकाव्याच्या प्रवृत्ति
- कथाविषय
- रचनाप्रकार व भाषा
- दृष्टिकोण
- पुरुष व प्रीती
- अनुभूतिविचार
- निष्कर्ष

दि:
नोंद दि:

* कथाकाव्ये हा विनायकाचा त्याच्या इतर कवितांहून भिन्न असलेला, एक मनोज्ञ व स्वतंत्र विशेष होय. ही कथाकाव्ये स्वाभाविकतःच सुरस आहेत. विनायकाची सहजप्रवृत्ती उत्कट आत्माविष्काराकडे असण्यापेक्षा, वस्तुनिष्ठ चित्र काढण्याकडेच त्याचा अधिक ओढा असल्याचे हे एक गमक आहे. विनायकाच्या वेगळ्या प्रतिभेचा पैलू तर इथे आढळतोच; पण त्याचबरोबर, विनायकाच्या जीवनविषयक दृष्टीचेही दर्शन इथे घडते. त्याच्या कथाकाव्याच्या परिशीलनाने त्याच्या जीवनदृष्टीचा अभ्यास व एका कुशल कथाकाराचा नवा परिचय सहजपणे घडतो.[1]

---

१. "१९०५ मध्ये विनायकाने प्रौढ प्रासादिक शैलीने 'ध्यास तो मास' 'गणिकोद्धार' ही ऐतिहासिक काव्ये लिहिली आहेत. परंतु ती इतकी मोठी नाहीत की त्यांची गणना मराठी खंडकाव्यात होईल."–अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये–ह. कि. तोडमल–पृ. २९२. पण त्याचबरोबर आधी पृ. ४९ वर ऐतिहासिक काव्यापैकी काही काव्ये राष्ट्रीय उद्देशाने लिहिली

★ कथाकाव्ये रचण्यामागे विनायकाची निश्चित अशी भूमिका होती. रा. रा. गोविंद पांडुरंग देवधर यांना लिहिलेल्या पत्रात तो म्हणतो, "हल्लीच्या लोकस्थितीस काही विशेष बोध काव्यद्वारा व्हावयास पाहिजे, असे मी समजतो. तिकडे माझ्या बहुतेक कविबंधूंचे अलक्ष दिसते. ती उणीव दूर व्हावी म्हणून या उपाख्यानांचा जन्म आहे. काही वैराग्यपर व काही वीरश्रीपर आहेत. शृंगार हा दोहोतही अंगभूत आहेत. तरी अशा आख्यानाला उपयोगी होतील, अशा काही कथा आपणास माहीत असल्यास मला कृपेने कळवा." ही बोधवादी भूमिका त्यांच्या निवेदनातूनच नव्हे, तर काव्यातूनही स्पष्ट झाली आहे. एवढेच की, ही कथाकाव्ये त्याने केवळ स्त्री-वर्गाकरितां सीमित केली आहेत. 'अहल्या' या कथाकाव्यातून आपली ही भूमिका स्पष्ट करताना, तो लिहितो, "आपल्या देशात जी भूषणभूत स्त्रीरत्ने निर्माण झाली त्या स्त्री रत्नांचे गुणवर्णन गाण्यात रचण्याचा प्रयत्न कवीने केलेला आहे. अशी बरीच गाणी कवीने तयार केलेली आहेत. हा प्रयत्न वाचकवर्गास मानवल्यास कवी आपला उद्योग पुढे चालविण्यास आश्वासन देत आहे."

★ विनायकाच्या कथाकाव्यातील कोणतेहि कथानक हे खास विनायकाचे असे नाही. 'ध्यास तो भास'ला बायरनच्या आल्पस् द रेनिगेडचा, 'गणिकोद्धार'ला वा. गो. आपटयांच्या अशोक चरित्राचा, 'वीरमती'ला रूपमतीची राजकन्या व वीरबाला या गुजराथी नाटकांचा, आणि 'मोहानंतर' ला पांडवप्रतापाच्या ५९ व्या अध्यायाचा आधार आहे.

---

आहेत. (उदा. सावरकरांची व विनायकांची खंडकाव्ये) असेही विधान आढळते. आणखी असे की, खंडकाव्याच्या कालानुक्रमे केलेल्या मांडणीत 'ध्यास तो भास' व 'मोहानंतर' या दोन कथाकाव्यांचा समावेश करून इतर कथाकाव्यांना वगळले आहे.

तोडमलांची निश्चित भूमिका कळावयास मार्ग नाही. पण एवढे खरे की, विनायकाच्या कथाकाव्याचा त्यांच्या प्रबंधात अभ्यास नसल्यामुळे या ग्रंथात तसा अभ्यास पुढे मांडणे, हे अपरिहार्य झाले आहे.

संयोगिता, पद्मिनी, अहल्या इ. कथा ऐतिहासिक आहेत. म्हणजे विनायकाची कथा नवजात नाही; स्वतःच्या प्रतिभेतून निर्माण झालेले असे, त्याचे कोणतेच कथानक नाही. शिवाय, कथा निवडण्यासाठी इतिहासाचेही त्याला भरपूर ज्ञान होते, असे नाही, हेही या ठिकाणी लक्षात घ्यायला हवे.[२] अशा कथा माहिती असल्यास त्या कळविण्याची विनंती पत्राद्वारे त्याने देवधरांना केली आहे. "परंतु कथांच्या निरनिराळ्या सूत्रांची कौशल्याने गुंफण करून त्यांना मनोवेधक रंग देण्याचे अजब कसब मात्र खास विनायकांचे आहे."[३]

'घ्यास तो भास' संबंधी लिहिताना "या काव्याचे वातावरण ऐतिहासिक असले तरी त्याचे कथानक काल्पनिक–कविनिर्मित अधिक आहे; त्यांना प्रत्यक्ष इतिहासाचा फार थोडा आधार आहे." असे ह. कि. तोडमलांचे विधान आहे. ह्या कवितेला बायरनचा आधार असल्याने त्याचे ऐतिहासिक कथानक अस्सल भारतीय कसे असेल ? ही काव्यनिर्मिती मुळात बायरनची आहे.

"कथा व काव्यनिर्मितीचे स्वातंत्र्य हा अर्वाचीन मराठीत खंडकाव्ये रचणाऱ्या कवींचा एक महत्त्वाचा विशेष होय."[४] हा विशेष विनायकात सापडत नाही. हाही त्याच्या पुनरुज्जीवनवादाच पुरावाच म्हणता येईल. आज प्रवृत्तिपरतेला प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. "ही प्रवृत्तिपरतेची विचारसरणी सर्वस्वी नवीन आहे. इंग्रजांशी झालेल्या सहवासातून आणि इंग्रजी वाङ्मयाच्या अध्ययनातून आपण ही नवीन दृष्टी प्राप्त करून घेतली आहे. . . .मृत्यूनंतर मिळणाऱ्या पारलौकिक सुखाचे आमिष दाखविणारा

---

२. 'विनायकाचे इतिहासवाचन फारच अल्प होते असे दिसते'– अनंततनय–विनायकाची कविता, पृ. ३१

३. विनायकाची कविता, पृ. ४७

४. हे व यापुढील टीप नसलेली या प्रकरणातील अवतरणे 'अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये' या ग्रंथातील आहेत, असे समजावे.

पण ऐहिक जीवनातील सुखाकडे पाठ फिरविणारा, जुना धर्म आजच्या कवींना नको आहे." विनायकाच्या कवितेत या आधुनिकतेला विरोध आढळतो. 'गणिकोद्धा'रात "विसरलीस गणिके। शाश्वत तू भुलूनी अशाश्वताला. . . .गेले जावो, उरले थोडे आयु सार्थकी लाव। स्मर करुणेश्वर, तोच स्वपदी देईल तुला ठाव" अशी निवृत्तिवादाची महती आहे. आणि स्वर्गाचे व मोक्षाचे आमिष तर, या व इतर काव्यातूनही जागोजाग आहे. त्याला 'स्वर्ग काय तो सत्य, दिव्य व शांत' असल्याचा भास होतो. 'स्वर्गी सर्व जन स्वतंत्र; न कुठे कारागृहे, शृंखला। स्वर्गी थार न, बांधवा तुडविती सत्तामदे त्या खला।' असे स्वर्गाचे महात्म्य 'शिवसंदेश' मध्ये वर्णिले आहे. आधुनिक कालखंडातील स्त्री–स्वातंत्र्याचा नवा मनू त्याला मान्य नाही. कौमार्यावस्थेत पितृसेवा आणि विवाहोत्तर पतिसेवा, हेच महिलाचे एकमेव जीवितकार्य होय, अशी त्याची समजूत आहे.[५]

प्रेमगौरव ही खंडकाव्याची विशेष प्रवृत्ती विनायकाच्याही कथाकाव्यात दिसते. पण त्याची प्रेमपरता, केशवसुताप्रमाणे, मानसिक वळण घेत नाही; परंपरेनुसार शारीरसुखातच ती गुरफटली आहे. मात्र ज्यास 'हिस्टॉरिकल रोमान्सेस' म्हणतात, तो प्रकार त्याच्या काव्यात आढळतो. लढाया, वेषांतरे, विषप्रयोग इ. वर्णने त्यात विपुलतेने आहेत. कथानायकाचे अंतरंग अकृत्रिम वाटावे म्हणून प्रथमपुरुषी शैलीत वस्तुनिष्ठ कथाकाव्य लिहिण्याची आधुनिक प्रथा 'मोहानंतर' या कथाकाव्यात दिसून येते. पण तरीही, कवीची दृष्टी विशिष्ट बोधवादी असल्यामुळे, त्या प्रथमपुरुषी निवेदनामागेही कवीच वावरतो आहे, याची वाचकांना स्पष्ट जाणीव होते. आणखी एक प्रवृत्ती अशी की, ज्या ऐतिहासिक घटना त्याला शब्दांकित करावयाच्या आहेत, त्या कोणत्या भौगोलिक स्थळी घडल्या, तेथला निसर्ग कसा आहे, तेथील बोलभाषेचे स्वरूप कोणते इ. शोध करण्याचे वा प्रत्यक्ष त्या स्थळांचे दर्शन घेण्याचे परिश्रम त्याने कधीच घेतले नाहीत. त्यामुळे वास्तव वर्णनातील सजीवता निश्चितच कमी झाली आहे.

---

५. कृष्णाकुमारी' याचे चांगले उदाहरण आहे.

या दृष्टीने बायरनकडे पाहावे. बायरनने आयुष्यभर प्रवास केला; व जे अनुभवले तेच शब्दसाकार केले. "एक तर, इतिहासाचा, ऐतिहासिक साधनांचा सूक्ष्म अभ्यास करून तत्कालीन जीवनाचे यथार्थ चित्रण करण्याची कुवत अपवादात्मक कवींमध्येच असते. दुसरे म्हणजे, निदान ऐतिहासिक घटना जेथे घडल्या आहेत, तेथे जाऊन ती स्थळे पाहून काव्यात यथार्थ पार्श्वभूमी निर्माण करण्याचे श्रम या कवींनी घेतले आहेत, असे त्यांच्या काव्यावरून म्हणता येत नाही. . .राष्ट्रीय आणि कविकालीन राजकीय कलाकृतीतसुद्धा वास्तवापेक्षा कल्पनारम्य वातावरणच अधिक असते, या कलाकृतीतील व्यक्तीचे जीवन सर्वसामान्य माणसांपेक्षा वेगळे असते, अलौकिक असते." त्यातही विनायकाची भूमिका बोधवादाची असल्याने त्याने रंगविलेल्या कथानायिका वास्तव असण्यापेक्षा आदर्शच आहेत. पण त्यातही रेखीवपणापेक्षा ढोबळपणा, सैलपणाच अधिक आहे. याचे कारण व्यक्तिरेखनापेक्षा कथानिवेदनावरच त्याचा भर अधिक आहे. ठरीव साच्यातून सारख्याच तोंडावळ्याच्या मूर्ती बाहेर पडाव्यात तसे त्याच्या नायिकांबाबत झाले आहे. सर्वच नायिका 'सौंदर्याच्या खनी' आहेत, सर्वच चतुर आहेत, बहुतेकजणी तरूण व पराक्रमी आहेत आणि सर्वच सद्‌गुणांच्या पुतळ्या आहेत. सामान्य भावना कोणाच्याच वाट्याला आलेल्या नाहीत. वास्तव निसर्गवर्णन ही आधुनिक कथाकाव्याची आणखी एक प्रवृत्ती. संस्कृत वाङमयात विविध व विपुल निसर्गवर्णने आहेत. सूर्योदय, सूर्यास्त, ऋतूवर्णन, नदी, पर्वत, वनविहार, जलक्रीडा इ. ची वर्णने विस्तृत असावी, अशी धारणाच होती. म्हणूनच, त्यात सांकेतिकता व कृत्रिमता निर्माण झाली होती. एकोणिसाव्या शतकातील निसर्गवर्णनाचे वैशिष्ट्य सांगताना प्रा. कुसुमावती देशपांडे म्हणतात, "शुक, सारिका, हंस, मयूर, हे जसे एके ठिकाणी एका काळी विहार करीत, त्याप्रमाणेच शेवंती, मोगरा, जाईजुई, चमेली एकाच काळी लेखकाच्या सोयीप्रमाणे फुलत." आजची निसर्गवर्णनाची वास्तव प्रवृत्ती वर्डस्वर्थपासून इकडे आली आहे. अर्थात् वर्डस्वर्थ, कोलरिज, शेली, कॉटस्, बायरन या तडाग कवींचा जरी मराठीवर परिणाम पाहायला मिळतो, तरी व्यक्तिपरत्वे निसर्गाकडे पाहण्याचा मराठी कवींचा दृष्टिकोण मात्र वेगळा आहे. निसर्गापेक्षाही मानव

अमर्याद असल्याचे कुसुमाग्रजांना जाणवते, तर बालकवी निसर्गाला भक्तिभावाने पूजतांना दिसतात. केशवसुतांना सौंदर्यात अलौकिकत्वाचा साक्षात्कार होतो, तर संसारातील दुःखापासून दूर राहण्याचे साधन म्हणून निसर्गाकडे धाव घेण्याची विनायकाची प्रवृत्ती आहे.

मात्सर्याचा भरला वारा
अहंपणाचा भरला पसारा . . .
काय अशा जनतेत राहावे
काय पहावे काय चहावे
बरे राहणे निर्जन रानी
ओढयासंगे गावे गाणी

हे त्याचे हृद्गत आहे. पण, प्रत्यक्ष निसर्गवर्णनात मात्र, वर्डस्वर्थ किंवा बालकवी यांच्यासारखा आत्माविष्कार न आढळता, वस्तुनिष्ठताच दिसते.

निर्झर झरझर उड्या मारिती, करिती क्रीडा स्वैरगती.
इष्टाशेने खग गगनी, मृग विपीनी, उडती बागडती. (तारा)

पण, निसर्गाचा मुक्त वारा प्याल्याने चैतन्य व वीरता स्वाभाविकतःच उफाळून येतात, असेही भाष्य ते करून जातात. उदा.,

उदात्त सृष्टि ग्रंथोक्त,
स्वावलंबनाचे पाठ;
शिकवी कन्येला तात,
काय नवल मग वीरश्रीचे तिच्यात संचरले पाणी ?

* आधुनिक खंडकाव्याचे कालखंड पाडतांना १८६९ ते १९०५ पर्यंतच्या काळात ऐतिहासिक व्यक्ती 'क्वचित् देशाभिमानी व धर्माभिमानीही दाखविल्या गेल्या असल्या तरी त्या काव्यातून प्रचलित जीवनविषयक

सूचक उद्गार कवींनी काढले आहेत, असे सहसा आढळत नसल्याने' या कालखंडाला तोडमलांनी 'पूर्वजस्मृतिकाल' म्हणून संबोधिले आहे. उलट, १९०४–०५ नंतरच्या काळातील 'ऐतिहासिक व इतर काव्यात प्रचलित राजकीय, धार्मिक, सामाजिक घडामोडींचे पडसाद उमटले असल्याने, १९०५ ते १९२० च्या कालखंडाला त्यांनी 'राष्ट्रीय जागृतीचा काल' असे म्हटले आहे. "विनायकाची थोर ऐतिहासिक स्त्रियांच्या जीवनावरील गीतात्मक लघुचरित्रमय काव्ये व 'मोहानंतर', 'ध्यास तो भास' ही 'लघुकाव्ये' राष्ट्रीय जागृतीच्या कालामध्ये त्यांनी समाविष्ट केली आहेत.[६] पण, असे असले, तरी विनायकाच्या या कथाकाव्यात तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिम्ब मुळीच पडलेले नाही, असे म्हटल्यास अयथार्थ होणार नाही. टिळकांनी सुरू केलेल्या शिवजयंती व सार्वजनिक गणेशोत्सव या त्याच्या आवडत्या उत्सवांचा नामोल्लेख इतर कवितात असला, तरी कथाकाव्यात कोणत्याही निमित्ताने कधीही आलेला नाही. मात्र पूर्वजांच्या पराक्रमाचा अभिमान व पारतंत्र्याविषयी चीड या दोन मनोवृत्तींचे पोषण या काव्याद्वारे झाले आहे. इतकेच नव्हे, तर राजनिष्ठा, पतिनिष्ठा, पितृनिष्ठा इ. निष्ठांचा गौरवही त्यात आहे. 'मोहानंतर' या काव्यात तर निवृत्तीलाच प्राधान्य दिले आहे. विनायकाच्या कथाकाव्याच्या विषयांबाबत आणखी एक वैशिष्टच म्हणजे, त्याने पुरुषांवर कथाकाव्ये लिहिलेलीच नाहीत. याबाबतीत डॉ. वाळिंबे यांनी 'हा कोणता कॉम्प्लेक्स' असा प्रश्नही निर्माण केला आहे. 'आपल्या देशात जी भूषणभूत स्त्रीरत्ने निर्माण झाली त्या स्त्रीरत्नांचे गुणवर्णन गाण्यात रचण्याचा प्रयत्न कवीने केलेला' असल्यामुळे या खंडकाव्यात पुरुषांना स्थान न मिळणे साहजिक आहे. या प्रकरणी महत्त्वाचा मुद्दा वेगळाच आहे. महाराष्ट्रात निर्माण झालेल्या सर्व भारतीय स्त्रीरत्नामध्ये राजमाता जीजाबाई हे सर्वश्रेष्ठ स्त्रीरत्न होय. परंतु असामान्य

---

६. विनायकाच्या कथाकाव्याच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने हे कालखंड बरोबर नाहीत. कारण, या कवीचे अहल्या, पन्ना, पद्मिनी, दुर्गावती, संयोगिता ही कथा काव्ये १८९८ मध्ये; तर कृष्णाकुमारी, ध्यास तो भास, गणिकोद्धार, वीरमती, मोहानंतर ही काव्ये १९०५ मध्ये प्रसिद्ध झाली आहेत.

रजपूत रमणींकडे वळलेली विनायकाची दृष्टी जिजामातेसारख्या अलौकिक महाराष्ट्रीय महिलेकडे मात्र चुकूनही वळली नाही. कोणत्याही कवितेत जीजाबाईचा साधा नामोल्लेखही नाही. असे कां व्हावे ? मला वाटते, या कवीला स्त्रीवर्गापुढे पतिनिष्ठा, पितृनिष्ठा, राजनिष्ठा इ. परंपरागत निष्ठा बाळगणाऱ्या स्त्रियांचाच आदर्श ठेवावयाचा असल्याने, पतीपासून स्वतंत्रपणे राहणारी, पुरुषाशी बरोबरीने वागणारी आणि स्वराज्यसाधनेचे कंकण बांधून आपल्या पुत्रालाही स्वातंत्र्याची दीक्षा देणारी ही असाधारण स्त्री आपण रंगवावी, असे या कवीच्या मनातही आले नसावे. कारण, एकूण कथाकाव्याचा अभ्यास केला, तर असे स्पष्टपणे दिसते की, बहुतेक काव्यांचा विषय स्वामीनिष्ठा, पितृनिष्ठा वा पतिनिष्ठा हाच आहे. कृष्णाकुमारीची पितृनिष्ठा, पन्नेची राजनिष्ठा, 'ग्रास तो भास' मधील नायिकेची धर्मनिष्ठा हेच या कथाकाव्यांचे खरे विषय होत. आणि मग, आपल्या सहज लक्षात येते की, या कथानायिकांच्या निष्ठेला कधी तडा गेला नाही, की त्यांची व्यक्तिस्वातंत्र्याची उर्मी कधी उफाळून वर आली नाही. म्हणजे हा 'कॉम्प्लेक्स'चा प्रश्न नाही. असलाच, तर तो पुरावा आहे; विनायकाच्या पुनरुज्जीवनवादाचा. अगदी निस्संदिग्ध, वादातीत.

या निष्ठा चितारताना विनायकाच्या मनातील द्वंद्व त्यात दृग्गोचर होते की काय, असा प्रश्न कांही टीकाकारांनी उपस्थित केला आहे. वासवदत्तेची शृंगारवृत्ती व उपगुप्ताची विरागवाणी यामधून "प्रत्यक्ष विनायकाच्या अंत:करणात अनुराग व विराग यांचा संघर्ष कसा चालत असेल, याची थोडीफार कल्पना येते" असे भ. श्री. पंडित म्हणतात.[7] परंतु हे द्वंद्व प्रवृत्ति–निवृत्तीचे असून, त्यातून विनायकाच्या आत्मविष्कारा-पेक्षाही, त्याच्या मनावर झालेला पारंपारिक मायावादाचा परिणामच स्पष्टपणे पाहायला मिळतो, असा निष्कर्ष अधिक तर्कशुद्ध ठरेल कारण, या मायावादाचा त्याच्यावर असलेला प्रभाव, 'सत्य, दिव्य, शांत' वगैरे सारख्या स्फूट कवितातून सहज प्रत्ययाला येणारा आहे.

---

७. विनायकाची कविता, पृ. ४९

* महाकाव्य आणि खंडकाव्य यात रचनेच्या दृष्टीने जो फरक तोच इंग्रजीतील 'एपिक'व 'शॉर्ट नॅरेटिव्ह स्टोरीज,टेल्स् इन् व्हर्स,आयडिल्स' यामध्ये आहे.[८] महाकाव्याप्रमाणे खंडकाव्ये प्रदीर्घ नसतात आणि त्यांची रचना एकापेक्षा अधिक सर्गात न करता ती एकसंघ, पण परिच्छेद पाडून, केलेली असते. चॉसरच्या कथा, गोल्डस्मिथचे 'डेझर्टेड व्हिलेज,' टेनिसनचे 'इनॉक ऑर्डेन,' मॅथ्यू ॲर्नोल्डचे 'सोहराब अँड रूस्तुम' इ. काव्ये अखंड असून ती एकाच वृत्तात रचलेली आहेत. विनायकाची कथाकाव्ये याच घाटणीची आहेत. 'गणिकोद्धार' किंवा 'मोहानंतर' ही दोन्ही कथाकाव्ये एकाच वृत्तात म्हणजे 'साकी' मध्ये आहेत. इतर काव्ये तत्कालीन लोकप्रिय नाटचगीतांच्या चालीवर रचलेली आहेत. (ही लोकप्रिय गीतांच्या चालीवरील रचना करण्याची परंपरा संत तुकडोजी महाराजापर्यंत चालत आलेली दिसते.) भाषेच्या दृष्टीने पाहता ऐतिहासिक वातावरण निर्मिण्याचे, भाषा हे एक प्रभावी साधन ठरते. परंतु, ऐतिहासिक वातावरणाचा भास होईल, अशा शब्दयोजनेचे चातुर्य विनायकाला आढळत नाही. पद्मिनीचे व अल्लाउद्दीनचे सैन्य यात रणधुमाळी चालू असताना 'लागले असंख्य म्हणाया राम, रहीम !' ही अपवादात्मक ओळ सोडल्यास, भाषेतून ऐतिहासिक वातावरणनिर्मिती कुठेच नाही. चंद्रशेखरांचे 'काय हो चमत्कार' हे जानपद काव्य ग्रामीण भाषेच्या दृष्टीने किंवा या. मु. पाठकाचे 'शशि मोहन' हे काव्य वातावरण निर्मितीपूरक भाषेच्या दृष्टीने, या तुलनेत अभ्यसनीय वाटतात. अर्थात् ही काव्य-भाषा कोणत्या मर्यादेपर्यंत मुळातील बोलभाषेत असावी, हा वादग्रस्त प्रश्न आहे. मूळ बोलीत संपूर्ण काव्य असणे अशक्य व अयोग्यच होय. मुसलमानाचे चित्र रंगवायचे तर एक उर्दू काव्यच अशा वास्तवतेकरिता लिहावे लागेल ! म्हणून रसिकांना सहजपणे समजेल इतकेच आणि असेच त्या बोलभाषेतील शब्द वापरून ऐतिहासिक-

---

८. म्हणून, श्री तोडमलयांची खंडकाव्याची, 'मानवी जीवनाच्या कोणत्याही एका विशिष्ट मर्यादित अंगाचे वस्तुनिष्ठ रसोत्कट दर्शन घडविणारे पद्यरूप कथाकाव्य म्हणजे खंडकाव्य होय', ही व्याख्या ग्राह्य वाटते.

तेला, वास्तवतेचा आभास निर्माण करणाऱ्या, कलात्मकतेची जोड देणे हाच बोलभाषेतील शब्द योजनेविषयी उत्तम मार्ग होय.[१]

* विनायकाची भूमिका कर्मठ बोधवाद्याची. पुरुषांना स्वातंत्र्य-प्राप्तीचा बोध आपल्या काव्यातून आपण दिला आहे, असे त्याला वाटते; व म्हणूनच, स्त्रियांना पूर्वापार चालत आलेल्या निष्ठा उराशी बाळगण्याचा बोध तो करतो. स्त्रियांना परंपरा सांभाळण्याचीच शिकवण द्यावयाची आहे; म्हणून स्त्री–स्वातंत्र्य त्याला अभिप्रेतच नाही. मनुस्मृति–प्रणित स्त्री–दास्याविरूद्ध महात्मा फुले, आगरकर, महर्षि कर्वे यांनी जी मोहीम सुरू केली होती, तिचा, हरिभाऊंसारखा, पाठपुरावा तर विनायकात नाहीच; पण, 'पति हेची दैवत' हाच सूर सर्वत्र उमटलेला आहे.

* विनायकाच्या पुरुषविषयक दृष्टिकोणाचा मागोवा घेण्यास त्याच्या इतर कवितांकडे वळावे लागते.पुरुष हे भ्रमरासारखे चंचल असतात, नवनवीन फुलांचे यौवन लुटण्याकरिता, त्यांचा मधू चाखण्याकरिता, हे भ्रमर स्वच्छंदपणे या फुलावरून त्या फुलावर इतस्ततः बागडत असतात आणि पुरुषप्रधान समाजात या वृत्तीला फारसे बंधनही नाही, या आशयाची विधाने त्याने अनेक ठिकाणी केलेली आहेत.

---

१. या मताशी श्री. तोडमल सहमत आहेत. "काव्य वाचताना दुर्बोध वाटू नये, म्हणून व वातावरणनिर्मिती आणि व्यक्तिचित्रण स्वाभाविक व कलात्मक व्हावे, म्हणून ही दोन्ही धोरणे सांभाळून कवीने तत्कालीन बोलीचा वापर करावा. कारण, कवीला ऐतिहासिक व्यक्तींच्या अंतरंगाचा कलात्मक आविष्कार करावयाचा असतो.म्हणून तत्कालीन बोली वापरणे अपरिहार्य आहे. आणि कवी ते काव्य आजच्या वाचकासाठी लिहित असल्यामुळे ऐतिहासिक व्यक्तींच्या अंतरंगाचा आविष्कार वाच-कांच्या अंतरंगापर्यंत पोचला पाहिजे, एवढी खबरदारी त्याने घेणे अवश्य आहे." अर्वाचीन मराठीतील खंडकाव्ये, पृ. २६१–२६२.

'काय होय ते परि पुरुषाला । नव पुष्पावरच्या भ्रमराला' (सुवास) किंवा, 'नव फुलले–पुष्प एक त्या आवडले–हुंगियले–चुंबियले–माथा धरिले-कुस्करिले–फेकूनी धरणीवरी दिधले, (स्त्री आणि पुरुष) यातून त्याचे विचार स्पष्ट होतात. या कवीचे चरित्र लक्षात घेता, स्वानुभूती व कदाचित् सोबतच्या सवंगड्यांची अनुभूती यातून हे काव्य स्फुरले असावे असा निष्कर्ष काढता येणे अशक्य नाही. परंतु, असे असले तरी, प्रीतीवर मात्र त्याची श्रद्धा आहे. प्रीती अमर असते, हे त्याचे ब्रीदवाक्य. 'भीतीने मरतील मानवकुळे प्रीती निमाली तर' अशी त्याची भावना आहे.

★ पाश्चिमात्यांकडे 'रोमँटिक' काळापूर्वी कवी हा स्वतःच्या काव्याचा टीकाकार कधीच नव्हता. स्वतःच्या काव्याचे स्वतःच टीकाकार होण्याचा पायंडा पाडणारे वर्डस्वर्थ, कोलरीज हे पहिलेच रोमँटिक कवी. रोमँटिक कवींचे हे वैशिष्टय म्हणजे साहित्यमूल्यमापनातील एक अमोल भर आहे. विनायकाने अशी टीका कुठे केली नाही; पण, त्याच्या काव्यात 'अनुभूती हाच काव्याचा प्राण होय' ही रोमँटिक कवीची भूमिका मात्र मांडली गेली आहे.

स्वानुभूत वासाचे दान
करावयाला जोवर ये न
तोवर कविता लतिकेवरती
कर्णिकार सुमनांची भरती

हा त्याने मान्य केलेला सिद्धांत खरा आहे. पण, नेमकी ह्याच अनुभूतींची उणीव त्याच्या काव्यात, त्याच्या बोधवादी दृष्टिकोणामुळे, पदोपदी जाणवते, हेही तेवढेच खरे. (कठोर आत्मनिरीक्षणनंतर विनायकाला आपल्या काव्यातील जाणवलेली प्रमुख उणीव तर या शब्दांमधून व्यक्त होत नाही ना ?) शिवाय, काही वेळेला बोधवचने लिहिण्याकरिता काव्याचा जन्म झाल्याचे नजरेस येते; व त्यामुळे त्या बोधवचनातील उथळपणा अधिकच जाणवतो. "विनायकांची अर्थान्तरन्यासाची प्रवृत्ती फार असून बोधवचने आशयाच्या दृष्टीने सामान्य व सर्वपरिचित स्वरूपाची असली, तरी अर्थ-

प्रतीतिपूर्वक असतात."[१०] "त्याच्या या भूमिकेमुळे त्याच्या गीतात धाल्हाळ नाही तशीच रसोत्कटताही नाही, ही उणीव आहे."[११]

* ऐतिहासिक कलाकृती निर्माण करणाऱ्या कलाकाराला निज-कालीन वातावरणातून इतिहासकालात झेप घ्यावी लागते. ही ऐतिहासिक भरारी केवळ तत्कालीन वाङ्मयाच्या परिशीलनाने साधतेच असे नाही. त्याकरिता 'हिस्टॉरिकल इन्टयुइशन' म्हणजे 'ऐतिहासिक प्रेरणा' लाभणे आवश्यक असते. तरीही ऐतिहासिक भावजीवनाचे दर्शन घडावयाला ऐतिहासिक वाङ्मयाचा विचक्षण व्यासंग आणि ऐतिहासिक स्थलांची प्रत्यक्ष पहाणी; यांना अनन्यसाधारण महत्त्व येते. या अत्यंत महत्त्वाच्या अशा दोन्हीही गोष्टींकडे विनायकाचे दुर्लक्ष झालेले आहे. मानवी भावनांचे स्वरूप शाश्वत असले, तरी स्थल–काल–देशपरत्वे त्याचा परिवेश बदलावा लागतो. त्यालाच आपण वाङ्मयातून आढळणारे तत्कालीन परिस्थितीचे प्रतिबिंब म्हणतो. ऐतिहासिक जीवनाचा प्रत्यक्षा-नुभव न घेता आल्यामुळे निजकालीन जीवनाचे आरोपण कल्पनाशक्तीच्या साहाय्याने कवी करीत असतो. ही कल्पनासृष्टी इतिहासकालाशी जितकी सुसंगत असेल, तितकी ती यथातथ्य; व जितकी वास्तवदर्शी असेल, तितकी ती परिणामकारक ठरते. 'कृष्णाकुमारी' हे काव्य हृदयाला भेदून जाते याचे कारण विनायकाने तपशीलाच्या व भावनेच्या बारीक बारीक रेषा कल्प-नेच्या कुंचल्याने अचूक आणि रेखीव रीतीने रंगविल्या आहेत. विनायकात अभावाने आढळणारी ही वाङ्मयीन रंगसंगती या काव्यात,

हिमधवलांगी धवल चंद्रिकाहृदया बाला ती
धवल फुले ती धवल कराने धवल गुणी गाठी ।

अशा स्वरूपात जरूर आढळते. एरवी विनायकाची स्त्रीसृष्टी केवळ वाङ्म-यातच शोभावी, अशी असामान्य गुणादर्श आहे. व्यक्तिरेखेतील ढोबळ-

१०. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, डॉ. अ. ना. देशपांडे' पृ. ३९१.

११. महाराष्ट्रलक्ष्मी, प्रस्तावना, म. ना. अदवंत, पृ. १६.

९५२२५ 

पणाही त्यामुळेच जाणवतो; व सामान्यांचे सामान्य जीवन, सामान्य भावना आणि बोलभाषेतील शब्द यांच्या अभावामुळे 'कमला' सारखे काव्य देखील काळजाचा ठाव घेऊ शकत नाही. आणखी असे की, स्त्री ही पुरुषांइतकीच मानवी आहे, हे त्याला मान्य नाही. भ्रमरवृत्ती ही पुरुषांची स्वाभाविक वृत्ती असून स्त्रियांचा मात्र पतिनिष्ठा हाच खराखुरा अलंकार होय; या पारंपारिक विचारसरणीचा त्याने वारंवार उद्‌घोष केला आहे. "जुन्या काळी तसल्या स्त्रिया आढळत. त्या अलौकिक आहेत. त्या कसलेही दिव्य सहज करू शकतात. म्हणून सामान्य स्त्रियांना त्या आपल्यातल्या वाटत नाहीत. परधर्मी दुर्जनापासून व तत्सम अन्य दुष्टापासून आपले संरक्षण करण्याचे त्यांचे कसब हीच तेवढी कथावस्तु; म्हणजे, शीलभ्रष्ट होण्याचा धोका प्राप्त झाल्यावरच स्त्रीयांमधील उत्तमोत्तम गुण प्रकाशात आवयाचे; एरवी विनायकाच्या दृष्टीने ती 'सुंदर पुतळी', 'दासी' 'अबला, वगैरेच.[१२]

आता महत्वाचा प्रश्न उद्‌भवतो तो असा, की व्यसनाधीन व विषयासक्त असे स्वैर जीवन जगणारा आणि स्त्रीकडे परम आदरयुक्त पावन दृष्टीने पाहणारा, यातील खरा आणि मूळचा विनायक कोणता ? त्याची स्थायी भावना व मूळ प्रकृती ही जीवनावरून जोखावयाची की काव्यावरून मापावयाची ? कुणाला "त्या काळचे रूक्ष सहानुभूतिशून्य गृहजीवन आणि निसर्गस्फूर्त रक्तातील रंगेलपणा यातील ओढाताणीने दुखावलेल्या दिलदार माणसाची ही कहाणी वाटते;"[१३] तर कुणाला,"फुलपाखरा प्रमाणे दिसल्या फुलावर झडप घालण्यासाठी ओढ घेणारे त्यांचे बाहेरचे मन आणि समाजाला आधारभूत झालेल्या अंतःकरण प्रवृत्ति ज्यात जिवंत होत्या,

---

१२. पांच कवी–पृ. १०८. वा. ब. पटवर्धनांना मात्र या मागे "पुरुषांना ताळ्यावर आणायला, त्यांचे डोळे उघडायला, महाराष्ट्रातील स्त्रिया तरी त्यांचे स्वतःचे तेज, स्वतःचे ओज, स्वतःचे शील आणि स्वतःचे सत्त्व सांभाळून राहोत, अशा आशेची भिस्त" आढळते.–विनायकांची कविता, पृ. ९

१३. पांच कवी, पृ. १०५

ते आतले मन यातले द्वंद्वयुद्धाचे निदर्शन" किंवा "लौकिक चरित्र आणि अंतस्थ चरित्र यातील विरोध म्हणजे त्यावेळच्या महाराष्ट्राचे प्रतिबिम्ब" वाटते.[१४] "विनायकाचा ओढा स्वभावतःच विक्रमाकडे व वैराग्याकडे होता. (कथाकाव्यात शृंगार अंतर्भूत आहेच, असे म्हणणाऱ्याबद्दल आणि आपले चरित्र कुणी वाचू नये इतके ते वाईट आहे, असे सांगणाऱ्याबद्दल हे विधान आहे) तेव्हा त्यांचा त्याच्या काव्यात परिपाक उतरावा यात काही आश्चर्य नाही. वृत्ती ही तात्कालिक असते आणि तिच्या ताब्यात गेल्यावर मनुष्य कित्येकदा अनर्थ करून बसतो. विनायक हे चंचल असल्यामुळे क्षणैक वृत्तीला वश होत"[१५] असेही एक मत आहे.

विनायकांचे जीवन लक्षात घेता या चंचल वृत्तीच्या आहारी ते नेहमीच गेले आहेत आणि म्हणूनच, त्याचा तो केवळ स्वभावच नव्हे; तर स्थायी भाव मानला पाहिजे. मनातील खरे भाव शब्दसाकार करावयाला ते भीत असावेत. आपल्या मनातील वाईट गोष्टी समाजापुढे ठेवावयाला कोणत्याही सामान्य माणसाचे मन कचरत असते. चार भिंतीआड तो जे करतो, ते चारचौघात करायलाच काय, पण सांगायलाही त्याला लाज वाटते. हा सामान्य नियम विनायकालाही लागू आहे. त्याने स्वतःचे चरित्र छापू नये, असे म्हटले त्यावरूनही आपल्या जीवनातील घटना चारचौघात उघड व्हाव्यात, असे त्याला वाटत नव्हते, हे स्पष्ट होते. मग काव्यातून तरी आपल्या या वृत्तीला तो वाट कशी देईल ? उलट, ती दाबून टाकण्यासाठी नीतीचेच अवडंबर तो काव्यात माजवील, असे मानणे हेच मानसशास्त्राला अधिक जवळचे ठरेल. "स्वेच्छाचार वाढला व साधे नीतिनिर्बंध व शिष्टाचारही धुडकावण्याची चटक लागली म्हणजे अशा उच्छृंखल आचरणाबद्दल मन खाऊ लागते आणि मग मनःशांतीसाठी ब्राह्मणांचे आशीर्वाद, देवदेवतांचे जपजाप्य, अनुष्ठान वगैरेच्या नादी दुराचरणी माणसे

---

१४. विनायकाची कविता–वा. ब. पटवर्धनांनी लिहिलेली प्रस्तावना, पृ. ११

१५. विनायकाची कविता,–भ. श्री. पंडित.

सहज लागतात."[१६] विनायकाचे नेमके हेच झाले असावे. समाजातील भ्रष्ट झालेले आपले स्थान[१७] मिळविण्याचा त्याचा हा प्रयत्न असावा. समाजाला शिरोधार्य होतील अशाच भावनांचा पाठपुरावा त्याच्या काव्यातून आढळतो, तो कदाचित् यामुळेच. वर्तनाने गमावले ते काव्यरचनेने कमाविण्याचा त्याचा अट्टाहास तर यातून स्पष्ट होत नाही ना ?

विनायकाचे जीवन आणि काव्य यामध्ये ही जी विलक्षण विसंगती आढळते, ती त्याच्या पुनरूज्जीवनवादी प्रेरणेमुळे झाकली गेली आहे. विनायकाची जीवनदृष्टी शोधताना या विसंगतीचे दर्शन घडविणे क्रमप्राप्त ठरते, इतकाच या विवेचनाचा अर्थ घ्यावयास हवा. विनायकाने आपल्या जीवनातील विफलता लपविण्यासाठी काव्य रचले, असा आरोप या सर्व विवेचनातून ध्वनित होऊ शकतो. पण तसा आरोप करणे न्याय्य आणि उचित होणार नाही. कारण, पुनरूज्जीवनाचे पवाडे गाणाऱ्या या शाहीराचे जीवन योगायोगाने डागळलेले आहे. त्याचे जीवन असे डागळलेले नसते तरीही तो पुनरूज्जीवनवादाचाच शाहीर झाला आणि राहिला असता, एवढी अंध इतिहासभक्ती विनायकाचे ठायी निश्चितपणे आहे.

---

१६. आजकालचा महाराष्ट्र, पृ. ५४

१७. "विनायकाच्या भ्रष्टतेचा चारचौघात बभ्रा झाला होता, असे दिसते." विनायकाची कविता, पृ. ४२.

# ७. मूल्यमापन

* आदर्शानुगामी काव्यपिंड
* प्रयोगजन्य प्रेरणा
* साधर्म्यवेचकता– एक प्रतिभा पैलू
* नादसंवेदना– एक प्रतिभा लक्षण
* आवर्तनशीलता– एक सहजधर्म
* संकोचशील काव्य प्रकृती
* राष्ट्रीय कविता: एक प्रवाह.

★ एखाद्या कवीचे किंवा साहित्यिकाचे आपण मूल्यमापन करतो म्हणजे नेमके काय करतो? त्याच्या काव्यातील भावाविष्कार प्रामाणिक आहे की सुंदर शब्दांशी सहजपणे खेळता येते म्हणून तो खेळ खेळला गेला आहे, हे आपण पाहतो? कल्पनेची गरुडझेप कवीला कितपत साधली आहे अथवा उत्कटतेने त्याचा शब्दसागर कसा ढवळून निघाला आहे, हे आपल्याला बघायचे असते काय? या काव्यांतर्गत मूल्यांचा आपण विचार करतो तो त्याच्या काव्याचा दर्जा हुडकून काढण्यासाठी किंवा त्याच्या काव्याची उंची मापण्यासाठी. कवीची काव्यात उतरलेली प्रवृत्ती, त्याचे काव्यविचार, काव्यांतर्गत आशय, अभिव्यक्ती, प्रयोजन आणि साफल्य ही सारी अंगे आणि उपांगे आपण किंचित सहानुभूतीने, थोड्या तटस्थतेने आणि जराशा वटारलेल्या डोळ्याने तपासून घेतो. ही काव्यकसोटी आवश्यक आहे. किंबहुना, या प्राथमिक कसोटीखेरीज आपल्याला पुढे जाणेही शक्य नसते. पण कोणाही कवीचे मूल्यमापन कर-ताना आपल्या डोळ्यापुढे आणखीही काही ठळक प्रश्न उभे राहतात. आपण विचार करतो तो असा की, या कवीचे आपल्या भाषेतील काव्य-प्रवाहात नेमके स्थान कोणते आहे? हा कवी निर्माण झाला नसता तर

काही प्रवाह खुंटले असते का ? किंवा, किमानपक्षी ते रोडावले असते का ? म्हणजे त्याच्या कवितेने रूढ ठरीव चाकोरीऐवजी काही वेगळे वळण घेतले आहे का ? आणि त्यामुळे काही वेगळे प्रवाह वाहू लागले आहेत का ? नवी दालने उघडली गेली का ? साहित्याचे क्षितिज विस्तारले गेले का ? वाङ्मयात नवी फुले फुलायला ही कविता कारण झाली का ? म्हणजेच, जेव्हा एखाद्या कवीचे आपण मूल्यमापन करतो, तेव्हा त्याने निर्माण केलेल्या परंपरा, पूर्वकालीनांच्या परंपरेतील त्याचे स्थान आणि भविष्यकाळावर त्याचा उमटलेला ठसा यांचा आपण साधार आणि सर्वंकष मागोवा घेत असतो.

विनायकाची कविता वाचताना त्या संपूर्ण काव्यामागे एक विशिष्ट सूत्र आहे आणि त्या सूत्रामागे विशिष्ट काव्यपिंडाचा आधार आहे, याची जाणीव झाल्यावाचून राहत नाही. एकाच पेळूतून निरनिराळे धागे निघावेत त्याप्रमाणे काव्यप्रतिभेच्या विवक्षित पैलूतूनच त्यांचा सारा काव्यसंभार उभा झाला आहे. म्हणून त्या कविपिंडाचा मागोवा घेण्यानेच त्याच्या काव्यांतर्गत रहस्याचे आकलन, कविप्रतिभेचे मापन आणि कवी या नात्याने त्याचे मूल्यांकन सहजसाध्य होण्याचा संभव आहे.

विनायकाच्या बाबतीत, चंद्रशेखरांप्रमाणे, जीवनपिंड आणि काव्यपिंड वेगळे कल्पावे लागतात. त्यांच्या काव्याचा विचार करताना जीवनपिंडाचा विचार अर्थशून्य ठरतो. कारण, त्यांचा जीवनपिंड स्वच्छंदी असला तरी काव्यपिंड आदर्शानुगामी (Normative) आहे. या आदर्शानुगामी पिंडाचा पहिला परिणाम असा असतो, की कवी जेवढे काही श्रेयस् असेल तेवढेच अभिव्यक्त करू पाहतात. त्यामुळे त्यांच्या काव्यात एक प्रकारचे अपरिहार्य असंतुलन निर्माण होते. केवळ श्रेयस्लाच कवितेत स्थान असल्याने कविमनात उफाळणारे अनुभव उत्कट असले, तरी काव्यात त्यांना स्थान नसते. लोकसन्मुख आदर्श काव्याचे चुंबक त्यांची प्रतिभा दुसरीकडे वळू देत नाहीत. विनायकी काव्याचे वैशिष्टयच असे की, वास्तवाला रगडूनच त्याचा आदर्श उभा राहू शकतो. वास्तवाची वासलात

लावणारा हा पैलू अभिनवतेच्या क्षेत्रातही असंतुलन निर्माण करतो. विनायकाच्याच बाबतीत सांगायचे, तर इंग्रजी वाङमयाची थोडीफार ओळख असूनही केशवसुती अभिनवतावाद त्याच्या काव्यात उतरला नाही. स्वच्छंदवादी आंग्ल कवींचा त्याच्यावर प्रभाव नव्हता, असे म्हणणे या संदर्भात चुकीचे ठरेल. तो परिणाम डावलून आदर्शाचाच ध्यास त्याने घेतला आहे.

* विनायकाच्या प्रतिभेची झेप मानवतेचे स्थलकालातीत स्वरूप आपल्या आवाक्यात घेण्याइतकी समर्थ नाही. एकीकडे मानवी शक्तीचे अमर्याद सामर्थ्य तिला मंजूर नाही; पण, त्याचबरोबर, दुसऱ्या बाजूला, शिवाजीसारख्या नररत्नांनी ती प्रभावित झालेली आहे. या द्वंद्वामुळे तिला मानवी सामर्थ्याचा गुरुत्वमध्य साधता आला नाही. असा गुरुत्वाकर्षणाचा मध्यबिंदु निश्चित करता आला म्हणून केशवसुत आशावादी-मानवतावादी आणि मर्ढेकर निराशावादी-मानवतावादी होऊ शकले. केशवसुतांना जाणवलेले दिव्य भविष्याचे चित्र विनायकाला दिसले होते; पण त्याला ते तीव्रतेने जाणवले नव्हते. 'महाराष्ट्र लक्ष्मी' आणि 'यापुढे' या कविता जवळ जवळ ठेवल्या म्हणजे याची साक्ष पटते. मानवी जीवनाचा स्थायी केंद्रबिंदू त्याला सापडला नाही. म्हणून मानवाचे जे चित्र विनायकाला दिसले, ते अपुरे होते; ते चित्र भूतकालीन मानवाचे होते. विनायक त्या चित्राशी समरस होऊ पाहत होता; वर्तमान विसरू जात होता. कौटुंबिक जीवन आणि भोवतालचे सामाजिक जीवन त्याने काव्यापासून जाणीवपूर्वक बाजूला सारले; दृष्टिआड केले. या अपुऱ्या चित्राने कवितेत अपुरेपणा आणला.

त्याची काव्य-प्रेरणा प्रयोगशील नाही; पण प्रयोगजन्य आहे. आशयाच्या अभिव्यक्तीकरिता शब्दांचे आणि रचनेचे नवे नवे प्रयोग सातत्याने करीत राहणे, याला मी प्रयोगशीलता म्हणतो.पण एखादाच प्रयोग संपूर्ण काव्यभर खेळवीत राहणे, ही मी प्रयोगजन्यता मानतो. स्वातंत्र्याभिलाषा, पूर्वजगौरव, मातृभूमिप्रीती ही राष्ट्रीय भावना होऊ शकते, हा

एकच प्रयोग तो आपल्या कवितेतून सतत खेळता ठेवतो. या प्रयोगजन्य काव्यानेच तो यशस्वी कवी ठरला. भलेभले या प्रयोगापायी फसावेत, अशी नजरबंदी त्याने साधली. पण या प्रयोगात नव्या धारणेसाठी, सावरकरां-सारखी, नवी काव्यभाषा तो निर्माण करू शकला नाही. अभिनव काव्य-भाषा नव्हे, तर शब्दांची अभिनव रचना हाच त्याचा खरा विशेष. त्यामुळे त्याच्या कवितेचे सामर्थ्य वस्तुसौंदर्यात नाही; ते रेखासौंदर्यात आहे.

विनायकाची कविता वाचताना पुन्हा पुन्हा जाणवते, की ती विवक्षित गरजेतून निर्माण झालेली कविता आहे. पण त्या गरजेला तिने केवळ स्पर्श केला आहे; गरज भागविण्याइतकी ती समर्थ नाही. ही कविता जीवनसाधनेसाठी म्हणून जन्मास आली; पण ही साधना तिला साधली नाही. या कवितेची जाणीव जीवनदर्शनात्मक असली, तरी जीवन-संदर्भमूलक नाही. म्हणून, जीवनदर्शनाचा केवळ आभास ती निर्माण करू शकली; यथार्थ दर्शन घडवू शकली नाही. पण हा आभास रंगदार आहे. विनायकाच्या खऱ्या मर्यादा सूज्ञ समीक्षकांच्याही नजरेतून निसटाव्यात, इतके या आभासाचे रंग चेतोहारी आहेत. या सौंदर्यात तिचे सामर्थ्य असले तरी त्यासाठी तिचा जन्म नाही. तिची प्रेरणा वेगळी आहे आणि प्रवाह वेगळाच आहे. जीवनाचे अंगदर्शन ही तिची प्रेरणा आहे आणि आदर्शानुगम हा तिचा प्रवाह आहे. समाजसापेक्ष वृत्तीतून निर्माण झालेली ही कविता वस्तुतः समाजनिरपेक्ष राहिली आहे. जीवनसंघर्षाशी एकरूप होण्याची प्रतिज्ञा करून निघालेले हे काव्य अखेरीस भूतकाळात रममाण होण्याचा पलायनवादी मार्ग स्वीकारते. याचा अर्थ हा की, प्रमेयमूल आणि प्रमेयरीत यांची कुठेतरी फारकत झालेली असावी.

* साधर्म्यवेचकता हा एक लहानसाच पण ठळकपणे दृष्टीस पडणारा त्याच्या काव्यप्रतिभेचा एक कमनीय पैलू. ही साधर्म्यवेचकता कधी रूपकाचा आश्रय घेऊन येते, तर कधी प्रतीकाचा वापर करते. दुःखाने, जळत्या अंतःकरणाने सुस्कारे सोडणारी आणि अश्रूंच्या अखंड धारा डोळ्यातून गळत असलेली, अन्नकंगाल झालेली, एक हतभागिनी त्याला

दुर्दैवी महाराष्ट्रभूच्या पारतंत्र्याची जाणीव करून देते आणि छत्र्यांचा केसरी पाहताक्षणी प्रतीकरूपाने महाराष्ट्र त्याच्यापुढे उभा राहतो; पण साधर्म्य वेचून घेणारी ही त्याची दृष्टी उपमेयालाच सदैव केंद्रस्थानी ठेवते आणि त्यामुळे त्याची प्रतीकात्मकता केवळ काही कवितांपुरतीच मर्यादित राहते.

मराठी कविमनाला स्वाभाविकतःच अध्यात्माचें कमी अधिक आकर्षण असलेले आढळून येते. पण विनायकाची पृथगात्मता अशी की, त्याचा अध्यात्म विचारही साधर्म्य वेचकतेच्या पैलूची गवसणी घालून येतो. चिंतनाची परिणती अध्यात्मात व्हावी हा मराठी मनाचा संकेत जणू त्रिकालाबाधित ठरला आहे. मग ते चिंतन 'स्व'चे असो, समाजाचे असो; राष्ट्राचे असो अथवा विश्वाचे असो, वास्तव जीवनाला दंश करून मोक्षापाठी फरफटविणारी निवृत्ती विनायकाला विषारी सापाच्या पूजेच्या नागपंचमीची आठवण करून देते. वासवदत्तेला केलेला उपगुप्ताचा उपदेश निवृत्तीपर आहे. पण ह्या चार दोन कवितांवरून विनायकाला विरागी म्हणणे वस्तुस्थितीला धरून होणार नाही. निवृत्तीचा उपदेश उपगुप्ताने केलेला आहे; विनायकाच्या स्वतंत्र काव्यात त्या वृत्तीचा आढळ नाही. नागपंचमीमध्ये तर निवृत्तीचा अधिक्षेपच केला आहे. विनायकात निवृत्तीचा विचार आहे; पण वृत्ती नाही. पण एवढे खरे की, सरंजामशाहीच्या उत्कर्षातून राष्ट्रीय स्वातंत्र्याचे स्वप्न चितारणारे विनायक, सरंजामशाही चौकटीला चिरडून मध्यमवर्गीय उत्कर्षातून वैश्विक स्वातंत्र्याचा झेंडा फडकविणारे केशवसुत आणि मध्यमवर्गाच्या अगतिक अवस्थेतून आणि विज्ञानाच्या भयप्रेरक जाणिवेतून वैश्विक स्वातंत्र्याचा फोलपणा सिद्ध करू पाहणारे मर्ढेकर, या तिघांचेही भौतिक जीवनाविषयी लागलेले सूर विसंवादी असले, तरी या तिघाही कविमनावर अध्यात्माचा असलेला प्रभाव मराठी मन कुठेतरी एक असल्याचेच अपरिहार्यपणे सिद्ध करीत नाही काय ?

साधर्म्यवेचकतेचा पैलू व्यासंगी निरीक्षणाने विनटलेला नसल्याने तो स्थूल-चित्रणातच स्थिर झाला आहे. सूक्ष्मतेचा स्पर्श त्याला नाही.

विनायकाची कविता शि. म. परांजपे यांच्याच काळातील. पण शि. म. यांच्या गद्यातही जे ध्वनिकाव्य दरवळते, त्याचा लवलेश विनायकात नाही. आपले काव्य लोकाभिमुख असल्याने ते सामान्यांना समजावे या धारणेने व धोरणाने त्याने स्थूल–रूपी कविता लिहिली, असे मत मांडता येईल. पण शि. म. यांचे लेखन तर वर्तमानपत्री; बोलून चालून चारचौघासमोर ठेवण्यासाठीच निर्माण झालेले. तरीही त्यांच्यातील सूक्ष्मता, व्यंग्यार्थ व सूचकता विनायकात नाही. यामुळेही सूक्ष्मता हा विनायकाच्या काव्य-प्रतिमेचा गुण नव्हे, या कल्पनेवरच शेवटी स्थिर व्हावे लागते.

* त्याच्या काव्यप्रतिभेचे आणखी एक लक्षण म्हणजे ती अर्थसंवेद्य असण्यापेक्षा नादसंवेद्यच अधिक आहे. कर्णमधुरता हा त्याच्या काव्याचा एक आकर्षक गुणविशेष होय.

करूनिया निर्धार मनाचा, धरून तलवार;
गेला कृष्णेजवळ नीच तो करावया वार !
करीत होती हार फुलांचा जाईच्या रमणी,
जणों करी स्वकरें तरूणांचीं हृदयें बद्ध गुणीं !
हिमधवलांगी धवल चंद्रिका हृदया वाला ती,
धवल फुलें ती धवल करानें धवल गुणीं गांठीं !·
कृष्ण हृदय धवलतें जवळ ते झालें धवल पळीं,
नवल न धवलच बिंब शशीचे विलसे नील जलीं !
तिच्या दिव्य तेजाने दिपला भाला, कंप करीं,
उगारलेले शस्त्र तयाचे गळले भूमीवरी !
टिकले पुण्यप्रभावापुढे नाही पळ दुरित,
मग्न मनोरथ परत दुरात्मा गेला थरथरत !

कमालीची कर्णमधुरता असलेल्या या काव्यपंक्ती विनायकाच्या नादसंवेद्य प्रतिभेची साक्ष देण्यास समर्थ आहेत. परंतु, तलवार घेऊन आलेल्या मारेकऱ्याच्या हातातील भाला दिपला, अशी त्याची शस्त्रविषयक

बदलाची चूक अनवधानाची म्हणून क्षम्य मानली, तरी मारेकऱ्याचे कृष्ण हृदय धवलतेजवळ धवल झाल्यावर 'दुरात्मा भग्न मनोरथ होऊन थरथरत परत गेला' हे वाचताना प्रत्येक शब्दागणिक अर्थदृष्टीने त्याने केलेली भयानक विसंगती, ही त्याची प्रतिभा अर्थ संवेद्यतेच्या कोटीतील नाही, याच निष्कर्षाकडे आपणास नेते.

* आवर्तन हा त्याच्या प्रतिभेचा आणखी एक धागा—एक सहज धर्म. त्याची रचना जशी आवर्तनशील आहे तशीच विचारधाराही आवर्तनी आहे. त्यामुळे त्याची काव्यप्रतिभा एकशाखी वाटते. ती वटवृक्षाप्रमाणे बहुशाखी नाही; सुरूप्रमाणे आहे. सद्यकालीन समाजाची पिंजऱ्यातील सिंहाप्रमाणे कोंडी झाली आहे, याची एकदा झालेली जळती जाणीव तो निरनिराळ्या शब्दांत, वेगवेगळ्या कवितांत, आवर्तनाने गुंफीत असतो. एक टप्पा सोडल्यावर दुसऱ्या टप्प्याकडे त्याची कविता सरकत नाही, ती एका ठराविक आवर्तनातच फिरते. हे जसे आशयात्मक आवर्तन, तसेच रचनात्मक आवर्तनही वेळोवेळी जाणवते. कवितेची मध्यवर्ती कल्पना तो ध्रुपदात गुंफतो आणि त्याचा केवळ पसाराच पुढील सर्व काव्यपंक्तींतून फुलवतो. त्या पसाऱ्यात विचार हे विशिष्ट वर्तुळापलीकडे जात नाहीत; अनुभूती मर्यादा ओलांडीत नाहीत; त्यातून नवी परिमाणे हाती लागत नाहीत. म्हणजेच त्याची कविता गतिशील नाही. वैचारिक आवर्तनात गुरफटून पडल्याने, क्रांतिसाध्य राजकीय स्वातंत्र्याहून अन्य सामाजिक विचार त्याच्या कवितेला अस्पर्श ठरले आणि अशा कुंठित—खुंटित वाट-चालीमुळे भाष्यकार कवी होण्याची वाट त्याला गवसलीच नाही.

* त्याच्या काव्याची प्रकृती संकोचशील आहे. त्याची कविता केशवसुतांप्रमाणे निर्भरशील नाही किंवा मर्ढेकरांसारखी संयमशील नाही. त्यामुळे त्याच्या अनुभूतींची अभिव्यक्ती जशी आदर्शानुगामी काव्यपिंडामुळे झाली नाही, तशीच ती संकोचशीलतेमुळेही झाली नाही. उलट, संकोचशील-तेमुळे आदर्शाचा तळ बुडी घेऊन तिला पाहता आला नाही. त्याच्या कवितेची आकृती ही देखील संयमित नव्हे, तर संकुचितच वाटते. संयमित

आकृतीचे वैशिष्टच असे, की ती जाणिवांना स्पर्शून ध्वनिकाव्य निर्माण करून पुढे जाते. संकुचित आकृती ध्वनिकाव्य निर्माण करीत नाही; सर्व विषयव्याप्त जाणिवांना, म्हणजेच सर्वंकष आशयाला, स्पर्शही करीत नाही. विनायकाच्या सर्वच नायिका देवता वाटतात; त्यातील एकही मानुषी वाटत नाही. याचे कारण त्याचे व्यक्तिरेखाटन संयमित नसून संकुचित आहे, हेच होय. परिणामत:, विनायकाची कविता आशयबद्ध आहे, पण तीत आशयनिष्ठा नाही, असा प्रत्यय ती कविता अभ्यासताना वारंवार येतो. आशयासाठी निर्माण झालेली ही कविता आकारातच गुंतून आणि रंगून गेली आहे. किंबहुना, असेही म्हणता येईल की, आशयाने आकार घेण्याऐवजी, आकारानुसार वळण घ्यावे लागल्यामुळे आशय गुदमरून गेला आहे. केशवसुतांची कविता विनायकाहून वेगळी वाटते ती इथेच. म्हणूनच, चंद्रशेखरांची कविता शब्दनिष्ठ मानली, तर विनायकाची हेतुनिष्ठ आणि केशवसुतांची आशयनिष्ठ असे पुरोगामी टप्पे एकाच कालखंडात काव्यपिंडाच्या प्रकृती भेदाने दिसून येतात.

* आणि तरीही आपण कवी विनायकाकडे बघतो तेव्हा असे लक्षात येते की, त्याने मराठी वाङमयात आपले स्वतंत्र असे स्थान निर्माण करून ठेवले आहे. राजकीय स्वातंत्र्याचा विचार हा आधुनिक कवितेचा प्रभावी विषय होऊ शकतो, हे त्याने बरोबर टिपले; मातृभूमीचा ज्वलंत अभिमान हा आवेगी काव्याचा लोकहृदय हलविणारा विषय ठरतो, हे त्याने अचूक हेरले. ही त्याची स्वातंत्र्यभावना संपूर्ण मानवी जीवनाला व्यापणारी न होता केवळ स्वदेश स्वातंत्र्यापुरतीच; व तीही राजकीय पैलूपुरतीच, सीमित राहिली हे खरे. धर्माच्या आणि रूढीच्या आत्यंतिक अभिमानामुळे आणि पुनरुज्जीवनाविषयीच्या अंधश्रद्ध आग्रहामुळे तत्कालीन लोकनेत्यांना अभिप्रेत असलेल्या स्वातंत्र्याहून त्याची स्वातंत्र्य-कल्पना नुसतीच भिन्न नव्हे, तर विरोधीही झाली, हेही मान्य. शिवनिष्ठेचे रूपांतर यवनद्वेषात होऊन, तत्कालीन राजकारणाशी विसंगत असा सूर त्याच्या काव्यात भरला गेला, हेही ग्राह्य. पण, त्यामुळे त्याच्या काव्याला स्वतंत्र स्थान नाही, असा समज करून घेण्याचे काहीच कारण

नाही. प्रखर देशभावना हा जिवंत काव्याचा तेजस्वी विषय होऊ शकतो याची जाणीव प्रथम त्यानेच निर्माण केली. केशवसुतांनी राष्ट्रीय कविता लिहिली; पण, केवळ याच विषयाला वाहिलेल्या कविता एखाद्याला कवी म्हणून पूर्णत्व आणू शकतात, याची जाण विनायकाला अधिक दिसते. त्याने तो विषय विविधतेने हाताळला. पूर्वजपराक्रमाच्या इंद्रधनुष्याचे पहिले वहिले चेतोहारी दर्शन आधुनिक काव्यात त्याने इतिहासात रंगून जाऊन घडविले. त्याच्या नकळत त्याचा असा स्वतंत्र संप्रदाय निर्माण झाला. तो केशवसुतांच्या संप्रदायातील कवी नव्हे. त्याचा पंथ वेगळा आहे आणि त्याला वेगळा पंथ आहे.

विनायकाचे राष्ट्रीयत्व, महाराष्ट्रव्यापी कां असेना, जेव्हा आपण मान्य करतो, तेव्हा ते विशिष्ट मर्यादित अर्थानेच, हेही स्पष्टपणे ध्यानात धरले पाहिजे. इंग्रजपूर्व भारत हा अनेक संस्थानांचे कडबोळे असलेला देश होता. राजकीय दृष्टचा तरी तो सरंजामशाहीतच होता. या देशाच्या संपत्तीचे आणि सत्तेचे विभाजन अनेक राज्यकर्ते आणि अनेक घराणी यात झालेले होते. एका बागेतल्या प्रत्येक झाडाला जसे वेगळे अस्तित्व तसे येथील संस्थानांचे होते. त्यामुळे प्रत्येक विभागातल्या प्रजेला आपल्याच जमिनीपुरत्या मर्यादित असलेल्या धन्याबद्दल किंवा धान्याबद्दल काय ते प्रेम वाटायचे; त्यापलीकडे आंध्राने पंजाबवर किंवा गुजराथने बंगालवर प्रेम करण्याचे काही कारणच नसे. इंग्रजी राजवटीने साऱ्यांना एकाछत्राखाली आणले व नांदविले. मग मात्र 'या साऱ्यांचे मिळून एक' असे 'राष्ट्र' आहे याची कल्पना आपल्या मनाला शिवली; हृदयात रूजू लागली. एरवी अटकेवर मराठी झेंडा रोवण्यातच सर्व आनंद सामावला होता. अटक आणि पुणे ही एकाच राष्टातील दोन शहरे आहेत, याची जाणीवही कल्पनेला फारशी स्पर्श करीत नसे. ही एकराष्ट्रीयत्वाची कल्पना भारताला नवीन असली; व इंग्रजी विद्येच्या व्यासंगाने तिला अंकूर फुटू लागले असले, तरी विनायकापूर्वीही लोकहितवादी, रानडे, टिळक प्रभृति पुढाऱ्यांच्या मनात ती सुस्पष्ट होती. किंबहुना, १८८५ साली झालेली राष्ट्रसभेची संस्थापना हा याच भावनेचा उन्मेष होय. परंतु ही जाणीव विनायकाच्या राजकीय विचारांना स्पर्श करून गेली होती, असे म्हणावयास आधार नाही.

आधुनिक अर्थाचे राष्ट्र आणि भौतिक विज्ञान यांचा रक्तामासासारखा संबंध आहे, याची विनायकाला तिळमात्रही जाणीव नाही. ज्या क्षणाला येथील भूमीवरून आगीनगाडी धावायला लागली, ज्या घटकेला येथल्या भूमीने तारायंत्राचे खांब आपल्या माथी घेतले, ज्या दिवशी केवळ गगनात चमकताना दिसणारी बिजली या भूमीवर अवतरली आणि तिने सारा आसमंत उजळून टाकला; त्या क्षणाला, त्या घटकेला आणि त्या दिवशीच एकराष्ट्रीयत्वाच्या यथार्थ जाणिवेने येथे मूळ धरले. या राष्ट्रीय भावनेला स्थायी स्वरूप दिले ते विज्ञानाने. विनायकाच्या कवितांना राष्ट्रीयतेचा गंध आहे, हे मान्य करताना हेही लक्षात असले पाहिजे की, राष्ट्रीयतेचे बीजारोपण ज्या विज्ञानाने केले ते विज्ञान केवळ पाश्चिमात्य असल्यामुळे विनायकाने तिरस्कारिले आहे; त्याज्य मानले आहे. यास्तव त्याला राष्ट्रीय कवितेचा पहिला उद्‌गाता मानण्याऐवजी पूर्वजांचे पवाडे गाणारा पहिला आधुनिक कवी मानणे अधिक यथार्थ होईल. विनायकावर जो प्रभाव आहे तो चिपळूणकरांचा. सांस्कृतिक पुनरुज्जीवनाचा अतिरेकी आग्रह म्हणजेच देशभक्ती ही चिपळूणकरी धारणा त्याच्या मनात दृढमूल झालेली होती. 'भूललो पूर्व विसरलो सारे' हा पोकळ अभिमान आणि 'अंगी भरले नूतन वारे–मूर्खत्वाचे तुटती तारे' हा तिरस्कारपूर्ण भोंगळ डौल खास चिपळूणकर संप्रदायातीलच. निदान महाराष्ट्रात तरी 'राष्ट्रीयता' या शब्दाला या संप्रदायामुळे संकुचित अर्थ प्राप्त झाला. विनायक या संप्रदायाच्या प्रभावाखाली गेल्याने मराठी काव्यातील 'राष्ट्रीय कवितां'चे वळण पुनरुज्जीवनवादावर गेले. विनायकावर चिपळूणकरांऐवजी लोकहितवादी, म. फुले, आगरकर प्रभृतींचा प्रभाव पडला असता, तर त्याची कविता कोणत्या वळणावर गेली असती, असा प्रश्न उभा करून 'राष्ट्रीय कवितां'चा विचार डोळ्यापुढे आणावयास हरकत नसावी. अर्थात् हे घडले नाही. पण, त्यामुळे काय झाले असते, हे लक्षात आणले म्हणजे विनायकाच्या मर्यादा आणि त्यामुळे 'राष्ट्रीय कविते'ला आरंभकालीच लागलेले वळण याविषयी स्पष्ट कल्पना येऊ शकेल. 'आधुनिक राष्ट्रीयते'चा आविष्कार विनायकाच्या काव्यात नाही, अशी तक्रार नाही; पण, ती वस्तुस्थिती होय, हेही नाकारण्यात अर्थ नाही, एवढेच येथे नमूद करणे आवश्यक वाटते.

* असे असूनही विनायक हा 'राष्ट्रीय' कवी का ठरला ? विनायक ज्या काळात जगला त्या काळात महाराष्ट्रात पुनरुज्जीवनवादी प्रेरणा चिपळूणकरांच्या रूपाने अत्यंत प्रभावी ठरली होती. चिपळूणकर परंपरेतून पुढे आलेल्या टीकाकारांनी अर्थातच विनायकाला 'राष्ट्रीय कवितेचा पहिला उद्‌गाता' म्हणून डोक्यावर घेतले. राजाध्यक्षांसारखे काही टीकाकार या पठडीतून बाहेर पडून विनायकाकडे तटस्थ वृत्तीने पाहू लागताच, त्याचे खरे रूप त्यांना दिसले आणि ते त्यांनी प्रामाणिकपणे लोकांपुढे ठेवलेही. पण तेवढ्याने मूळचा प्रभाव पुसला गेला नाही. या बरोबरच, राष्ट्रीयते'च्या जाणीवा निरनिराळ्या अर्थाने सदैव वावरत आल्या आहेत. धर्मातीत आणि सहिष्णु राष्ट्रीयता भारतीय संविधानात मान्य झालेली असतानाही, ती संपूर्णपणे आमच्या जीवनात उतरली आहे, असे आजही निःशंकपणे म्हणता येत नाही. अशा स्थितीत आजही विनायक 'पहिला राष्ट्रीय कवी' मानला जावा, यात मुळीच आश्चर्य नाही. पण विनायकाच्या कविता 'राष्ट्रीय' आहेत, हे मान्य केल्यावरही त्यांच्यातील 'राष्ट्रीयता' कोणत्या प्रकारची आहे, हे समजावून घेतले पाहिजे.

ऐतिहासिक दृष्टया, पुनरूज्जीवनाच्या प्रेरणांची लाट प्रत्येकच समाजावर कधी ना कधी येत असते. महाराष्ट्रात ती पूर्वी आली; कदाचित् बिहार मध्ये आज आली असेल. भारतातील राजकीय प्रवाहांचा अभ्यास करताना, निरनिराळ्या भागात निरनिराळ्या प्रवृत्ती एकाच काळी कशा वावरत आहेत, हे ध्यानात येते. विनायकाच्या काळात चिपळूणकर आणि टिळक यांचा प्रभाव विशेष होता. पण विनायक हा टिळकांइतकाही पुढारलेल्या मनोवृत्तीचा नव्हता. स्त्रियांविषयी लिहिताना टिळकांनी म्हटले आहे, "स्त्रियांची देवता म्हणून स्थापना व्हावयास नको आहे. त्यांची मानुषी म्हणून स्थापना व्हावयास पाहिजे आहे त्यांच्याबद्दल गायिलेली गोड गाणी आत जहरी आहेत... आता पाश्चात्य राष्ट्रांशी टक्कर द्यायची आहे. रूढीच्या शृंखला तोडून स्त्री–पुरुषापैकी प्रत्येकाला आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक साधनांचा पूर्ण उपयोग करण्यास अवसर दिला पाहिजे." विनायकाने लिहिलेली खंडकाव्ये ही सर्वस्वी या विचाराच्या विरोधात उभी आहेत. ही खंडकाव्ये

आणि त्यांच्या नायिका ही विनायकाने मराठी भाषेला दिलेली मोठी देण आहे, यात शंका नाही. पण, त्यातील आदर्श किंवा बोध कालजीर्ण वाटतात; आज वाटतात असे नव्हे, तर टिळकांच्या कसोटीवरही कालजीर्ण वाटतात. जे स्त्रीविषयक विचारसरणीबाबत खरे आहे तेच अन्य विषयांबाबतही खरे ठरू शकते.

* विनायक हा सर्वस्वी रूढीपूजक आहे. टिळक हे रूढींचा आदर करीत; पण रूढींचे अंधानुकरण त्यांच्या हातून घडले नाही. हे तारतम्य विनायकात नव्हते. अर्थात् विनायकाकडून अशा चिकित्सक भूमिकेची अपेक्षा करणेच चूक ठरावे, असे त्याचे जीवन आहे. साहजिकच, जेव्हा स्वातंत्र्यनिष्ठेचे प्रतीक म्हणून शिवपूजनाला सुरूवात झाली आणि जेव्हा शिवेतिहासाचे संशोधन हा राष्ट्राचा मानबिंदू ठरू लागला तेव्हा विनायक शिवकार्याऐवजी शिवकालीन प्रेरणांवर स्थिर झाला, यात नवल नाही. शिवाजीचे शत्रू ते आमचे शत्रू, त्याची हत्यारे ती आमची हत्यारे, त्याची राजनीती ती आमची राजनीती अशी आदर्शात्मक समीकरणे जहाल पुनरूज्जीवनवाद्यांनी मांडली. विनायक हा त्यांच्यापैकीच एक. स्वातंत्र्यनिष्ठेऐवजी शिवनिष्ठा हीच एकमेव निष्ठा राहिली. उपमेय गेले आणि उपमान फक्त हाती राहिले. पुढे पुढे तर शिवनिष्ठेची जागा यवनद्वेषाने घेतली. म्हणजे उपमानही गेले आणि 'धुपाटणे' तेवढे हाती राहिले. स्वातंत्र्यनिष्ठेपासून यवनद्वेषापर्यंत हा जो वैचारिक प्रवास तत्कालीन परिस्थितीत झाला, त्यातच अनिष्ट श्रद्धेचे मूळ आहे. अनिष्ट श्रद्धा अनिष्ट धारणा कोरून गेली. विनायकाची कविता हे एक असेच कोरीव लेणे आहे.

विनायकाच्या कविता 'राष्ट्रीय' समजल्या गेल्या कारणाने पुढील राष्ट्रीय कवितेची वळणे आणि चाकोरी त्यानेच जणू आखून दिली. परंपरेचा अभिमान, पूर्वजांचे पुण्यस्मरण, सशस्त्र क्रांतीवर श्रद्धा, शिवनिष्ठा व तज्जन्य धर्मनिष्ठा यांचे कारंजे उडविणारी ती राष्ट्रीय कविता हा समज काही काळ दृढमूल झाला तो विनायकाने दाखविलेल्या दिशेमुळे ! मराठी काव्यक्षेत्रात हा एक नवाच पायंडा त्याने पाडला आणि तो रूढही

झाला. सावरकरांपर्यंत थोड्याफार फरकाने हा प्रवाह अव्याहत चालू राहिला आहे. या प्रवाहाला पहिला प्रभावी बांध घालून त्या प्रवाहाचे वळण बदलले ते कुसुमाग्रजाने. या महाकवीने मानवता आणि राष्ट्रीयता घुसळून घुसळून एकरूपच करून टाकली. स्वधर्मनिष्ठेबरोबरच परधर्म-सहिष्णुता आणि पूर्वजगौरवाबरोबरच आत्मबलिदानाची जिद्द यांनी घडविलेली राष्ट्रनिष्ठा कुसुमाग्रजाच्या काव्यात एकजीव आणि एकरस होऊन वावरते. नंतर आणखी एक नवा मनू आला. दुसऱ्या महायुद्धाने संपूर्ण मानवी क्षितिजच रक्ताळले. केवळ देशाचा विचार मानवाधिष्ठत न ठेवता, संपूर्ण मानवांचाच विचार विश्वव्यापी स्वरूपाचा असणे अपरिहार्य ठरले. या मैलाच्या दगडावर उभे राहिले आहेत मर्ढेकर! मराठी काव्यक्षेत्रांतील महाराष्ट्रव्यापी राष्ट्रीयत्व, मानव्याधिष्ठित राष्ट्रीयत्व आणि विश्वव्यापी मानवता ह्या तीन मुक्कामांवर अनुक्रमाने विनायक, कुसुमाग्रज आणि मर्ढेकर हे निश्चलतेने पाय रोवून उभे आहेत.

***

ठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम. ६१४३८ दि: १३/२/८६
ग्रंथ १६०४ नोंद दि. १८/५/८८

REFBK-0015225

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. ९५२२५
संदर्भ शाखा (स्थळप्रत)

# प रि शि ष्ट

# कवितांचे वर्गीकरण

**ईश्वरविषयक** : १. ईशस्तवन. २. दत्तदर्शन. ३. परपूजा. ४. सत्य, दिव्य, शांत. ५. सोंगटीचा खेळ. ६. विश्वरंग स्थल. ७ मेळयाची दहा पदे.

**धार्मिक** : ८. पाच गोरक्षणपर पदे. ९. प्रासंगिक स्फुट पदे. (३)

**पौराणिक** १०. मोहानंतर.

**सणविषयक** : ११. नागपंचमी. १२. दसरा. १३. दसऱ्याचे सोने. १४. गणेश पूजन.

**समाजस्थितिपर** : १५. प्रासंगिक स्फुट पदे (८,१०,११)

**ऐतिहासिक** : १६. शिवराज दर्शन. १७. इतिहासाचे मर्म. १८. यापुढे. १९. शिवसंदेश. २०. हिरकणी. २१. राजा भोज. २२. जोहार. २३. श्री शिवगीते.

**ऐतिहासिक—स्त्री-खंडकाव्ये** : २४. पन्ना. २५. पद्मिनी. २६. राणी दुर्गावती. २७. संयोगिता. २८. तारा. २९. कृष्णाकुमारी. ३०. ध्यास तो भास. ३१. गणिकोद्धार ३२. वीरमती.

**क्षात्रवृत्तिपर** : ३३. समरवर्णन. ३४. काय वीर तो. ३५. की तोडिला तरू फुटे. ३६. रणावेश. ३७. वीर व भ्याड. ३८. खरे क्षत्रीय ब्रीद.

**ध्येयप्रवण** : ३९. कष्टाकुल राजपद. ४०. प्रजा हृदय हेच राजपद ४१. देशभक्ताचा अपूर्व सोहळा. ४२. दैवदुर्विलास. ४३. देशभक्ताचे सामर्थ्य. ४४. वैधवाची चंचलता. ४५. जन्मसार्थक्य. ४६. प्रासंगिक स्फुट पदे (५,८, ९,६,८) ४७. दोन मार्ग. ४८. स्त्री.

| | | |
|---|---|---|
| मातृभूमिविषयक | | ४९. महाराष्ट्र लक्ष्मी. ५०. हतभागिनी. ५१. प्रो. छत्र्यांचा केसरी. ५२. मातृभूमीचे लेणे. ५३. प्रासंगिक स्फुट पदे (७). |
| जीवन तत्त्वज्ञान | : | ५४. आयुष्य विषाचा पेला. ५५. आत्म्याचे मंदिर. ५६. समाधान महती. ५७. भोगमुक्ती. ५८. जीवितमहिमा. ५९. प्रासंगिक स्फुट पदे (२) |
| वात्सल्यपर | : | ६०. प्रासंगिक स्फुट पदे (४) |
| विनोदी | : | ६१. चिमा. |
| प्रणयपर | : | ६२. अवंतिके. ६३. प्रीती निमाली तर. ६४. स्त्री आणि पुरुष. ६५. विरही. ६६. स्वप्न. ६७. प्रीती. ६८. प्रेमलुब्धता. ६९. प्रत. ७०. कुल आणि प्रीती. ७१. पहिले चुंबन. |
| निसर्गपर | : | ७२. चिमणी. ७३. सृष्टिविवाह मंडप. ७४. प्रासंगिक स्फुट पदे (१). |
| काव्यविषयक | : | ७५. गाण्याचे गाणे. ७६. कवी आणि पोपट. ७७. सुवास. ७८. नदी आणि कवी. ७९. कवी. |
| आशय-अपूर्णता | : | ८०. सद्वस्तूंची कष्टसाध्यता. ८१. काळाची प्रतिकूलता. ८२. दंत आणि जिव्हा. |

# आशा–निराशावादी कविता

## १. आशावादी

१. इतिहासाचे मर्म–प्रयत्नशील कर्मवाद
२. दोन मार्ग–प्रयत्नशील कर्मवाद
३. शिवसंदेश–दैवनिष्ठ आशावाद
४. देशभक्ताचे सामर्थ्य–सद्‌गुण श्रद्धाजन्य आशावाद
५. मातृभक्तीचे लेणे–इंद्रियनिग्रहजन्य आशावाद
६. प्रासंगिक स्फुट पदे–विजिगिषु-लढाऊ-आशावाद

## २. निराशावादी

१. गणेशपूजन–कर्तृत्वशक्तीची अगतिकता
२. भोगमुक्ती–दैवनिष्ठ अगतिकता
३. सत्य, दिव्य, शांत–जगन्मिथ्यावाद
४. स्वप्न–जगन्मिथ्यावाद
५. हृतभागिनी–दुर्गुणांची निराशाजन्य जाणीव
६. दैवदुर्विलास–दुर्गुणांची निराशाजन्य जाणीव
७. यापुढे–सद्‌गुणांचा अभाव
८. गाण्याचे गाणे–संसारविमुख निवृत्तिपरता
९. सुवास–संसारविमुख निवृत्तिपरता
१०. विरही–शारीरिक दौर्बल्यातून प्रणयनैराश्य

## ३. आशा–निराशा

१. आयुष्य विषाचा पेला–निराशा दडविण्यापोटी आशावाद
२. काळाची प्रतिकूलता–निराशा दडविण्यापोटी आशावाद
३. महाराष्ट्र लक्ष्मी–निराशा लपविण्यासाठी आशावादाचा आभास
४. प्रो. छत्र्यांचा केसरी–आशा व निराशा यांचे मिश्रण
५. प्रासंगिक पदे–वर्तमानातील दु:स्थिती
६. जीवित महिमा–भाषांतर. ही विनायकाची जीवनदृष्टी नव्हे

# कथाकाव्ये

| कथाकाव्य | निष्ठा | प्रयोजन |
| --- | --- | --- |
| १. अहल्या | सद्गुणनिष्ठा | श्रीमती अहल्याचरित्रश्रवणसुखाचा-ठेवा....सापडे तयात विसावा. |
| २. पन्ना | स्वामिनिष्ठा | धर्म असे सेवकाचा स्वामीचे रक्षण, ....जीवितही अर्पण. |
| ३. पद्मिनी | पतिनिष्ठा | करी चातुर्ये जी बंधमुक्त नाथाला पद्मिनी असे ती पात्र धन्यवादाला. |
| ४. राणी दुर्गावती | पातिव्रत्यनिष्ठा | जे निजदेशहिताला तनुमनधन अर्पिती....विनायकाला रती. |
| ५. संयोगिता | प्रीती व पतिनिष्ठा | भारतवर्षी ओघ यापरी यवनांचा लोटला, देश हा परवशता पावला. |
| ६. तारा | पितृनिष्ठा | धीर धरा उद्योग करा, दृढ नियम वागवा हा ध्यानी. |
| ७. कृष्णाकुमारी | पितृनिष्ठा | जसे करावे तसे भरावे बीज तसे दाणे !....कृष्णेचे गाणे. |
| ८. ध्यास तो भास | स्वधर्मनिष्ठा | निजधर्म त्यजिला त्वा, यवनाचा निंद्य धर्म तुज रुचला. |
| ९. गणिकोद्धार | मोक्षनिष्ठा | विसरलीस गणिके ! शाश्वत तू भूलूनी अशाश्वताला. |
| १०. वीरमती | क्षात्रनिष्ठा | आले न रजपुतांचे परि यवना सर्व हरविता पाणी, कारण वीरमतीसम असती जागृत गृही स्त्रिया मानी. |
| ११. मोहानंतर | कर्तव्यनिष्ठा | स्त्रीच्या ठायी अन्य वस्तु परी अमृतविषाला थार, स्त्रीच्या पायी तरले थोडे; बहुत बुडाले ठार ! |

## आगामी प्रकाशने

★ भिंग :

चित्रपट सृष्टीतील
कथा आणि व्यथा

— श्री. मदनमोहन

★ मराठी नाटक :

आशय आणि आकार

— प्रा. रु. पां. पाजणकर

★ मराठी लघुनिबंध :

उद्भव आणि उत्क्रांती

— प्रा. मनोहर रोकडे

दर्शन प्रकाशन,
नागपूर

सर्वोदय प्रेस, नागपूर